म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा. वा
दा. क्र. १६७९०

IRBK-0116790
IRBK-0116790

म. ग्रं. सं. ठाणें
ाय बा. वा.
क्र. १६७९०

IRBK-0116790


संस्कृतीची
शिदोरी
लीलावती भागवत

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :– खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, असे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

2 NOV 1976

27 APR 1977

13 OCT 1977

21 DEC 1977

18 FEB 1978

7 FEB 1979

[कृ. मा. प.]

९६५८०
वाचनालय
२९।९।७६
बा० वा०

# संस्कृतीची शिदोरी

म. ग्रं. सं. ठाणे. वाचनालय शाखा.
दा. क्र. ९६५८० ता. २९।९।७६
वि. बा० वा०

लेखिका :

लीलावती भागवत

अरविंद कुलकर्णी प्रकाशन : पुणे ३०

प्रकाशिका :

सौ. निर्मला नारायण अरगडे
सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन,
१६/२२४ लोकमान्यनगर पुणे ३०

सर्व हक्क प्रकाशिकाधीन

चित्रकार : एस्. के. परब

प्रथम आवृत्ती ऑगस्ट १९७६.

किंमत ९ रुपये

मुद्रक :

प्रभाकर सरदेसाई, एम्.एस्सी.
अक्षर मुद्रणालय, इंडस्ट्रियल इस्टेट
नागरगाव, लोणावळा

प्रकाशन क्रमांक २००

माझ्या आयुष्याच्या प्रवासात मला

संस्कृतीची शिदोरी पुरविणाऱ्या

माझ्या आईस.

तौ. माईला

## ऋणनिर्देश

हे पुस्तक लिहिताना मला अनेक संदर्भ-ग्रंथ चाळावे लागले. त्यात मला विद्यार्थीदशेपासून आवडलेल्या कै. ऋग्वेदी यांच्या 'आर्यांच्या सणांचा प्राचीन व अर्वाचीन इतिहास' या सुंदर पुस्तकाचा विशेष उपयोग झाला हे कृतज्ञतापूर्वक नमूद करावेसे वाटते.

लेखिका

# शिदोरी सोडण्यापूर्वी

'संदीप, अरे गुढीची तयारी केलीस का ?'

संदीप गप्पच.

'प्रज्ञा, चैत्रगौरीच्या हळदीकुंकवाची बोलावणी करायला जाणार आहेस ना संध्याकाळी ?'

प्रज्ञाचेही उत्तर नाही.

आईबाबा दोघांनाही आश्चर्यच वाटलं. ही मुलं तशी फारच चांगली. आईवडिलांचे नेहमी ऐकणारी. हुशार, कामसू आणि आजच हे काय ?

बाबांनी विचारले,

'अरे काय झालंय काय आज तुम्हा दोघांना ?'

'बाबा, आमचा या वर्षी सत्याग्रह.' दोघेही म्हणाली.

'कशाबद्दल ?'

'तुम्ही आम्हाला सांगता ते सणबिण आम्ही दरवर्षी करतो. तुम्ही सांगता ते ऐकतो. पण हे कशासाठी करायचं ते मात्र सांगत नाही. ते कळल्याशिवाय आम्ही काहीही करणार नाही.'

'अरे, पण मी तसं सांगते नाही का तुम्हाला विचारलंत की.' आई म्हणाली.

'ते काय ? तात्पुरतं ! आम्हाला सगळी सविस्तर माहिती हवी. आई तुला तर सगांच्या कितीतरी लोककथा, पुराणातल्या कथा माहीत आहेत.'

'होय रे पोरांनो, आईला खपच ठाऊक आहे. तिच्याकडून समजावून घ्या.' बाबा म्हणाले.

'हो. पण बाबा, तुम्ही काढता पाय घेऊ नका. तुम्हालाही चिक्कार माहिती आहे. तुम्ही दोघांनीही सांगितलं पाहिजे.' संदीपने बाबांनाही अडकवले.

'ठीक आहे. तुमचा सत्याग्रह एकदम मान्य आहे आपल्याला. नाहीतरी उगीचच मोठी सांगतात म्हणून आंधळेपणानं कशाला करायचं सगळं ?'

'मग केव्हा सांगायचं ?' बाबांनी विचारले.

'अहो, पण वेळ कुठाय ?'

'वेळ काढायला हवा. आपण असं करूया--प्रज्ञा, संदीप रोज रात्री जेवल्यावर बैठक मारायची.'

'पण केव्हापासून ?' आता प्रज्ञा-संदीपना उत्सुकता आवरेना.

'असं पहा, आज आहे पाडवा. या पाडव्याच्या मुहूर्तावर आजपासूनच सुरुवात करूया.' आईने सांगितले.

आणि त्या रात्रीपासून कितीतरी दिवस रोज आईबाबा मुलांना सांगत गेले.

वर्षाचे बारा सण. प्रत्येक महिन्यातलं ऋतुमान, त्यातले महत्वाचे सण, त्या सणामागची तत्त्वं, भूमिका त्या महिन्यातल्या श्रेष्ठ पुरुषांच्या जयंत्या, त्या व्यक्तींमधले आदर्श, गुण या सर्वांच्या संदर्भातल्या लोककथा, पुराणातल्या कथा हे सगळं सांगताना आईबाबा आणि ऐकताना मुलं रंगून गेली. प्रथम प्रथम नुसतंच ऐकणारी प्रज्ञा-संदीप मधूनमधून प्रश्न विचारू लागली, स्वतःला असलेली माहितीही सांगू लागली.

आणि मग एक फार मोठं विचारधन त्यांच्या हाती लागलं. त्यांची खात्री पटली की ही आपल्याला मिळालेली संस्कृतीची शिदोरी कुणालाही जन्मभर आयुष्याची वाटचाल करायला, चांगलं जीवन जगायला उपयोगी पडेल, पुरेशी होईल.

इतरांनाही ही शिदोरी बांधून घ्यावीशी वाटेल, अशी खात्री आहे.



# चैत्र

शिशिराची थंडी संपलेली असते. नव्या ऋतूची चाहूल लागते. कोकिळा कुहू कुहू असा पंचमस्वर आळवते आणि त्या सुरांच्या भूपाळीने शिशिरात गारठून झोपलेला निसर्ग जागा होतो. सकाळचे कोवळे ऊन त्याला नवी ऊब देते. माणसाच्या मनाला या नवचैतन्याचा स्पर्श होतो. थंड झुळझुळ वाहणाऱ्या वाऱ्याचे मंद झोत मनाला उत्साह देतात. पांढरा शुभ्र मोगरा, पिवळी धमक शेवंती, रंगांची दुनिया खुलवणारी प्रफुल्लित फुले रंगपंचमी खेळल्यासारखी दिसतात. कैऱ्यांचा आंबट चिकट वास झाडामाडातून जाताना नाकात भिनतो आणि तोंडाला पाणी सुटते, काही काही आम्रवृक्षांवर अजूनही मोहराचे तुरे डौलाने हालत असतात. तर नवी, नाजूक, तांबूस पालवी झाडांच्या फांद्यावर लवलवत असते.

अशा या साऱ्या नव्या उत्साहाच्या ललकाऱ्या देत येतो चैत्र पाडवा. वसंतऋतूच्या अंगाखांद्यावर मिरवीत येणारा हा सण. चैत्र शुद्ध प्रतिपदा हा साडेतीन मुहूर्तातला एक उत्तम मुहूर्त. पुष्परचना करायची, वसंतोत्सव करायचा मनाला उत्साह येण्यासाठी. कंटाळा, आळस, मरगळ घालवून नवीन उल्हासाने सुखावण्यासाठी.


चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा. घरोघरी गुढी उभारायची. कशासाठी? गुढी म्हणजे स्वातंत्र्याचा ध्वज. श्रीरामाने

दक्षिण भूमीला वालीच्या जुलमी अत्याचारातून सोडवले. सारी दक्षिणभूमी आनंदाने नाचू लागली. ध्वजापताका घेऊन मिरवू लागली. स्वातंत्र्याचे प्रतीक म्हणून गुढी उभारली गेली.

शालिवाहनाने दक्षिण भारत हूणांच्या गुलामगिरीतून मुक्त केला आणि दक्षिण भारताने आनंदोत्सव साजरा केला.

या स्वातंत्र्यप्राप्तीची आठवण नेहमीच जतन करायची. मनाच्या गाभाऱ्यात ती राहणारच. पण तिचे बाह्य स्वरूप लोकांनी कसे प्रकट करायचे? गुढी उभारून त्या श्रेष्ठ पुरुषांच्या पराक्रमाची स्मृती नजरेसमोर ठेवायची, त्या दिवशी तरी.

गुढी उभारायची एका काठीच्या रूपाने. मोठमोठ्या शहरात इमारतीच्या गॅलऱ्यांतून गच्चांवरून गुढ्या फडकताना दिसतात पाडव्याला.



१६८९०



खेड्यापाड्यात तर या गुढीच्या काठीचा कोण मान त्या दिवशी! गुढी उभारायची ती जागा सारवून स्वच्छ करायची. तिथे सुंदर रांगोळी घालायची. रोजचीच धुणे वाळत घालायची काठी; पण त्या दिवशी आजोबा विचारणार, 'यष्टीला स्नान घातलं का?' मग लहानगी नात आईला मदत करीत काठीला तेल लावणार. कढत पाण्याने तिला आंघोळ घालणार. मग तळाशी हळदकुंकू लावणार. रांगोळी घातलेल्या जागेवर हिरवेगार पान ठेवून त्या पानावर काठी उभी करणार. एक जरीचा खण काठीला पांघरणार. मग चांदीचा किंवा घरात असेल तसला गडू किंवा चंबू काठीवर पालथा घालणार. आंब्याची पाने आणि झेंडूची फुले यांनी रंगीबेरंगी दिसणारा एक हार त्या गडूच्या भोवती घालणार आणि गळ्यात अडकवणार साखरेची गाठी. मग दोरीने घट्ट बांधून उंच उभी करणार ही गुढी अंगणात.

गुढी कशी ताठ उभी असते! मनाची दृढता शिकवते. नवे संकल्प करायचे; मान ताठ ठेवून, पाय पक्के रोवून ते पार पाडायचे ही या गुढीची शिकवण.

कडूनिंबाचा पाला खायचा आणि आरोग्य, बल, बुद्धी आणि तेज यांची वृद्धी करायची. शरीरसमृद्धीची कास धरायची. उत्तम संस्कारांनी समृद्ध वातावरणात मन स्वच्छ, समृद्ध करायचे.

वर्षाचा प्रारंभ असा उत्साहाने झाला की मन प्रफुल्लित होते. खूप काही करावेसे वाटते.

चैत्र शुद्ध तृतीया येते आणि सासरहून माहेरी येणाऱ्या मुलीसारखी गौर माहेरी येते. येते ती महिनाभर राहण्याच्या हेतूनेच.

या गौराईचे मग घराघरात स्वागत होते. माहेरी आलेल्या मुलीला भेटायला जशी आसपासची मंडळी, नातेवाईक येतात

तशाच तऱ्हेने या गौरीचीही सर्वांशी भेट होते. त्या भेटीसाठी हळदीकुंकू समारंभ घडवून आणले जातात. चैत्रात महिनाभर चैत्र शुद्ध तृतीयेपासून वैशाख शुद्ध तृतीयेपर्यंत घरोघरी हळदीकुंकू करतात. पूर्वीच्या काळी कोकणात अशी पद्धत होती की दारी गंगोळी घातलेली असेल तर ती ओलांडून पुढे जायचे नाही. घरात जाऊन हळदीकुंकू घेऊन, गौरीला नमस्कार करून पुढे जायचे.

नंतर काळ बदलला, पद्धतीही बदलल्या. गावांची मोठी शहरे झाली. छोटया गावात सगळ्या गावकऱ्यांचे आपसात जवळचे संबंध राहतात. मोठ्या शहरात ते कसे राहणार?

मग हळदीकुंकू समारंभासाठी ठराविक आप्तेष्टांना निमंत्रण देण्याची पद्धत सुरू झाली. चैत्रगौर सजवायची कशी? पूर्वी फार गमतीदार पद्धत होती. मोठमोठी कपाटे नसत. चीजवस्तू, कपडेलत्ते ठेवले जात मोठमोठ्या ट्रंकापेटयांमधून चैत्रगौरीचे हळदीकुंकू घरी असले की त्या दिवशी त्या ट्रंकापेटयांवरची धूळ झटकून त्यांची रचना एखाद्या जिन्यासारखी केली जाई. पायऱ्या कधी तीन, कधी चार, कधी पाचसहा देखील. मग त्या पायऱ्यांवर रंगीत चादर, कद किंवा जरीचे लुगडंदेखील आंथरले जाई. ते घसरू नये आणि शोभाही दिसावी म्हणून प्रत्येक पायरीवर दोन्ही कडांवर ठेवल्या जात झाडांच्या कुंड्या. वरच्या पायरीवर छोट्या देव्हाऱ्यात छोटीशी गौर बसायची ही गौर म्हणजे अन्नपूर्णेची मूर्ती. बहुतेक घरी लग्नात गौरीहराच्या वेळी वधूने पूजा केलेली गौरीची मूर्ती. मग पायऱ्या पायऱ्यांवर वेगवेगळी रंगीबेरंगी चित्रे ठेवली जात. फराळांनी भरलेली तबके ठेवीत आणि अगदी पायथ्याशी खणाची कुंची घातलेले एखादे बाहुले. मुलाबाळांनी,

झाडामाडांनी, धनधान्यांनी, खाद्यपेयांनी घर समृद्ध असावे ही इच्छा. त्याचे हे प्रतीक.

कलावंतांना ही आरास करण्यात खूपच वाव असतो. मग गौरीच्या आसनाच्या वेगवेगळ्या कल्पना निघाल्या. नुसत्या देव्हाऱ्याऐवजी गौर कधी कधी कागदाच्या कमळात वसू लागली. कधी कापलेल्या कलिंगडाच्या, गर पोखरून तयार केलेल्या कमळात. कधी लतावेलींमध्ये बांधलेल्या छोट्या झोपाळ्यावर; तर कधी पायऱ्यांऐवजी संपूर्ण डोंगराची आरास केलेली असे. कापसाचे बर्फ आणि त्याच्या शिखरावर देवी.

आजूबाजूला झगमगीत शालू किंवा अशाच वस्त्रांचे पडदे, मध्ये आसनावर विराजमान झालेली गौर, भोवतीची सुंदर आरास, कोरे कपडे, अत्तरगुलाब, फुले आणि उदबत्त्यांचा सुगंध. आलेल्या बायकामुलींना फुले द्यायची, अत्तर लावायचे, गुलाबपाणी शिंपडायचे आणि ओल्या हरभऱ्यांनी ओटी भरायची.

असे हे प्रफुल्लित करणारे चैत्रगौरीचे हळदीकुंकू. काही काळ सगळ्या चिंतांची आठवण न येऊ देणारे. हा फक्त स्त्रियांचा समारंभ. पण चैत्राच्या उत्साहात भाग घेण्यासाठी पुरुषांनाही संधी नको का मिळायला? मग याच हळदीकुंकू समारंभाबरोबर वसंतोत्सव होऊ लागला. डाळपन्हे सर्वांनाच दिले जाऊ लागले. आंब्याची डाळ आणि कैरीचे पन्हे यांचा आस्वाद सगळेच घेतात. तृप्त होतात.

या गौरीउत्सवाच्या कितीतरी कथा आपल्या पुराणात आहेत. एके काळी फार मोठा जलप्रलय होऊन सगळ्या मानवजातीचा अंत होण्याची वेळ आली. सर्वांनी विष्णूची करुणा भाकली. मग विष्णूने मत्स्यावतार धारण केला आणि नौकेच्या मदतीने सर्व

मानवजातीचे रक्षण केले. अशीच कथा ख्रिस्ती, मुसलमानी आणि पारसिक धर्मग्रंथातही आढळते. तेव्हा कदाचित खरोखरीच जलप्रलय झाला असावा.

महाराष्ट्रात गौरीच्या आगमनाच्या आनंदात पंचमीला सुवासिनींना भोजन देण्याची काही ठिकाणी पद्धत आहे. उत्तर भारतात अशोकषष्ठीचा उत्सव करतात. याचे व्रतही करतात. त्याला म्हणतात अशोकव्रत. आपल्याकडे आपण पाळतो ती कितीतरी व्रते बहुतेक पूर्वी घडून गेलेल्या काही प्रसंगांची आठवण म्हणूनच पाळतो. अशोकषष्ठी व्रतही असेच.

त्याची कथा अशी आहे की पूर्वी एकदा एका ऋषीला आपल्या घरासमोर एक लहान मुलगी सापडली. ऋषींने तिला वाढवली, लहानाची मोठी केली आणि एका राजपुत्राशी तिचे लग्न करून दिले. ती सासरी जायला निघाली तेव्हा ऋषींनी तिला सांगितले, 'हे बघ, या अशोकवृक्षाच्या बिया घे आणि रस्त्याने जाताना या वाटेत रस्त्याच्या दोन्ही बाजूंना टाकीत जा.'

'कशासाठी?' मुलीने विचारले. ऋषी म्हणाले, 'या बिया उगवून रस्त्याच्या दोन्ही बाजूंना अशोकवृक्षांची रांग तयार होईल. तुझ्यावर काही संकट आलं तर या झाडांजवळ जाऊन हाक मार म्हणजे मी येईन आणि तुझं संकट दूर करीन.'

मुलीने त्या बिया टाकल्या. पुष्कळ वर्षं अशीच गेली. नंतर मात्र एकदा त्या मुलीच्या, म्हणजेच त्या राणीच्या कुटुंबावर फार मोठे संकट आले. तिचे मुलगे आणि सुना एकाच वेळी अचानक मृत्यू पावल्या. राणीला फार दुःख झाले. तिला ऋषींनी सांगितलेल्या त्या अशोकाच्या बियांची आठवण झाली.

ती त्या अशोकाच्या झाडांजवळ गेली आणि तिने ऋषींना



हाक मारली. ऋषींनी अशोकवृक्षांमधून येऊन तिला तीर्थ दिले. तिने ते शिंपडताच तिचे मुलगे आणि सुना जिवंत झाल्या.

यातला चमत्कार काहीही असो, त्या वृक्षांनी राणीच्या घरच्या मंडळींना जीवदान दिले हे खरे. याच कथेची आठवण म्हणून अशोकषष्ठी पाळणाऱ्या बायका अशोकपुष्पाच्या सहा कळ्या पाण्यात घालून ते पाणी पितात.

चैत्रातले आणखी दोन महत्त्वाचे उत्सव म्हणजे रामनवमी आणि हनुमानजयंती.

चैत्र शुद्ध नवमी म्हणजेच रामनवमी. राम म्हटल्याबरोबर आपल्या डोळ्यासमोर रामाची मूर्ती उभी राहते ती कशी ? प्रसन्न, शांत चेहऱ्याची. त्या मूर्तीकडे पाहिल्याबरोबर वाटते, इथे आपण सुरक्षित आहोत. राम आपल्याला मदत करणारा,

आपले रक्षण करणारा आहे. तो प्रेम करणारा आहे. संकटात सापडलेल्यांना सोडवणारा आहे. तो सांगणाराचे ऐकून घेणारा आहे. दुसऱ्यांची दुःख समजून घेणारा आहे.

असे आहे म्हणूनच असे राज्यकर्ते, असे अधिकारी ज्या राज्यात असतात, लोकांच्या सुखासाठी झटणारे असतात, त्या राज्याला आपण रामराज्य म्हणतो. असे रामराज्य स्थापन करण्यासाठी रामाला जन्म घ्यावा लागला. कारण असे लोकांना सुखात ठेवणारे राज्य त्या वेळी नव्हते.

असुर म्हणजे राक्षस उन्मत्त झालेले होते. शूर्पणखा ही राक्षसी आणि खर-दूषण हे तिचे भाऊ. तिघेही ऋषीमुनींना अत्यंत छळत असत. ऋषी यज्ञ करीत. ते यज्ञ तिथे येऊन मोडून तोडून टाकीत. नासधूस करीत. ऋषींना मारीत असत. सगळेजण त्रासले होते. वैतागले होते.

लंकेचा रावण तर फारच वाईट वागत होता. त्याच्या राज्यात सगळीकडे अनीती बोकाळली होती. त्याला भयंकर गर्व चढला होता. तो म्हणेल त्याप्रमाणे, त्याच्या इच्छेप्रमाणे, लहरीप्रमाणे पंडितांना, शास्त्रज्ञांना वागावे लागे. लोक त्रासले होते. हवालदिल झाले होते.

पृथ्वीला मानवाचे हे दुःख बघवेना. तिने विधात्याकडे जाऊन मांगल्य स्थापनेची प्रार्थना केली आणि विधात्याने तिला रामावताराचे आश्वासन दिले असे पुराणात म्हटले आहे.

राम दुष्टांना शासन करण्यासाठी जन्माला आला हे खरेच आहे. तो काल्पनिक अवतार नाही. राम हा ऐतिहासिक पुरुष आहे. राम, लक्ष्मण, भरत आणि शत्रुघ्न हे त्याचे चार मुलगे.

दुष्ट शत्रूंचा नाश करणे, निर्बलांना त्रास देणाऱ्या, छळणाऱ्या

बलिष्ठांशी दोन हात करून निर्बलांना सोडवणे हे क्षत्रियाचे आणि राजाचे मुख्य कर्तव्य. रामाने ते फार उत्तम रीतीने पार पाडले. म्हणूनच राम आदर्श समजला जाऊ लागला.

रामाचे चरित्र किती विविध गुणांनी भरलेले आहे! तो सात्त्विक आहे, प्रेमळ आहे. आईवडिलांच्या ठिकाणी त्याची नि:सीम भक्ती आहे. रामायणातल्या प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीतरी विशेष आहे. रामाचे आपल्या भावांवर विलक्षण प्रेम होते आणि त्याच्या भावांचेही त्याच्यावर तितकेच प्रेम होते. राम वनवासाला जायला निघाल्याबरोबर त्याच्याबरोबर जाण्यासाठी लक्ष्मण एक पाऊल पुढेच टाकून तयार झाला; वनवासात रामसीतेची सावली बनून राहिला. त्यांच्यावर काही संकट येऊ नये म्हणून रात्रंदिवस डोळ्यात तेल घालून पहारा करीत राहिला. त्यांच्या रक्षणासाठी जिवावर उदार झाला. हे बंधुप्रेम काय कमी म्हणायचे?

एवढे मोठे राज्य मिळत होते तरी ते नाकारून रामाच्या पादुका सिंहासनावर ठेवून रामाच्या नावाने भरताने राज्य केले. हाही बंधुप्रेमाचा आणि भक्तीचाच नमुना. शत्रुघ्नही रामावर प्राणापलीकडे प्रेम करीत होता. रामाचे जितके या तिघांवर प्रेम होते तितकेच या तिघांचे रामावर होते.

फुलांच्या ताटव्यावरून चालणारी सीता रानावनात, काटयाकुटयांच्या रस्त्यावरून हसत आनंदाने गेली कारण तीही आदर्श स्त्री होती. पतीच्या सुखदु:खात सारखाच वाटा उचलणारी. लक्ष्मणाची पत्नी उर्मिला देखील अशीच सर्व सुखांवर पाणी सोडून लक्ष्मणाशिवाय राहिली. कारण लक्ष्मणाने रामाबरोबर वनवासात जाणे जास्त महत्त्वाचे होते. शिवाय अयोध्येत राहून राजमाताचे रक्षण करण्याची जबाबदारी लक्ष्मणाने तिच्यावर

सोपवली होती. कैकेयीने युद्धात आपल्या हाताने रथ सावरला त्या वेळी तिला दिलेली वचने पाळण्यासाठी दशरथाने मुलांचा विरह सोसला. आपण रामाशिवाय जगू शकणार नाही हे माहीत असूनही त्याने शब्द पाळण्याचेच ठरवले.

अशा श्रेष्ठ आणि थोर व्यक्तींचे आदर्श नमुने रामायणात आढळतात. रामनवमी साजरी करायची ती या व्यक्तींचा मोठेपणा शिकून घेण्यासाठी.

जसा राम तसाच त्याचा सेवक हनुमान. चैत्र शुद्ध पौर्णिमा ही हनुमानजयंती. हनुमानाचा जन्म वानर नावाच्या रानटी लोकांच्या कुळात झाला. याच्या वडिलांचे नाव केसरी. आईचे अंजनी. अंजनीने कित्येक वर्ष महादेवाची भक्ती केली आणि म्हणूनच रुद्रासारखा पराक्रमी हनुमान तिला मुलगा झाला असे पुराणात म्हटले आहे.

अरुणोदयाच्या वेळी आकाशात नुकताच सूर्याचा लाल गोळा वर येत होता. मारुतीने तो पाहिला आणि जन्मतःच त्यावर झेप घेतली. त्याला आपल्या शक्तीचा अंदाज तर घ्यायचा नसेल?

रामाला लंकेत जायचे होते. त्याने मारुतीची शक्ती ओळखली होती. लंकेत पोचण्यासाठी, सीतेचा शोध घेण्यासाठी रामाने मारुतीला बोलावले.

मारुती जितका बलाढ्य होता तितकाच धाडसी होता. धोरणी होता. तो कोणत्याही प्रसंगी डगमगून जायचा नाही.

अशोकवनात रावणाने सीतेला ठेवले होते. सभोवती अक्राळविक्राळ राक्षसी बसलेल्या होत्या. मारुतीने एखाद्या गुप्तहेराप्रमाणे एवढ्या मोठ्या लंकेत सीतेला कुठे ठेवले होते त्याचा तपास लावला आणि तो मोठ्या युक्तीने झाडावर दबा धरून

बसला. रामाची अंगठी त्याने हळूच सीतेपुढे टाकली आणि सीतेला ओळख पटताच राम तुला सोडवायला येतो आहे असा तिला धीर दिला मारुतीने.

इतका पराक्रमी हनुमान, आला तसा गुपचूप जाऊ शकला नसता का परत?

पण त्याला रावणाला चिडवण्याची लहर आली. मुद्दाम जागे केले त्याने पहाऱ्यावरच्या राक्षसांना. त्यांना बदडले. रावणाची शक्ती आणि युक्ती दोन्हीही त्याला समजून घ्यायची होती. आणि त्याचबरोबर आपल्या शक्तीचीही चुणूक दाखवायची होती.

रावणाने त्याला पकडून त्याची शेपटी पेटवून दिल्यावर त्याने लंकेवर उड्डाण करून सगळ्या लंकाभर आपल्या शक्ती-



युक्तीने धमाल उडवून दिली; आणि रावणाचा कसा पराभव करता येईल त्याबद्दल रामाला आपला अंदाज सांगितला. रामाने रावणावर जो विजय मिळवला त्यात मारुतीचा फार मोठा वाटा आहे.

कोणत्याही कामाची तो खळखळ करीत नसे. लक्ष्मणाला लढाईत बाण लागला आणि संजीवनीचा पाला आणायला हवा असे सुषेण वैद्यांनी सांगितले. झाले! मारुती ताडकन् उठला आणि पर्वतावर जाऊन पोचला. कोणती वनस्पती ते ओळखता येईना. वेळ तर थोडा होता. परत जाऊन विचारून येणे शक्य नव्हते. मग अशा वेळी आपल्या शक्तीचा उपयोग करायचा नाही तर केव्हा?

त्याने सबंध डोंगरच उचलून आणला. रामाने आणि सर्वांनी केलेले कौतुक त्याने स्वीकारले, मानले. पण त्याला शक्तीची घमेंड मात्र कधीही वाढली नाही. शक्तीमुळे त्याच्यात फक्त जबर आत्मविश्वास निर्माण झालेला होता. तो उत्तम सेनानायक होता. सगळी वानरसेना त्याचा हुकूम मोठ्या आदराने पाळायची.

त्याची आपल्या कामावर फार निष्ठा होती. आपल्या धन्याची सेवा कशी करावी या प्रश्नाचे उत्तर: मारुतीने रामाची केली तशी कर्तव्य आधी, मग त्यापुढे इतर कशाचीही पर्वा नसे त्याला.

पण हे तो काम करू शकला स्वतःच्या बळसामर्थ्याच्या आधारावर. म्हणूनच मारुतीसारखे व्हायचे तर शरीरसंपन्नता हवी. ती नुसती मारुतीच्या देवळात जाऊन मारुतीला शेंदूर लावून आणि पूजा करून येणार नाही. त्यासाठी कसरत, व्यायाम करायला हवा. आणि अशी शक्ती प्राप्त झाली की तिचा योग्य उपयोग व्हायला हवा. म्हणून मारुतीच्या अंगी असलेले धैर्य, स्वामिनिष्ठा, स्वार्थत्याग, प्रेमळपणा, धाडसीपणा आणि नम्रता

या सर्वांचीही गरज आहे. हे सगळे होते म्हणूनच मारुती रामाचा एवढा लाडका होता. रामाच्या देवळात रामाच्या पायाजवळ मारुती नम्रतेने बसलेला नाही असे कधी दिसणारच नाही.

असा हा चैत्र महिना. निसर्गाचा उत्साह आपल्यात भरून टाकणारा. राम, मारुती यांच्यासारख्या श्रेष्ठ पुरुषांच्या जन्माने मोठेपण मिळालेल्या, गौरीच्या आगमनाने मुलींना आणि बायकांना वसंताची बहार लुटू देणारा. तो आपले रूप कसे दाखवतो?

चैत्राची पालवी आळस घालवी.

चैत्राची मर्जी, आनंदाची कारंजी.



# वैशाख

वंदे मातरम्

सुजलाम्, सुफलाम्, मलयजशीतलाम्

सस्यश्यामलाम् मातरम्, वंदे मातरम्

आपण नेहमी म्हणतो. आपण वंदन करतो ती ही आपली माता मातृभूमी. सुजलाम्–पाण्याने समृद्ध. पाणीसुद्धा चांगले, पवित्र. खळखळत वाहणाऱ्या नद्या. डोंगरपर्वतावरून झरझरत येणारे धबधबे, शांत संथ तळी, सगळे कसे तहान भागवणारे!

सगळीकडे वृक्षराजी. झाडाझुडुपांची सावली. आंब्याची, फणसाची, जांभळीची मोठमोठी झाडे. फळांनी बहरलेली, म्हणूनच तिचे वर्णन सुफला–छान छान फळे आपल्याला देणारी. भुकेल्या वाटसरूंची तहानभूक भागवणारी.

हिरव्यागार शेताडीतून, गवताचा वास नाकात भरून घेत जातो आपण. वारा झुळझुळ वहात राहतो. तो येतो मलय-पर्वतावरून आणि सगळ्याभर थंडपणा पसरून देतो. म्हणून त्याचे वर्णन मलयजशीतल. मलयपर्वतावर जन्म घेणारा तिथून निघणारा शीतल, थंड वारा.

आणि जमीन कशी? सस्यश्यामल. धान्याने, सस्याने श्यामल, काळी बनलेली. हिरवी काळी. हिरव्यागार गवताने धान्याने तिला आलेला हा सुंदर रंग.

अशी ही आपली भारतभूमी आणि तिला हे रूप देणारे

शेतकरी. चैत्र संपून वैशाख महिना येतो. तिसरी तिथी, तिसरा दिवस अक्षयतृतीयेचा. या दिवशी जे कराल, जे हाती घ्याल, जो निश्चय कराल तो अक्षय, कधीही क्षय न होणारा; कधीही नाश न पावणारा म्हणजेच नेहमी सफल होणारा.

मग शेतकऱ्यांनी आपल्या कामासाठी हाच दिवस निवडला. त्यांचे वर्ष सुरू होते याच अक्षयतृतीयेपासून. भारत हा शेतीप्रधान देश. तेव्हा हा महिना कृषिपूजेचे महत्त्व सांगणारा.

सुजलाम् म्हणून नुसतेच वर्णन करणे एवढेच का या शब्दांचे महत्त्व? जरा पूर्वीच्या काळची पुस्तके वाचली, प्रवास-वर्णने वाचली की लक्षात येईल, या वैशाखात काय करीत असत ते. वसंतऋतू असला तरीही ग्रीष्माचा उन्हाळा तापदायक होत असतो. तहानेने घशाला कोरड पडत असते. प्रवासी, व्यापारी कामासाठी बाहेर निघालेले असतात. एका गावाहून दुसरीकडे चाललेले असतात. त्यांना 'तहान भागवायची कशी?' असा प्रश्न पडतो. मग ते दूरवर नजर टाकतात. नजरेच्या टप्प्यात समोर दिसते एक झोपडी.

'पाणी असेल तिथे?'

झोपडीजवळ पोचतात. झोपडी कसली? झापांचे छप्पर घालून केलेला एक सावलीचा छोटासा आडोसा. त्यात पाण्याचे डेरे भरलेले.

'वा: छान!' प्रवाशांच्या तोंडून आनंदाचे उद्गार निघतात.

सावली मिळते, पाणी मिळते, आता पुढच्या प्रवासाला निघायला हरकत नाही. पण—

'पाणी प्यालो आम्ही. पैसे किती द्यायचे?'

'पैसे! अहो, ही पाणपोई आहे. तहानेल्या माणसाला जल-

दान करावं असं या वैशाखाचं महत्त्व वर्णन करताना सांगितलं आहे.'

'कोणत्या पुस्तकात?'

'असेल कुठल्यातरी. पण मला माझ्या वडिलांनी, त्यांना त्यांच्या, त्यांना त्यांच्या वडिलांनी, असं कितीतरी पिढ्यांपासून आम्हाला सांगितलं आहे. आम्ही काही शेती करीत नाही, पण आमच्याजवळ खूप विहिरी आहेत. म्हणून आम्ही हे पाणी पाजायचं काम करतो.'

'पण आम्ही इतके तहानेने व्याकुळ झालेले होतो तेव्हा तुम्ही पाणी दिलंत थंडगार. त्याचं मोल दिल्याशिवाय...'

'हे पहा, तुम्हाला पाणी पिऊन तृप्त झाल्यासारखं वाटलं ना?'



'म्हणजे काय? अहो, इतके थकलो होतो आम्ही, पुन्हा जीवदान मिळाल्यासारखं वाटलं.'

'मग हे तुम्हाला जे वाटलं ना, ते तुमचं समाधान हीच आम्ही दिलेल्या पाण्याची किंमत. अहो, हे समाजासाठी थोडं काही करणं. त्याचं ऋण फेडणं. तुम्ही व्यापार करून ते फेडता. आम्ही आम्हाला शक्य आहे ते करून, पाणपोई चालवून फेडतो. आमच्या विहिरी-तळ्यात पाणी ओतायचे पैसे पाऊस घेतो का?'

प्रवासी पुन्हा पुन्हा आभार मानून निघून जातात. अशा या पाणपोया पूर्वीच्या काळी जागोजागी असत. अहिल्यादेवी होळकर यांनीही ठिकठिकाणी अशा पाणपोया उघडल्या होत्या. प्रवाशांसाठी उतरायला, राहायला धर्मशाळा बांधल्या होत्या.

असा हा वैशाखाचा उन्हाळा सुरू झाला की दक्षिण भारतातले लोक काय करतात--एखाद्या गरीब माणसाला एका पिंपळाच्या पारावर बसवून ठेवतात. त्याला काही वेतन देतातः तो येणाऱ्या जाणाऱ्या, तहानेनें व्याकुळ झालेल्या लोकांना गूळ आणि पाणी देतो. पाणपोईच हीसुद्धा एक प्रकारची.

माणसांप्रमाणेच गुरांना पाणी पिण्यासाठी देखील ठिकठिकाणी पाणवठे तयार करतात. हे काम आपण कुणीही आपल्या घरात देखील करू शकतो. माणसांची आणि गुरांची तहान भागवणे एवढेच आहे हे काम. त्यासाठी फार पैसा नको किंवा मोठी श्रीमंती नको. एखाद्याची जरी तहान भागली तरी आपल्यापुरते ते पुरेसे आहे.

ग्रीष्माचा ताण कमी करण्याची आणखी एक गमतीची पद्धत आहे. बंगाल, ओरिसा प्रांतातून कृष्णाची मूर्ती रोज पालखीतून नरेंद्र तलावाकडे वाजत गाजत नेतात. नौकेत बसवून

तलावात फिरवतात. चंदनाचे तेल चोळून मूर्तीला आंघोळ घालतात. म्हणजे हा उन्हाचा ताप सहन करण्यासाठी आपल्याला जे करावेसे वाटतात ते सोपस्कार देवाच्या मूर्तीला करायचे.

सर्वसामान्य माणसे एकमेकांसाठी काहीतरी करायला झटतात. पण या सर्वांवर राज्य करणारे राजे? ते कसे होते? रामासारखा आदर्श राजा होता आणि प्रजेला छळणारे राजेही होते. कितीतरी क्षत्रिय राजे एकेकाळी खूप माजले होते. गरीब-गुरिबांना त्रास द्यायचा, त्यांची गुरेढोरे पळवायची, त्यांना मारायचे, यातच त्यांना मोठेपणा वाटायचा. विशेषतः यज्ञत्याग करणाऱ्या ऋषींना हे उन्मत्त राजे फारच त्रास देऊ लागले होते. फारच दुष्टपणा वाढला की त्या दुष्टांचा नाश करायला कुणीतरी एखादा श्रेष्ठ पुरुष जन्म घेतोच.

क्षात्रसत्तेचा असाच जुलूम फार वाढला तेव्हा त्या सत्तेशी सामना देण्यासाठी वैशाख शुद्ध तृतीयेला परशुराम जन्माला आला. हा ऋषिपुत्र. पण या क्षत्रियांशी लढायचे तर क्षात्रशक्ती-चीच उपासना करायला हवी. ती शक्ती आपल्याजवळ नसेल तर आपण त्यांच्याशी लढणार कसे?

मग परशुरामाने ते सामर्थ्य मिळवले. आपले शस्त्र परशू, तळपणाऱ्या सूर्याच्या तेजासारखे त्याने तळपते ठेवले आणि त्या शस्त्राच्या आधाराने दुष्ट,अन्यायी क्षत्रियांचा नाश केला.ज्या शक्ती-शी लढायचे त्यापेक्षा जास्त प्रभावी शक्ती आपण मिळवली पाहिजे हे परशुरामाने ओळखले. मोठ्या मेहनतीने त्याने ती मिळवली होती आणि अन्यायाविरुद्ध लढायचे ही न्यायाची भावना त्याच्या मनात होती. मग त्याला यश मिळाल्याशिवाय कसे राहील ?

वैशाखातला आणखी महत्त्वाचा दिवस म्हणजे नृसिंहजयंती.

नृसिंह म्हणजे सिंहमानव. डोके सिंहाचे, शरीर माणसाचे. सिंहाची शक्ती असलेला माणूस. माणसाच्या अंगी अशी सिंहाची शक्ती केव्हा येते? तो सिंहासारखा वागतो तेव्हा. सिंह हा सगळ्या जंगलचा राजा. राज्यातल्या सगळ्या प्राण्यांवर तो पित्याप्रमाणे प्रेम करतो. सर्वांना आपल्या मुलाबाळांप्रमाणे मानून त्यांचे रक्षण करतो. रक्षणकर्त्री शक्ती सिंहाची आणि प्रेमळपणा माणसाचा.

पण मानवी राजांनी हे जंगलच्या राजाचे देखील वागणे आपल्यात कुठे उतरवले होते ? ते प्रजेचा खूप छळ करीत. हिरण्याक्ष राजा असाच छळवादी. विष्णूने त्याचा नाश केला. पण त्याचा भाऊ हिरण्यकश्यपू याने त्याच्यावर कडी केली. प्रजेला तर छळतच होता पण विष्णूने आपल्या भावाला मारले म्हणून तो विष्णूशीही वैर करायला लागला.

त्याने खूप तपश्चर्या करून वर मिळवला होता. 'दिवसा किंवा रात्री जमिनीवर किंवा आकाशात मनुष्य किंवा पशू यांच्याकडून मरण येणार नाही.' हा वर मिळाला आणि तो उन्मत्त झाला. 'आता माझं कोण काय करणार ? मी अमर झालो !' या गर्वाने फुगला. वाटेल तसे अत्याचार करायला लागला.

या हिरण्यकश्यपूचा मुलगा प्रल्हाद. प्रल्हाद वयाने लहान होता पण त्याला आपल्या वडिलांचा दुष्टपणा मुळीच आवडत नसे. तो त्यांना, आपल्या भावांना समजावून सांगे. त्याचे भाऊ अनुऱ्हाद, संऱ्हाद, ऱ्हाद, शिबी, बाष्कल हे पाचजण एकीकडे आणि तो एकीकडे. ते दुष्टपणा करीत. हा त्यांना अडवी. ते कुणाला त्रास द्यायला लागले की हा मधे पडे. स्वतः मार खाई.

विष्णू म्हणजे सत्य, प्रेम, दया असे त्याला वाटे. म्हणून तो विष्णूची भक्ती करी.

पण विष्णू तर हिरण्यकश्यपूचा शत्रू. आपल्या मुलाने आपल्या शत्रूची भक्ती करावी ?

मग हिरण्यकश्यपूने प्रल्हादालाच छळायला सुरवात केली. प्रल्हादाने खूप छळ सहन केला. पण तो म्हणाला की, 'मी खऱ्याची बाजू सोडणार नाही. चांगल्याचीच बाजू धरीन. तुम्ही पण माझ्या-प्रमाणेच वागा. सगळी प्रजा सुखी होईल. तुम्हाला खरा आनंद मिळेल.'

पण हिरण्यकश्यपू गर्वाने फुगला होता. त्याला काय हे पटणार थोडेच? उलट प्रल्हादाची टिंगल करीत तो म्हणाला, 'अरे, मी तर तुझ्याप्रमाणे वागणार नाहीच. पण तू सुद्धा माझा मुलगा असून माझं ऐकत नाहीस, माझ्या शत्रूची, त्या विष्णूची भक्ती करतोस, म्हणून तुलाच मी मारून टाकणार आहे! येईल का तुझा विष्णू तुला सोडवायला इथं?'

'बाबा, तो यायचा काय प्रश्न आहे? तो आहेच इथं!'

'इथं? कुठं?'

'कुठं काय? सगळीकडे! तो मातीत आहे, पाण्यात आहे, जमिनीवर आहे, आकाशात आहे, लाकडात आहे, दगडात आहे. तो फुलात आहे, फळात आहे, वाऱ्यात आहे, झऱ्यात आहे–'

'पुरे पुरे! हा: हा:! या समोरच्या खांबात आहे? माझ्या राजवाड्यातल्या मी बांधलेल्या खांबात?'

'हो.'

पुन्हा हिरण्यकश्यपू मोठ्याने हसला. आणि खांबावर त्याने लाथ मारली. दिवस नव्हता, रात्र नव्हती, वेळ होती मधलीच.

आकाश नव्हतं, जमीन नव्हती. जागा होती खांब, माणूस नव्हता, पशू नव्हता– होतं दोघांचं मिश्रण.

खांबातून आला नृसिंह. त्याने हिरण्यकश्यपूला ठार मारलं. दुष्टांनी आपला नाश होऊ नये म्हणून काळवेळ, स्थळ यांच्या कितीही पळवाटा काढल्या तरी चांगले नेहमीच वाईटावर मात करते. कारण चांगल्यामुळेच जग टिकते.

प्रल्हादाचेच म्हणणे हे. ते खरे ठरले. वैशाख शुद्ध चतुर्दशीचा हा दिवस. दुष्टाचे निर्दालन झाले म्हणून तो नृसिंह-जयंतीचा दिवस मानला जाऊ लागला. विशेषतः दक्षिण भारतात. मद्रासेत काही ठिकाणी नृसिंहाची देवळे सुद्धा आहेत. हिरण्यकश्यपू दुष्ट, राक्षस. त्याचा मुलगा प्रल्हाद इतका चांगला, प्रेमळ कसा?



जन्मावर माणसाचे विचार ठरत नाहीत. माणूस वाईट परिस्थितीत जन्माला आला तरी स्वत:ला चांगले बनवू शकतो. चांगला वागू शकतो. परिस्थिती बदलायची, परिस्थितीवर मात करायची हेच तर माणसाचे मोठेपण! तुम्ही चांगले व्हायचा प्रयत्न करा. चांगल्या शक्ती तुम्हाला साथ देतात. प्रल्हादाने हे प्रत्यक्षच दाखवून दिले नाही का आपल्याला? ईश्वर म्हणजे चांगली शक्ती. ती नेहमी आपल्याभोवती वावरतच असते. फक्त आपण तिचा आधार घ्यायला हवा.

वैशाखी पौर्णिमा म्हणजे तर पौर्णिमेचे चांदणे जगात पसरवणाऱ्या बुद्धाचा ज्ञानप्राप्तीचा दिवस. सिद्धार्थ एक राजपुत्र. राजाने या आपल्या मुलाला दु:खाचे, दारिद्र्याचे दर्शन देखील होऊ दिले नाही. पण एक दिवस रस्त्याने जाताना त्याला दिसले एक म्हातारे माणूस,एक प्रेत. दारिद्र्य,मरण हे पण जगात असते हे कळले त्याला.

'हे असं का असावं? जगात सर्वांना सुखी का होता येऊ नये? या दु:खांवर उपाय काय?'

राजपुत्र राजवाडा सोडून गेला. खूप हिंडला. भटकला. सगळे जग त्याने बघितले. एका पिंपळाच्या झाडाखाली बसला. ध्यानस्थ. आणि त्याला एकदम समजले, ज्ञान प्राप्त झाले–

या दु:खांवर उपाय म्हणजे ज्ञान, शिक्षण, शुद्धजीवन.

साध्या पिंपळाचा झाला बोधिवृक्ष. ज्याच्याखाली बोध झाला तो वृक्ष. झाडाखाली बसलेल्या बुद्धाभोवती, ज्ञान मिळवण्यासाठी इतर माणसे जमू लागली. ते बनले बुद्धाचे शिष्य. बुद्ध शिकवू लागला शिष्यांना.

लोकांना त्रास देणे म्हणजे हिंसा. त्यांना प्रेमाने वागवणे म्हणजे अहिंसा. हिंसा शरीराची नको. मनाची पण नको. हे नुसते


सांगायचे नाही. तसे वागायचे. इतरांना वागायला शिकवायचे.

शिष्यांना पटू लागले. झाडाखालची जागा पुरेना. सर्वांच्या मधे राहून विचार करायला स्वस्थपणा मिळेना.

मग शोधल्या गुहा, डोंगरातल्या गुफा. त्या कोरल्या. तिथे राहण्यासाठी बांधल्या खोल्या. दगडी, नैसर्गिक. ते बौद्धांचे विहार. बुद्धाची शिकवण ऐकण्यासाठी मोठमोठी सभागृह डोंगरात कोरली. त्यांना नाव दिले चैत्य. आपण ऐकतो ते इतरांना त्या वेळी ऐकता नाही आले तर ?

मग बुद्धाची शिकवण त्या गुफांमध्ये, लेण्यांमध्ये कोरली गेली त्यांच्या त्या वेळच्या भाषेत. पाली भाषेत. इतकी वर्षे लोटली; आजसुद्धा आपण त्या लेण्यातली वचने वाचू शकतो.

बुद्ध म्हणजे जागा झालेला जीव. आपल्याला आलेली



जागृती. ते ज्ञान त्याने इतरांना दिले. ज्ञानाच्या अशा पाणपोया डोंगराडोंगरातून उघडल्या लेण्यांच्या रूपाने.

सेवा करा, दुसऱ्यांचे दुःख दूर होते. आपल्याला सुख लाभते. सगळे गोष्टीतून सांगितले तर सामान्य माणसांना पटते. मग कथा रचल्या गेल्या–जातक कथा. पारमितांच्या कथा. त्या कथा म्हणजे सुखाने जगण्याचा आणि इतरांना सुख देण्याचा मंत्र सांगणाऱ्या कथा. पण तो मंत्र नुसता तोंडाने घोकायचा नाही. तो मनात पक्का ठासून बसवायचा. त्यासाठी हवे ज्ञान, शिक्षण. ते मिळेल त्या प्रयत्नाने घ्यायचे.

बुद्धाच्या शिकवणीची आठवण देणारी ही वैशाखी पौर्णिमा म्हणजेच बुद्धपौर्णिमा. दुःखाचा ताप नाहीसा करून सुखाचे, ज्ञानाचे, सेवेचे, अहिंसेचे वारे जगभर खेळवणारा. रखरखीत वैशाखाला बोधिवृक्षाची सावली देणारी ही बुद्धजयंती.

चांगल्यावाईटाच्या संघर्षात, लढाईत, चांगल्याचा का आणि कसा विजय होतो हे दाखवून देणारा हा वैशाख महिना. दुसऱ्याची अडचण जाणून त्याला मदत करायला सांगणारा हा वैशाख महिना. तहानेल्याला पाणपोईसारखा वाटणारा !

शेतकरी आपल्या कामाला म्हणूनच या महिन्यात सुरुवात करतात. कृषिपूजा ही खरी देवपूजा. सुजला, सुफला, सस्यशामला धरती. तिची पूजा करून, तिला फळती, फुलती करून साऱ्या मानवाला तृप्त करण्याच्या सत्कार्याची सुरुवात होते वैशाखाने. कारण सेवेचा, सत्याचा विजय होतो हे सांगणारे मलय पर्वतावरचे वारे वाहतात याच महिन्यात !

# ज्येष्ठ

थंड वाऱ्याच्या झुळुका अजूनही येत असतात. पण वाऱ्याबरोबर येणारा आंब्याच्या मोहराचा मादक गंध आता ओसरलेला असतो. कोकिळेचा पंचम स्वरही क्वचित मधूनच कुठे तरी ऐकू येतो. कच्च्या कैऱ्यांच्या आंबटगोड वासाने आता तोंडाला पाणी सुटू लागते. वाऱ्याने झाडावरून टपकन् पडलेली कैरी वेचायची, फोडींना तिखटमीठ लावायचे आणि मिटक्या मारीत सर्वांनी मिळून ती खायची. पंचपक्वान्ने देखील त्या चवीपुढे तुच्छ वाटतात.

शाळांना सुट्टयाच असतात. कुठे कुठे बाहेरगावची मुले पाहुणी आलेली असतात एकमेकांकडे. मग भटकायला भरपूर वेळ आणि सोबत.

दुपारी खूप भटकून घरी यावे तर घरात कुठे मुरांब्याच्या, गुळांब्याच्या पाकाचा गोड वास तर कुठे लोणच्याच्या फोडणीचा खमंग वास. सगळे कसे चविष्ट, उत्साह देणारे. या सगळ्यात गुंग होऊन इतके झपाट्याने दिवस ओसरतात की हिरव्या कच्च्या टणक कैऱ्यांची जागा केशरी आंब्यांनी केव्हा घेतली ते समजतही नाही. 'हापूस पक्का हापूऽऽस–' अशी आंबेवाल्याची ललकारी कानावर येते. चोखायचा आंबा, चिरायचा आंबा, रसाचा आंबा, किती तऱ्हा. हापूस, पायरी, देवगड, बलसाड–बाबांबरोबर जावे आणि बाबा कसे वेगवेगळे आंबे नेमके निवडतात ते बघत राहावे, शिकून घ्यावे.

आई, आजी मध्येच बोलता बोलता म्हणतात, 'दशहराचं वाण द्यायचं आहे.' 'दशहराचं वाण? म्हणजे?' प्रज्ञानें विचारले.

दशहरा म्हणजेच गंगोत्सव. गंगा पृथ्वीवर अवतरली त्याची आठवण करून देणारा हा सण. ज्येष्ठ महिन्यातला.

'गंगा पृथ्वीवर आणली भगीरथानं का? कशासाठी? कशी?'

रामायणातल्या गंगाख्यानात सगळे वर्णन आहे याचे. ऐका हं—

ईक्ष्वांकु कुलात सगर नावाचा एक प्रख्यात राजा होता. त्याने एकदा अश्वमेध यज्ञ करायचे ठरवले. यज्ञाचा अश्व म्हणजे घोडा आपल्या सेनेसह पाठवून दिला. घोडा सैन्यासह संचार करू लागला. ज्यांना तो अडवता आला नाही ते राजे सगराचे मांडलिक. सगर सार्वभौम राजा. पण बराच संचार होऊनही घोडा परत आला नाही. तेव्हा सगराचे आठ हजार मुलगे त्याच्या शोधासाठी गेले. तेही परत आले नाहीत. मग सगराचा नातू अंशुमान आपल्या काकांच्या शोधासाठी निघाला.

सगळे गेले कुठे ? घोडा गेला कुठे ? शोधता शोधता त्याला कपिलऋषींच्या आश्रमाजवळ घोडा सापडला.

'घोडा तर सापडला, पण माझे काका कुठं गेले सगळे ?'

कपिलऋषींनी सांगितले, 'ते माझ्या रोग्याला बळी पडले. इथंच ते सगळे भस्म होऊन पडले आहेत.'

अंशुमानाला ते ऐकून धक्काच बसला.

'मुनिराज, मला काही करता येईल का त्यांच्यासाठी ?'

'हे बघ, गंगेचा प्रवाह त्यांच्या या भस्मावरून वहात गेला तर त्यांचा उद्धार होईल.'

अंशुमानाला आनंद झाला. अश्वमेधाचा अश्व घेऊन तो

परत आला. त्याने यज्ञाची पूर्तता केली आणि आपल्या चुलत्यांच्या उद्धाराच्या कामाला लागला.

त्याने खूप प्रयत्न केला पण त्याला गंगेला प्रसन्न करून घेता आले नाही. अंशुमानाचे प्रयत्न फसले. त्याच्यामागून त्याचा मुलगा दिलीप यानेही पुष्कळ प्रयत्न केले पण त्यालाही गंगा प्रसन्न झाली नाही.

दिलीपाच्या मागून आला त्याचा मुलगा भगीरथ. हा अत्यंत जिद्दीचा. निराश न होणारा. यानें शिकस्तीचे प्रयत्न केले. असंख्य अडचणी आल्या. नानातऱ्हेची संकटे आली. पण तो डगमगला नाही. थकला तरी त्याने प्रयत्न सोडले नाहीत. त्याच्या या प्रयत्नांवर गंगा संतुष्ट झाली आणि तिने पृथ्वीवर येण्याचे कबूल केले.



गंगा म्हणाली, 'अरे, तुझ्या या प्रयत्नांनी मी संतुष्ट झाले आहे. पण मी जर पृथ्वीवर आले तर पृथ्वीवरचे लोक आपली पापं धुवून काढण्यासाठी माझ्यात उतरतील आणि त्यांची पापं माझ्यात शिरतील.'

भगीरथ म्हणाला, 'हे गंगामाते, तू मुळातच पवित्र आहेस. शिवाय साधुसंतांचा सहवास तुला लाभेलच. लोकांची पापं तुझ्या जलाच्या स्पर्शानंच नाहीशी होतील. तुझ्यात अपवित्रपणा कसा राहील? शिवाय काही अंश शिल्लक राहिलाच तर तो संतांच्या सहवासानं पार निघून जाईल.'

गंगेने भगीरथाची अशी सर्व तऱ्हेने परीक्षा पाहिली आणि मग संतुष्ट होऊन ती स्वर्गातून विष्णूच्या पायांपासून निघाली, शंकराच्या मस्तकावरून खाली वहात वहात हरिद्वार, प्रयाग, वाराणशी वगैरे स्थानांवरून पूर्वसमुद्राला जाऊन मिळाली. सगराच्या सर्व पुत्रांचा असा तिच्या प्रवाहामुळे उद्धार झाला.

ज्येष्ठ शुद्ध दशमीला असे गंगेचे पृथ्वीवर आगमन झाले. हा गंगावतरणाचा दिवस. म्हणून हा गंगोत्सव. दहा पातकांचा ही नाश करते म्हणून तिला म्हणतात दशहरा. त्याची आठवण म्हणून दशहराचे दान.

'दशहरा– ही दहा पापं म्हणजे कोणती?' संदीपलाही उत्सुकता लागली आता.

'कठोर बोलणं, खोटं बोलणं, चहाडी करणं, खोटच्या वल्गना करणं, चोरी, हिंसा, अनीतीचं आचरण, दुसऱ्याची वस्तू लुबाडणं, वाईट विचार मनात आणणं आणि दुराग्रह धरणं.'

'या तर रोजच्याच गोष्टी. मग पाप म्हणजे वेगळं काय असतं?' प्रज्ञा म्हणाली. 'अरे, वाईट गोष्ट म्हणजे पाप. ते काही

फक्त पोथ्या पुराणात नसतं. या दहा वाईट गोष्टी आपल्या हातून रोजच्या व्यवहारात, रोजच्या वागण्यातही घडू शकतात की नाही? या घडू दिल्या नाहीत की मन आणि वर्तन कसं राहील? शुद्ध, पवित्र.'

'कुणासारखं ?'

'गंगेसारखं. हीच गंगापूजा. हेच खरं गंगास्नान आणि गंगेला प्रसन्न करायचं तर त्यासाठी हवेत प्रयत्न भगीरथासारखे, अडचणी-वर मात करून, संकटांना न जुमानता आपलं ध्येय प्राप्त करून घेण्याचे प्रयत्न ते भगीरथ प्रयत्न.'

नुसती फळे किंवा इतर काही दान देणे आणि नुसते गंगा-स्नान करणे, केव्हातरी वर्षातनं एकदा जेष्ठ महिन्यात, हे गंगेला आवडेल की अशी कोणतीच पापे न करता स्वतः पवित्र आणि चांगले राहून तिला अशुद्ध न करण्याने ती खरी प्रसन्न होईल.

गंगेला विचारले तर ती खळखळत हसून म्हणेल, 'तुमचं तुम्हीच शुद्ध व्हा की म्हणजे माझी जबाबदारी कमी होईल. मी दुसऱ्या कामाला मोकळी होईन. कुठली दुसरी कामं ? देशाला सुजला, सुफला बनवण्याची.'

पण तरीही गंगेच्या पवित्रतेची, तिच्या पृथ्वीवरच्या आव-तरणाची आठवण म्हणून काहीतरी उत्सव करणेही लोकांना आवश्यक वाटतेच. ठिकठिकाणचे लोक गंगेचा असा उत्सव करतात. या उत्सवासाठी म्हणून कितीतरी स्नानयात्रा भरतात. गंगेचा हुगळी फाटा जिथे समुद्राला मिळतो त्या संगमाशी एक बेट आहे. त्याचे नाव सागर. त्या संगमाला म्हणूनच नाव पडले गंगासागर. या बेटाच्या दक्षिण किनाऱ्यावर अशीच एक फार मोठी स्नानयात्रा भरते. बंगाल, ओरिसा, दक्षिण देश, नेपाळ,

पंजाब, उत्तर भारत इत्यादी ठिकाणांहून लक्षावधी यात्रेकरू इथे जमतात. गंगासागरावर कपिलाचे देवालय आहे. देवालयासमोर राम, हनुमान आणि कपिल यांच्या सुमारे चार हात उंचीच्या मूर्ती आहेत. देवालयाच्या मागे सीताकुंड नावाचा गोडचा पाण्याचा एक तलाव आहे. त्यात बाराही महिने तुडुंब पाणी भरलेले असते. यात्रेकरू ते पाणी पिऊन संतुष्ट होतात.

'जय जय जगन्नाथ–' आकाश दुमदूमून टाकणाऱ्या आरोळ्या उठतात. गरीब, श्रीमंत, जात-पात कसलाही भेदाभेद नाही. सगळे या रथातल्या जगन्नाथाचे भक्त. सर्वांनी दर्शन घ्यायचे. रथ ओढायचा. जेष्ठ पौर्णिमेला ओरिसा प्रांतातल्या पुरी इथे प्रचंड स्नानयात्रा भरते आणि नंतर १७ दिवसांनी ही जगन्नाथाच्या रथाची मिरवणूक निघते.

कुठलाही भेद न मानता सर्वांनी मिळून एखादे चांगले काम करायचे त्याला म्हणायचे 'जगन्नाथाचा रथ हाकणं.' या पुरीतल्या रथयात्रेवरूनच असे म्हणतो आपण. भारताचा विकास करायचा, उत्कर्ष साधायचा हे काम प्रचंड, जगन्नाथाचा रथ चालवण्याइतके ! ते प्रत्येक भारतीयाने आपापला योग्य तो हात लावून करायचे. गरीब श्रीमंतीचा भेद नाही, जातीधर्माचा भेद नाही कारण देश सर्वांचा आहे, त्याचे काम हे सर्वांचे काम आहे.

भगीरथाने अत्यंत परिश्रम करून जिद्दीने स्वर्गातून गंगा पृथ्वीवर आणली आणि सावित्रीने तशाच जिद्दीने आणि चिकाटीने यमाकडून सत्यवानाचे प्राण परत मिळवले. ही दोन्ही माणसे धैर्य, चिकाटी आणि जिद्द यांचे उत्तम नमुने.

भद्र देशातला राजवाडा. राजा अश्वपती आणि त्याची राणी. मुलगी सावित्री मोठी झाली होती.

'आता सावित्रीच्या लग्नाचं बघायला हवं.' राणी म्हणाली.

'हो. तिला धाडतोच आता वरसंशोधनासाठी.' अश्वपती राजानेही तोच विचार केला होता.

'बरोबर कोण जाईल ?' आईला मुलीची काळजी.

'आपले वृद्ध अमात्य अनुभवी आहेत. ते जातील तिच्या-बरोबर.'

कुठल्यातरी राजाचा मुलगा, एखादा राजपुत्र आपण शोधून आणावा आणि मग त्याच्याशी आपण सावित्रीचे लग्न लावून द्यावे असे काही अश्वपती राजाला वाटले नाही. सावित्रीने स्वतःच स्वतःचा नवरा शोधावा हे त्याचे मत. राणीला, सावित्रीच्या आईलाही तेच योग्य वाटले. फक्त एकटी मुलगी जायला नको, सोबतीला कुणीतरी हवे ही काळजी घ्यायला तिने सांगितले. स्वतःचा नवरा स्वतः शोधायचा. केवढी जबाबदारी. पण सावित्रीने ती पत्करली. ती अनेक देशात हिंडली. कितीतरी राजपुत्र तिने बघितले. पण एकही तिच्या पसंतीस उतरला नाही.

शेवटी हिंडता हिंडता ती एका अरण्यात आली. शाश्व देशाचा राजा द्युमत्सेन याचे राज्य त्याच्या हातून गेले होते. तो या अरण्यात रहात होता एक आश्रम बांधून. आश्रमात त्याच्या बरोबर होती त्याची राणी. दोघेही वृद्ध. आंधळे.

पण त्यांचा मुलगा तरुण होता. सामर्थ्यवान होता. सदा-चरणी, सत्यवचनी होता. नावच होते त्याचे सत्यवान. सावित्रीला तो आवडला.

'तो गरीब आहे. तू आहेस श्रीमंत राजकन्या.'

'असेना तो गरीब. मलाही त्याच्याबरोबर गरिबीत राहता येईल. श्रीमंतीला माझ्या दृष्टीनं किंमत नाही. मी गुण श्रेष्ठ

मानते.'

'राजवाड्यातून निघून येऊन अरण्यात आश्रमात राहावं लागेल.'

'त्याला काय झालं! आपली आवडती माणसं जवळ असली की कुठंही राहण्यात आनंदच वाटतो.'

अश्वपती राजाला सावित्रीची निवड पसंत पडली. लग्नाची तयारी जोरात सुरू झाली. आणि–

'नारायण नारायण' वीणेच्या सुरांबरोबर शब्द ऐकू आले.

'या नारदमुनी.'

'अश्वपतिराजा, सावित्रीच्या लग्नाची तयारी करतो आहेस म्हणून तुला मुद्दाम सांगायला आलो.'

'काय ते?'

'विवाहानंतर एकच वर्षानं सत्यवानाला मरण येणार आहे.'

राजाराणी अस्वस्थ झाली. पण सावित्री आपला निश्चय बदलेना.

लग्न झाले. सावित्री सत्यवानाबरोबर रानात राहू लागली. सासूसासऱ्यांची सेवाशुश्रूषा करू लागली.

एक वर्ष लोटले. सत्यवानाचा मृत्यू जवळ आला. सावित्री त्याच्याबरोबर त्या दिवशी रानात गेली. लाकडे तोडता तोडता सत्यवान घेरी येऊन पडला. वडाच्या झाडाखाली सावित्री त्याचे मस्तक आपल्या मांडीवर घेऊन बसली.

यमराज प्राण नेण्यासाठी आला. त्याच्या मागोमाग सावित्री चालू लागली.

'तू कशाला मागे येतेस ?'

'जिथं पती तिथं पत्नी. मला त्यांच्याबरोबरच राहणं भाग

आहे.'

यमानं तिच्याशी खूप युक्तिवाद केला. पण सावित्रीनं त्याच्या प्रश्नांना तशीच उत्तरं दिली. तिच्या धाडसावर, हुशारीवर यम संतुष्ट झाला. म्हणाला, 'तुला हवं ते मागून घे.'

सावित्रीनं सासऱ्याचं राज्य, त्यांची दृष्टी, आपल्या वडिलांना पुत्र असे अनेक वर मागितले. यम 'हो' म्हणाला. शेवटी एक वर मागायचा राहिला. सावित्री म्हणाली, 'मला शंभर पुत्र होऊ देत.'



यम आधीच्याप्रमाणेच म्हणाला, 'हो.' आणि शब्दात पकडला गेला. सावित्रीला मुलगे व्हायचे म्हणजे सत्यवानाला जिवंत करणं भागच पडलं.

सत्यवानाला घेऊन सावित्री परत रानात आली.

सावित्री यमाला भ्याली ? नाही. त्याच्या प्रश्नांना उत्तरं देताना गडबडली ? नाही.

सत्यवानाच्या गरिबीला कंटाळली ? नाही. सावित्रीचा वर कुणी शोधला ? तिनं स्वत:.

अशी ही सावित्री. स्वत:च्या आयुष्याचा निर्णय स्वत: घेणारी. तडफदार. संकटात न डगमगणारी. गरिबीत घरच्या माणसांप्रमाणे गरीब होऊन सुखासमाधानात राहणारी. मृत्यूशी देखील झुंज घेणारी. सावित्री जगावेगळी नव्हती. सर्वसाधारण सर्व मुलींसारखीच. पण तिने हे सगळे गुण मिळवले. स्वत:च्याच कर्तृत्वाने.

आपल्याच कर्तृत्वानं आपण आदर्श होऊ शकतो याचंच उदाहरण घालून दिलं सावित्रीनं.

या सावित्रीच्या गुणांची आठवण, खरं तर, क्षणाक्षणालाच मनात ठेवायला हवी. पण एक दिवस जेष्ठ पौर्णिमेला सावित्रीनं जे काही केले त्याची आठवण करायची आणि वर्षभर मनात त्याची उजळणी करायची या कल्पनेनं स्त्रिया वटसावित्री व्रत करतात. पौर्णिमेच्या आधी दोन दिवस उपवास करतात कारण सावित्रीला रानात उपवास घडला होता. सत्यवान वटवृक्षाखाली बेशुद्ध पडला होता म्हणून वटवृक्षाची पूजा करतात. मृत्यूचे फेरे असावेत तसे दोराचे फेरे वडाभोवती गुंडाळतात. पूजा करतात. हेच सावित्री व्रत आणि वटपौर्णिमेची वडाची पूजा.

जेष्ठ महिना असा गंगेचे पावित्र्य आणि जगन्नाथाच्या रथाचे महत्त्व सांगणारा. भगीरथाच्या प्रयत्नांचे आणि सावित्रीच्या श्रेष्ठत्त्वाचे उदाहरण पुढे ठेवणारा. या गुणांची जोपासना आप-

ल्यात करायलाच हवी ; तरच आपण माणूस म्हणून जगायला पात्र ठरू, असे सांगणारा.

जगायचे तर सगळीच नुसते जगतात. पण श्रेष्ठ माणूस म्हणून जगायचे तर व्हावे भगीरथ आणि सावित्री. गंगेसारखे पवित्र जीवन घालवावं आणि महान् कार्याचा जगन्नाथाचा रथ चालवावा.

❋ ❋

# आषाढ

आषाढमासी प्रतिवर्षी येती
आकाशमार्गी नवमेघपंक्ती
नेत्रेचि येतो मग पावसाळा
हे सृष्टीचे कौतुक जाण बाळा—

सृष्टीचे कौतुक. वेगवेगळ्या रूपाने सृष्टी आपल्याला मोहून टाकीत असते. जेष्ठ सरतो. झाडामाडातून, डोंगर-पठारांवरून वाहणारा वारा जणू अंग आक्रसून घेतो. डोंगरांच्या गुफांमधून आणि झाडांच्या ढोलीतून लपून बसतो. हवा कुंद होते. ढग आकाशालाच जणू पांघरूण घातल्यासारखे वेढून टाकतात. कापसासारख्या पांढऱ्या ढगांच्या पुंजक्यांचा रंग बदलतो. पोटात साठवलेल्या पाण्याच्या भाराने ते जड होऊन अगदी खाली आल्यासारखे वाटतात. त्याच पाण्याचा रंग त्यांना काळे वनवतो. हे काळे ढग पाहून मोरांना अतिशय आनंद होतो. आपला रंगीत पिसारा फुलवून ते नाचू लागतात. पावसात भिजण्याच्या भीतीने छोटी चिमणीपाखरे घराच्या वळचणीला, झाडांच्या फांद्याआड दडून बसतात.

लहान मुलांना मात्र मोरासारखेच नाचावेसे वाटते.

'येरे येरे पावसा, तुला देतो पैसा' हे गाणे अंगणाअंगणात घुमू लागते.

उन्हाने तापलेल्या पृथ्वीबरोबर सर्वांनाच पावसाची तहान

लागलेली असते. पाणी हवं, पाणी हवं, सर्वांची एकच मागणी. हा पाऊस येईल आणि वर्षभराची तहान भागवील म्हणून त्याची इतकी प्रतीक्षा.



आषाढापासून पुढचे चार महिने म्हणजे चातुर्मास—वेगळे वागायचे, वेगळ्या खाण्यापिण्याचे, वेगळ्या हिंडण्याफिरण्याचे. निसर्गानं दिलेलं ऋतूचं आव्हान आणि आवाहन दोन्ही स्वीकारायची असतात.

खेड्यापाड्यात झापांनी घरं शाकारली जातात. गुराढोरांना पावसापाण्यापासून आडोसा तयार केला जातो. दाणागोटा साठवून ठेवायला सुरवात होते. पावसाळ्यापुरती बेगमी केलेल्या मुंग्या आता वारुळात जाऊन स्वस्थ बसतात. इरली विणण्याचं काम

संपत आलेले असते. पानांची विणलेली ही इरली डोक्यावर घेऊनच आता पावसात भाताची पेरणी करायची असते.

शहरात छत्र्या आणि रेनकोटांच्या खरेदीसाठी दुकानात झुंबड उडते. रस्त्यात 'छत्री दुरुऽऽस्त' वाल्याच्या आरोळ्या घुमू लागतात. माळ्यावरून जुन्या मोडक्या छत्र्या खाली काढल्या जातात. पावसाशी दोन हात करायची तयारी होते. पण ही लढाई ज्याच्याशी करायची तो प्रतिस्पर्धी मात्र हवाहवासा वाटणारा असतो. ही लढाई दोघांनाही आनंद देणारी, खूष करणारी असते.

ही तयारी होताहोताच उगवते आषाढ शुद्ध एकादशी. मुलांना ओढ लागते साबूदाण्याची खिचडी, रताळ्याच्या फोडी, तूप, खजूर, राजगिऱ्याच्या लाडवांची. आई म्हणते 'एकादशी', मुले म्हणतात 'दुप्पट खाशी.'

'आई, पण एकादशीला उपास का करायचा?' प्रज्ञाने विचारले.

'अग, देवांना त्या दिवशी उपास घडला त्याची आठवण म्हणून!'

'देवांना उपास घडला? म्हणजे?' संदीपने विचारले.

'अरे, त्याची गोष्ट अशी आहे–'

'गोष्ट? सांग, सांग–'

'पूर्वी राक्षस आणि देव यांच्यात नेहमीच युद्धं चालायची. शंकर फार भोळा देव. या राक्षसांनी त्याचा स्वभाव ओळखला होता. ते तपश्चर्या करायचे. शंकराला प्रसन्न करायचे आणि त्याच्याकडून काही ना काही वर मिळवायचे. कुंभ राक्षसाचा मुलगा मृदुमान्य यानं असंच शंकराची भक्ती करून त्याला प्रसन्न करून घेतलं आणि अमर होण्याचा वर शंकराकडून मिळवला.

झालं; अमर बनल्याबरोबर तो देवांनाही अजिक्य झाला. त्यांना छळू लागला. देवांची त्यानं दाणादाण उडवून दिली. ते सगळे त्रिकूट पर्वतावर धात्री झाडाच्या खाली एका गुहेत दडून बसले.

पाऊस कोसळत होता. सगळे देव चिंब भिजले होते. खाणं नाही, पिणं नाही. बाहेर जाण्याची सोय नव्हती. मृदुमान्य गुहेच्या दाराशी टपून बसला होता.

गुहेत अडकून पडलेल्या सर्व देवांचे श्वास एकवटले आणि त्या श्वासांतून एक शक्ती निर्माण झाली. देवांनी तिला विनंती केली मृदुमान्याला मारण्याची. तिनं त्याला मारलं आणि देवांची सुटका केली. या शक्तीचंच नाव एकादशी. त्या दिवशी देवांना गुहेत उपास घडला म्हणून आपण उपास करतो. हाच एकादशीचा उपास.'

'पण आपण तर काय काय खातो उपासाला!' संदीपने शंका काढली.

'अरे, तीच तर गंमत. आपण मुळी खरा उपास विसरलोच आहोत. पण खरं तर प्रत्येक कृष्ण आणि शुक्ल पक्षातली अकरावी तिथी ती एकादशी त्या दिवशी खरा खरा उपास करावा. काही न खाता. म्हणजे पोटाला, पचनक्रियेला विसावा मिळून प्रकृती चांगली राहते. निदान मोठ्या माणसांनी तरी करावाच उपास.'

'म्हणून आजी करते?'

'हो. म्हातारपणी तर पोटाला खरीच जास्त विश्रांती हवी.'

'पण ती कांदा लसूण पण खात नाही!'

'अरे, हवा थंड झालेली असते ना. पाऊस पाण्याचे हे पदार्थ सोसत नाहीत. काही पदार्थ वातुळ. पोटात वात धरतो. म्हणून

नाही खात म्हातारी माणसं.'

'आम्ही खाणार.'

'अरे, मुलांनी तर खायचं आणि व्यायाम करून पचवायचं सगळं. मोठ्या माणसांनी मात्र जरा संयमानं वागायचं.'

इतक्यात–

'विठ्ठल विठ्ठल पांडुरंग...'

'अग आई ते बघ काय?' प्रज्ञाने आश्चर्याने म्हटले.

'अरे, ही दिंडी.'

'दिंडी?'

'हो. अरे सतत आठ महिने भक्तांची कामं करून करून, त्यांना संकटातून सोडवून विष्णू दमतो. मग आषाढी एकादशीला झोपतो. म्हणून या एकादशीचं नाव शयनी एकादशी. विष्णू चार महिने झोपणार असतो. देव झोपलेला. तेव्हा वाईट गोष्टी वाटच पहात असणार शिरकाव करण्याची. त्या वाईट गोष्टी घडू नयेत, वाईट विचार मनात येऊ नयेत म्हणून देवाचं भजन, पूजन, चिंतन करण्यात मन रमवावं असं लोकांनी ठरवलं.

पंढरपूरचं विठोबाचं देऊळ म्हणजे जणू पृथ्वीवरचं वैकुंठ. त्या पंढरपूरला यात्रा नेतात विष्णूचे, विठोबाचे भक्त.'

'कोण कोण असतं यात्रेत?'

'कुणीही. लहान-मोठे, गरीब-श्रीमंत, कोणत्याही धर्माचे, जातीचे. देवाजवळ असा कोणताच भेद नाही. तोच आपणही नाही करायचा. एकेकाळी पंढरपूरच्या या देवळात अस्पृश्यांना प्रवेश नसे. मग कै. साने गुरुजींनी उपास केला, धरणं धरलं आणि हे पंढरपूरचं देऊळ सर्वांना खुलं झालं.

दिंड्या, वीणा, पताका घेऊन नाचत चालत सगळे वारकरी

पंढरपूरला जातात. तोंडाने अभंग, भजने म्हणतात.

हैबतराव नावाचे एक ज्ञानेश्वरांचे भक्त होते. ते साताऱ्या-जवळ अटफळला राहात असत. ते पुढं आळंदीला येऊन राहिले आणि ज्ञानेश्वरांच्या पादुका पालखीत घालून मिरवीत पंढरपूरला नेल्या त्यांनी. तेव्हापासून ज्ञानेश्वरांची पालखी जाते पंढरपूरला. हल्ली पंढरपूरला आठ पालख्या जातात. वेगवेगळ्या गावांहून.'



'वेगवेगळ्या?' संदीपला आश्चर्य वाटले.

'हो. १) आळंदीहून ज्ञानेश्वरांची. २) देहूहून तुकारामांची. ३) पैठणहून एकनाथमहाराजांची. ४) त्र्यंबकहून निवृत्तिनाथांची. ५) एदलाबादहून मुक्ताबाईची. ६) मच्छेंद्रगडाहून मच्छेंद्रनाथांची. ७) सासवडहून सोपानदेवांची. आणि ८) आरणगावहून सावता-माळ्याची.

'या सगळ्या पालख्या वाटेत मुक्काम करीत करीत पंधरावीस दिवसांनी दशमीच्या रात्री पंढरपूरला पोचतात आणि एकादशीला पंढरपूरच्या देवळाच्या भोवती, चंद्रभागा नदीच्या काठी वाळूत सगळ्याभर नुसता विठ्ठलनामाचा गजर घुमतो.

फार मजा वाटते या सोहळ्याची. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून लोक येतात, एकत्र जमतात, राहतात, खातात-पितात. भारतीय एकात्मता खरी खरी दिसते इथे.'

'आपण जाऊया आई एकदा?'

'हो. पण चालत जायचं सगळ्यांबरोबर.'

'मी चालेन. हनुमानजयंतीपासून मी सूर्यनमस्कार घालायला सुरुवात केलीच आहे. चांगली शक्ती आलीय् माझ्यात.' संदीप अभिमानाने म्हणाला.

पावसाची चाहूल देत येणारा आषाढ नव्या पाण्याचे स्वागत करायला सांगतो. आपल्या मनात शब्द पुन्हा पुन्हा मोराच्या नाचासारखे फेर धरतात–

आले नवे नवे पाणी...

नवे पाणी, जुनी घाण वाहून नेणारे, नव्या विचारांचा, चांगल्या कामाच्या निश्चयाचा वर्षाव करणारे. सगळीच देवाची लेकरे हा घोष दिंड्यांमधून पंढरपुरापर्यंत घुमवीत नेणारा हा आषाढ– श्रावणाला वाट मोकळी करून देतो.

# श्रावण

श्रावणमासी हर्ष मानसी
हिरवळ दाटे चोहिकडे
क्षणात येते सरसर शिरवे
क्षणात पिवळे उन्ह पडे–

कोंडलेला वारा मोकळा होतो. काळे ढग पाझरू लागतात. पावसाची रिमझिम सुरू होते. ज्येष्ठातल्या वाऱ्याने सगळ्या झाडाझुडुपांवर कोरडी धूळ उडवलेली असते. पावसाच्या धारांनी ती धुऊन जाते. झाडेपाने स्वच्छ होतात. डोंगरकपारी पावसात न्हाऊन निघतात. कसे स्वच्छ, प्रसन्न वाटू लागते.

कोरड्या मातीवर पडलेल्या पहिल्या पाऊसधारांमुळे मातीचा सुगंध सगळ्याभर दरवळतो. तापलेली माती तृप्त होऊन आपला आनंदच त्या सुगंधाच्या रूपाने जणू प्रकट करते.

ओल्या मातीतून हिरवे हिरवे कोंब फुटू लागतात. जमिनी-वर हिरवळीचा हिरवा गालिचा अंथरला जातो. पावसाच्या धारा झरझरतात, मध्येच एकदम थांबतात. पिवळ्या उन्हाचे कवडसे शिवाशिवी खेळू लागतात. गवताच्या पात्यांवर, झाडांच्या पानां-वर पडलेले पावसाचे थेंब त्या पिवळ्या उन्हात कसे मोत्यांसारखे, रत्नांसारखे चमकू लागतात.

या उन्हपावसाच्या खेळासारखे आपणही खेळावे, बागडावे असे सर्वांना वाटू लागते. छोट्या मोठ्या खळग्यात पाणी साचते.

नाल्यांतून वाहते, लहान मुलं कागदाच्या होडचा करून सोडतात.

कितीतरी प्रकारची झाडं, पानं, कसली कसली? नावं तरी काय यांची? गुण तरी कोणते?

लग्न होऊन नवीनच सासरी आलेल्या मुलीला या सगळचा झाडाझुडपांतून, पावसाच्या पहिल्या धारेतून हिंडल्याची खेळल्याची आठवण होते. पुन्हा तसं खेळावं, या निसर्गाशी मैत्रीण बनून पुन्हा गप्पागोष्टी कराव्याशा वाटतात.

मग भाऊ येतो तिला बोलवायला.

‘श्रावण महिना सुरू झाला. आईनं तुला मंगळागौरीसाठी बोलावलं आहे.’

बहीण खुलते. ती भावाबरोबर माहेरी जाते. मंगळागौरीची तयारी होते.

श्रावणातल्या प्रत्येक मंगळवारी मंगळागौरीची पूजा करायची ही पद्धत. सकाळी उठून रानावनात जायचं आणि पत्री गोळा करायची. पत्री म्हणजे पानं! कसली पानं? किती पानं?

सोळा परीची पत्री. परी म्हणजे तऱ्हा. सोळा तऱ्हेच्या झाडांची पानं आणायची. जाई, जुई, अबई, शेवंती, चाफा सगळचांची नावं ओळखता आली पाहिजेत. सगळी पानं किती वेगवेगळचा प्रकारची आहेत ते समजलं पाहिजे. त्यांचे गुण कळले पाहिजेत. त्यांचा वास किती वेगवेगळा आहे, प्रत्येक पानाचा आकार वेगळा आहे, त्यांचा रंग वेगवेगळा आहे. कुणी औषधी आहेत, कुणी नुसत्याच शोभेच्या वनस्पती आहेत.

या सगळचाची माहिती करून घ्यावी हाच हेतू या पत्री तोडण्यामागचा. वनस्पतीमध्ये कितीतरी औषधी गुण असतात. ते माहीत झाले तर घरगुती, लहानसहान आजारांवर त्या वनस्प-

तींचा उपयोग करता येतो. मंगळागौरीच्या पुजेसाठी पत्री खुडणे हा एक आनंद. निसर्गाची ओळख होणे हा दुसरा आनंद. शिवाय सगळ्या मैत्रिणींनी मिळून रानावनात हिंडून पत्री गोळा करताना, गप्पा मारताना मन कसे प्रसन्न होते. भोवतालच्या प्रसन्न वातावरणात असे मन उल्हसित झाले की काम करायला कसा उत्साह येतो!

वहिनीची मंगळागौर, ताईची मंगळागौर, नव्या काकूची मंगळागौर, घरातल्या लहान मुलींचा आनंद मनात मावत नाही.

'मंगळवारी पूजा करायची म्हणून का ग मंगळागौर म्हणायचं, आई?' प्रज्ञा.

'हो.'

'पण कशासाठी करायची पूजा?'

'एका मुलीनं केली आणि संकट टळलं त्याची आठवण म्हणून.'

'कसलं संकट?'

'हे बघ– त्याची गोष्ट अशी आहे...

कुंडिन नावाच्या शहरात एक धर्मपाल नावाचा ब्राह्मण राहात होता. त्याला एक मुलगा झाला. तो गुणी होता पण अल्पायुषी होता.'

'अल्पायुषी म्हणजे?'

'म्हणजे त्याला आयुष्य थोडं होतं. तो फार वर्ष जगणार नव्हता. धर्मपालाला काळजी वाटली. तो प्रवास करीत असताना त्यांना एक मुलगी आढळली. सुशीला नावाची. तिला मुली चिडवीत होत्या. पण ती म्हणाली, 'माझा नवरा मरायचा नाही. मी मंगळागौरीची पूजा करते.'

'धर्मपाल म्हणाला, 'याच मुलीला सून करून घ्यावी म्हणजे आपला मुलगा लौकर मरणार नाही.'

'सुशीलेचं धर्मपालाच्या मुलाशी लग्न झालं. मंगळागौरीच्या पहाटे तिला स्वप्न पडलं की आपल्या नवऱ्याला चावायला एक साप येतो आहे. देवीनं तिला काय करायचं ते सांगितलं.



'ती स्वप्नातून जागी झाली तर खरोखरच साप येताना तिला दिसला. तिनं दुधाची घागर देवीनं सांगितल्याप्रमाणं घेतली. त्यात साप शिरला दूध पिण्यासाठी. तिनं घागरीचं तोंड बंद करून बांधून टाकलं आणि साप चावून तिचा नवरा मेला असता तो जगला.

'काही दिवसानंतर तिचा नवरा खराच मेला. तेव्हा तिनं मंगळागौरीची प्रार्थना केली आणि देवी तिच्यावतीनं मृत्यूशी

लढली. या देवीचं नाव मंगळागौरी. आपल्यावर सुद्धा ही देवी प्रसन्न राहावी असं सगळ्या मुलींना वाटतं. म्हणून त्या मंगळागौरीची पूजा करतात.'

'पण मग सगळ्यांनी मिळून कशाला करायची?' प्रज्ञाची शंका फिटत नव्हती.

'अग, सगळ्यांनी जमून केली की गंमत येते. खूप फुलांनी देवीची आरास करायची. मग रात्री झोप येऊ द्यायची नाही म्हणून जागं राहण्यासाठी गाणी म्हणायची. खेळ खेळायचे.'

'झोप का नाही घ्यायची?'

'अग, नवऱ्याला साप चावायला येईल, त्याला दुधाच्या घागरीत पकडायचा होता म्हणून सुशीला नाही का जागी राहिली त्याची आठवण.

आता नुसतंच डोळे उघडे ठेवून का जागता येतं? तेव्हा वेगवेगळे खेळ काढले शोधून. झिम्मा, फुगड्या, गोफ, पिंगा कित्तीतरी खेळ. झिम्मा खेळताना गाणी म्हणायची. फुगड्या खेळताना उखाणे घालायचे. नवीन लग्न झालेल्या मुलींना चिडवायचं. त्यांचे खेळ म्हणजे खुंटणमिर्ची, तपेलीची लांब दोरी. माहीत आहे गंमत? अग, कुणी डुलकी घेतली की पदराला बांधायची लांब दोरी आणि दोरीच्या मोकळ्या टोकाला बांधायची तपेली आणि ती मुलगी जागी झाली की चालायला लागते तपेलीसकट.

'सगळं गंमत म्हणूनच करायचं. गावोगावी लग्न होऊन गेलेल्या मैत्रिणी एकत्र जमतात. गप्पागोष्टी होतात. खेळ रंगतात. श्रावण महिन्यातले चार मंगळवार असे मजेत जातात.

'नागोबाला दूऽऽध... नागोबाला दूऽऽध' श्रावण वद्य पंचमी

येते आणि हातावर वेताच्या टोपल्या घेऊन गारुडी घरोघर धावत येतात. मुलं भोवती जमतात. नाग चावेल का? ही भीती मनात. हा गारुडी कसा घाबरत नाही? नाग कसा असेल, केवढा असेल ही उत्सुकता.

भोवती मुलांचे कोंडाळे. मधे नागाची टोपली. गारुडी पुंगी वाजवू लागतो. मुलेही डोलू लागतात. गारुडी हाताने मधूनच टोपलीवर टिचक्या मारतो आणि एकीकडे 'नागोबाला दूध... नागोबाला दूध' म्हणत पुंगी वाजवीत राहतो. टोपलीचे झाकण हळूच थोडे उघडते. मुले दचकून मागे सरकतात. गारुडी झाकण बाजूला काढून टाकतो. नाग टोपलीतच फणा काढतो.

'दहाचा आकडा आहे का रे मुलांनो डोक्यावर?' आई विचारते. नागाच्या उभारलेल्या फण्यावर दहाचा आकडा स्पष्ट दिसतो.

'आहे– आहे–' मुलांचा गिल्ला. मग आई आतून दूध, लाह्या, हळदकुंकू आणून नागाची पूजा करते. गारुडी एका घरून दुसऱ्या घरी निघून जातो. शहरात असे गारुडी येतात, पण बरं का–खेड्यात–

'चल ग सये वारुळाला, वारुळाला–' असं बायकामुलींनी धरलेल्या फेराबरोबर म्हटलेलं गाणं ऐकू येतं. गावाबाहेर नागाच्या सापाच्या वारुळाची पूजा केली जाते. हळदकुंकू, दूध, लाह्या वाहून सर्पाला, नागाला विनवलं जातं– 'बाबा रे कुणाला दंश करू नको. आमचा, आमच्या संपत्तीचा, शेताचा, मुलाबाळांचा तू रक्षणकर्ता हो!'

'आई, साप दुष्ट असतो ना? मग त्याला दूध पाजून काय होणार?' प्रज्ञाने विचारले.

'अग, दुष्टांना सुद्धा प्रेमानं जिंकायचं म्हणून तर हा नागपंचमीचा सण. कुणीतरी शेतकऱ्यानं शेत नांगरलं, नागाची मुलंबाळं नांगराचा फाळ लागून मेली. पण त्याची मुलगी नागाची पूजा करून त्याला प्रेमानं सांगत होती, 'सर्वांना सुखी ठेव.' '

'आणि नागानं ऐकलं !' संदीपला खरे वाटेना.

'हो. तो तिला चावायला गेला पण काहीही न करता परत आला म्हणून तेव्हापासून श्रावण शुद्ध पंचमीला नागपंचमीची पूजा करायला लागली माणसं.'

'म्हणून हे लोक येतात 'नागोबाला दूऽऽध, नागोबाला दूध' म्हणत ?'

'हो आणि त्या शेतकऱ्याच्या मुलीनं कसं प्रेमानं नागाला जिंकलं त्याची आठवण म्हणून आपण नागाला दूध, लाह्या देतो. विषावर दुधाचा उतारा तसा दुष्टपणावर प्रेमाचा उतारा.'

'किती छान सांगितलंस ग आई.'


'अरे, मी कसलं सांगितलं ? हे तर या नागपंचमीच्या सणानंच सांगितलं आहे. सणाचा अर्थ लक्षात घे म्हणजे झालं.

शहरातली मुलं खेड्यापाड्यातली नागाची पूजा बघतात. कधी कधी गावच्या एखाद्या खाडीवर फिरायला जातात. रिमझिम पाऊस पडतच असतो. मस्त वारा सुटलेला असतो. एखादा कोळी त्यांना होडक्यातून फिरवूनही आणतो.

आणि अचानक–

'हैया हो–हैया हो–हैया हो–' दूर समुद्रावरून एका सुरात म्हटलेल्या या ललकाऱ्या ऐकू येतात. त्या तालावर ऐकणाऱ्याला सुद्धा डोलावंसं वाटतं. या गाण्याच्या तालासुरावर होड्या, नौका समुद्रावर डोलत असतात.

नारळी पौर्णिमा हा असा समुद्राची हाक देणारा सण. श्रावणाचा तसा भर संपत आलेला असतो. आषाढ-श्रावणातली पहिली वादळे ओसरतात. समुद्र सफरींसाठी मोकळा होतो.



वरुणानं रुद्ररूप धारण करू नये, समुद्रानं आपल्याला गिळून टाकू नये म्हणून समुद्राची पूजा करायची, त्याला नारळ अर्पण करायचा.

मासेमारी हा फार मोठा धंदा आहे. त्याप्रमाणे परदेशाशी व्यापार हाही फार महत्त्वाचा. आता समुद्र मोकळा झाला तेव्हा व्यापाराला, मासेमारीला निघायला हरकत नाही.

'समुद्रदेवा! आमच्यावर रागावू नकोस, आम्हाला संकटात टाकू नकोस, व्यापार चांगला होऊ दे.' अशी समुद्राची प्रार्थना करायची आणि होडी, गलबतं, नौका समुद्रात लोटायच्या.

क्र. [illegible] दि. [illegible]

हा समुद्रप्रवास करायला न जाणारी मंडळीदेखील मुंबई-सारख्या शहरात समुद्र किनारी जातात. चौपाटीवर या नारळी पौर्णिमेच्या दिवशी लोकांची झुंबड उडते. समुद्राला नारळ अर्पण केले जातात. एक प्रकारची जत्राच भरते समुद्रकिनारी.

समुद्रप्रवास आणि व्यापारासाठी समुद्रसफरी आपल्या देशात फार पूर्वीपासून होत असत. वेदातसुद्धा याचा उल्लेख सापडतो. अत्यंत वेगानं जाणाऱ्या नौका त्या काळी तयार होत असत. खूप दूरवर असलेल्या देशांशीसुद्धा या नौकात बसून भारतीय लोक जात आणि व्यापार करीत. आपला उत्तमोत्तम माल दुसऱ्या देशांना विकीत.

ताम्रोबेन नावाच्या प्रांतातले लोक पूर्व किनाऱ्यावरच्या कलिंग देशच्या राजांना हत्ती नेऊन विकीत. म्हणजे हत्तींना बसवून नेण्याएवढ्या भक्कम नौका तयार होत असत त्यावेळी. कितीतरी प्रकारच्या नौका बांधल्या जात. त्यांचे वर्णन युक्तिकल्पतरू नावाच्या जुन्या संस्कृत ग्रंथात आहे.

अरबस्तान, ग्रीस, इजिप्त वगैरे देशात समुद्रमार्गे जाऊन आपल्या देशातल्या कलाकुसरीच्या वस्तू भारतीय लोक नेऊन विकत असत. जयधीर नावाच्या राजानं सिंहलद्वीपाला आपला वकील गलबतातून पाठवला होता. असा हा व्यापार कितीतरी शतकांपूर्वीपासून भारतात चालू होता. म्हणूनच या सागरी व्यापा-रासाठी नारळी पौर्णिमेचं एवढं महत्त्व. समुद्रपूजनाची एवढी तत्परता.

या श्रावण पौर्णिमेला उत्तर भारतात वेगळंच महत्त्व आहे. तिकडं याचं नाव आहे राखीपौर्णिमा किंवा राखीपुनम.

रक्षाबंधन हा या दिवसाचा मोठा समारंभ. रक्षेचं बंधन—

संरक्षणाचं बंधन. कुणी कुणाला बांधायचं या बंधनानं ?

मुख्यतः बहिणीनं भावाला. बाजारात निरनिराळ्या रंगी-बेरंगी राख्या मिळतात. त्यातली एखादी खूप पैसे देऊन विकत घ्यायची आणि सुंदर म्हणून भावाच्या हातात बांधायची !



मूळ राखीची कल्पना अशी नाही. बहीण स्वतःच्या हातानं सूत काढीत असे. या सूताची राखी हळदीकुंकवात बुडवून रंगवीत असे.'

'पण विकतची सुंदर राखी या साध्या राखीपेक्षा भावाला जास्त नाही का आवडणार ?' प्रज्ञाने शंका काढली.

'खरा अर्थ कळणाऱ्या भावाला बहिणीनं स्वतः तयार केलेली राखीच जास्त आवडेल. कारण तिनं स्वतः ती राखी

तयार करण्यासाठी कष्ट केलेले असतात आणि स्वतःच्या थोड्या-देखील श्रमानं कोणतीही वस्तू जास्त पवित्र, जास्त मौल्यवान होते, नाही का?

अशी ही राखी भावाच्या हातावर बांधून बहीण म्हणते, 'हे राखीचं बंधन आता माझ्या रक्षणाची जबाबदारी तुझ्यावर.'

भाऊ देखील ती जबाबदारी उचलीत असे. ही राखी फक्त स्वतःच्याच भावाला बांधायची असं नाही. हे एक प्रतीक आहे. रक्षणाची जबाबदारी टाकण्याचं. संकटकाली कुणाला बोलवायचं असेल रक्षणकर्ता म्हणून तर बहीण त्याला राखी पाठवू शकते.

मेवाडची राणी कर्मवती, अशीच संकटात सापडली होती. मुसलमानांनी हल्ला केला होता. रजपूत लोक लढाईची शिकस्त करीत होते. पण यश येण्याचं चिन्ह दिसेना. रजपूत शूर होते पण संख्याबळ कमी पडलं.

कर्मवतीनं दिल्लीच्या बादशहाला– हुमायूनला मदतीला बोलावलं. मुसलमानांविरुद्ध त्याच धर्माच्या राजाला बोलावलेलं. हुमायून येईल? खरंच येईल?

खरंच तो आला. कारण राखीचं बंधन धर्मजातीचं बंधन मानीत नाही. राखी पाठवणारी बहीण ही खरी धर्मभगिनी बनते–कर्तव्यभगिनी. तिचं रक्षण करण्यासाठी धावून जायचं एवढंच भाऊ मानतो.

अगदी अलीकडच्या इतिहासात देखील भारतीय स्वातंत्र्य-युद्धात भारतीय स्त्रियांनी इंग्रज सैनिकांच्या बराकीत जाऊन त्यांना राख्या बांधल्या होत्या. राखीचा अर्थ समजावून सांगितला होता आणि अधिकाऱ्यानं गोळीबाराचा हुकूम दिल्यावर देखील हे इंग्रज सैनिक आपापली पिस्तुले आणि बंदुका न चालवता

स्वस्थ उभे राहिले. रक्षाबंधनाचं पावित्र्य त्यांनी राखलं. भावा-बहिणीच्या नात्याचं बंधन हे असं कसल्याही धर्माच्या, देशाच्या बंधनांपासून अलिप्त असतं. त्याला या मर्यादाच नसतात.

उत्तर भारतात नोकर मालकाला, किंवा क्वचित् मुलगी वडिलांनादेखील राखी बांधते. आपल्यापेक्षा श्रेष्ठ अगर बलवान, समर्थ माणसाला राखी बांधून आपल्या रक्षणाची विनंती करणं हीच या मागची भावना. देवांवर विजय मिळावा म्हणून शुक्राचार्यानं बलीराजाच्या हातात राखी बांधली होती असं पुराणात आहे.

कोकिळेचे 'कुहू कुहू' शब्द वसंताची चाहूल देतात. काळे मेघ पाऊस आला म्हणून सांगतात. तसंच बासरीचे सूर श्रीकृष्णाची आठवण करून देतात. कृष्ण आणि बासरी, कन्हैया आणि मुरली हे दोन्ही जसे एकमेकांपासून वेगळे काढताच येत नाहीत.

श्रावण वद्य अष्टमीला कृष्णाचा जन्म झाला. कृष्णजन्म म्हटलं की काय काय आठवतं?

वसुदेव देवकीचा बंदीवास. कंसानं आपल्या वडिलांना— उग्रसेन राजाला कैद केलं. राज्य घेतले. आपली बहीण देवकी आणि मेहुणा वसुदेव यांनाही तुरुंगात डांबून ठेवलं. देवकीचं आठवं मूल आपल्याला मारणार आहे असं त्याला कुणीतरी भविष्य सांगितलं होतं. त्यामुळं देवकीला झालेलं प्रत्येक मूल मारायचं असं दुष्ट कंसानं ठरवलं. मूल जन्मल्याचं समजलं की हा तुरुंगात जाई, मूल मारून टाकी.

आठवा झाला तो कृष्ण. खूप छान, सावळ्या रंगाचा, तेजस्वी. वसुदेवानं तो झाल्याबरोबर त्याला घातलं एका टोपलीत. वर पानं घालून त्याला झाकून टाकलं. पहारेकऱ्यांनाही कंसाचा

दुष्टपणा आवडत नव्हता. तुरुंगाची दारं उघडली गेली. वसुदेव तुरुंगातून ती टोपली घेऊन बाहेर पडला.

यमुनेला पूर आला होता. पण त्याला त्याचं काही वाटलं नाही. कसंही करून कृष्णाला वाचवायचं. तो तसाच टोपली डोक्यावर उंच धरून नदीतून पार झाला. गेला गोकुळात त्याच्या मित्राकडं, नंदाकडं. मित्राच्या स्वाधीन केला कृष्णाला आणि परत आला. नंदाच्या बायकोला– यशोदेला मुलगी झाली होती. ती त्यानं कृष्णाच्या बदली आपल्याबरोबर आणली.

कंसानं त्या मुलीला मारण्यासाठी उंच वर धरली. त्याबरोबर ती त्याच्या हातातून निसटून आकाशात गेली. कारण ती होती वीज. ती जाता जाता म्हणाली, 'तुझा मारेकरी दुसरीकडं वाढतो आहे.'

यशोदेनं कृष्णाला आपलाच मुलगा म्हणून वाढवलं. कृष्ण गोकुळात वाढत होता. गवळ्यांच्या मुलांबरोबर, गोपांबरोबर खेळत होता. गाई चरायला नेत होता. नदीकाठी, झाडाखाली बसून बासरी वाजवीत होता.

यमुनेच्या डोहाचं पाणी कालिया सर्पानं विषारी केलं होतं. गाईगुरांना पाणी मिळत नव्हतं. श्रीकृष्णानं कालियाच्या डोक्यावर नाचून त्याला ठार केलं. लोक म्हणायला लागले की कृष्णानं 'कालियामर्दन' केलं.

हळूहळू कंसाला समजलं की नंदाच्या घरी गोकुळात वाढणारा कृष्ण हाच आपला मारेकरी आहे. त्यानं त्याला मारण्यासाठी, विष पाजण्यासाठी पूतना राक्षसीला पाठवलं. कृष्णानं तिला ठार मारलं. कंसाच्या दुसऱ्याही कितीतरी राक्षसांना शूरपणानं मारून टाकलं.

कंसाच्या पदरी चाणूर, मुष्टिक नावाचे दोन मल्ल होते. कंसानं कृष्णाला आणि त्याचा मोठा भाऊ, नंदाचा मोठा मुलगा बलराम दोघांना या मल्लांशी कुस्ती खेळायला बोलावलं. सगळी मंडळी घाबरली. हे एवढे मल्ल आणि ही दोन पोरं छोटुकली.

पण कृष्ण मोकळ्या हवेत वाढला होता. दूधतूप खात होता. कुस्तीचे पेच शिकला होता. बलरामही कुस्ती खेळण्यात तितकाच पटाईत होता. ते दोघे मल्ल नुसते माजलेले. कृष्ण बलरामांनी दोघांनाही कुस्तीत ठार मारलं. कंसानं त्यांच्यावर एक हत्ती



सोडला. तोही ठार झाला. मग कंस कृष्णाला, वसुदेवाला, बलरामाला वाटेल तसं बोलायला लागला. कृष्णाला आला राग. त्यानं कंसाशी लढाई खेळून त्याला ठार मारलं. ती लढाई शस्त्रांनी केली नाही. मुष्टियुद्ध होतं ते. लाथाबुक्यांच्या मुठींच्या मारानं

त्यानं कंसाला ठार केलं.

कंस मेला. मग कृष्णानं कंसाच्या वडिलांना, उग्रसेन महाराजांना कैदेतून सोडवलं. त्यांना राज्य परत दिलं. मग कृष्ण वसुदेव-देवकींकडं राहायला गेला.

वसुदेवानं कृष्णाला आणि नंदानं बलरामाला सांदीपनि ऋषींच्या आश्रमात शिक्षणासाठी पाठवलं. तिथं कृष्णाचा मित्र बनला सुदामा.

सुदामा अत्यंत गरीब. कृष्ण राजपुत्र. पण त्यांची दोघांची फारच मैत्री होती. कृष्ण पुढे द्वारकेचा राजा झाला. सुदामा गरीबच राहिला. पण कृष्णाला भेटायला गेला तेव्हा कृष्ण मैत्री विसरला नाही. सुदाम्याने दिलेले मूठभर पोहे त्यानं प्रेमानं खाल्ले. त्यानं सुदाम्याला देखील श्रीमंत करून सोडलं. त्याला सोन्याची द्वारका दिली राहायला.

पांडवांचा तर तो मित्रच होता. द्रौपदी त्याला भाऊ मानी. त्याच्यावर द्रौपदीचं इतकं प्रेम होतं की त्याची सख्खी बहीण सुभद्रादेखील त्याच्यावर इतकं प्रेम करीत नसे.

'आई ग ऽऽ रक्ताची धार लागली आहे. बोट कापलं.'

कृष्णानं रक्ताची धार लागलेलं बोट पुढं केलं. सुभद्रा चिंधी शोधायला लागली बोटाला बांधायला. द्रौपदीनं शोधाशोध केली नाही. नेसत्या शालूचा पदर फाडून तिनं कृष्णाचं बोट बांधलं. भावाबहिणीचं हे प्रेम फार आदर्श समजतात.

या प्रसंगावर आधारलेलं एक गाणं तुमच्या आजीनं म्हटलेलं ऐकलं आहात कधी?'

'चिंधीचं गाणं म्हणून ते प्रसिद्ध आहे. तेच ना, आई?' प्रज्ञा म्हणाली.

'हो. तेच– भरजरी ग पितांबर दिला फाडुन
द्रौपदिसी बंधु शोभे नारायण.

मोठ्या बायका अगदी रंगून जाऊन म्हणतात हे गाणं!

पांडवांची आणि कौरवांची सतत स्पर्धा चालायची. दोघे चुलतभाऊ पण एकमेकांचे कट्टर शत्रू. कृष्ण पांडवांच्या बाजूचा होता. कारण पांडवांची आई कुंती ही कृष्णाची आत्या. तेव्हा तो पांडवांचा भाऊच होता.

कौरव पांडवांच्या शेवटच्या युद्धात कुरुक्षेत्रावर कृष्णानं अर्जुनाला लढाईचा उपदेश केला. तुम्ही कधी गीता पाठ केली आहे? अठरा अध्याय? ती गीता म्हणजेच या युद्धाच्या वेळी कृष्णानं अर्जुनाला केलेला उपदेश.

ही गोकुळअष्टमी म्हणजेच कृष्णजन्माचा उत्सव. सबंध भारतात हा वेगवेगळ्या प्रकारे साजरा होतो. गोकुळ, मथुरा, वृंदावन, द्वारका, पुरी या ठिकाणी तर फारच थाटात होतो हा उत्सव. कारण या ठिकाणी तर कृष्ण राहिला होता. वाढला होता.

कित्येक घरी गोकुळवृंदावनाच्या तटबंदीचा देखावा करतात. कृष्णलीलेचा खेळ करतात. रास खेळतात.

कृष्ण ३००० वर्षांपूर्वी भारतात होऊन गेला असं म्हणतात. धाडसीपणा तर होताच त्याच्यात. तो युक्तिवान होता. तो म्हणायचा,

'माणसानं आपण कोण आहो, काय आहो हे समजून घेतलं पाहिजे. मी अमुक केलं तर मला काय मिळेल? असा विचार नाही करायचा. कामात आनंद घेऊन निष्काम कर्म करायचं. कारण कर्तव्याचा आनंद फार मोठा असतो.'

कृष्णानं हे सगळं गीतेत सांगितलं. ज्ञानेश्वरांनी त्या गीतेचा अर्थ स्पष्ट करणारा मराठीत काव्यग्रंथ रचला, ज्ञानेश्वरी. लोकमान्य टिळकांनी पण गीतारहस्य लिहून गीतेचा अर्थ लोकांना समजावून सांगितला पण याहीपेक्षा सोप्या शब्दात विनोबांनी गीताई रचली. मराठी गीता.

असा हा कृष्ण दुष्टांना मारणारा, गुणी लोकांना मदत करणारा आणि सर्वांना वागावं कसं ते सांगणारा. सगळ्या बाळ-गोपाळांचा मित्र, गाईगुरांचा आवडता.

गोकुळअष्टमी आली की मुलं खूष. मग उंच दहीहंडी बांधायची. त्याला केळी, नारळ बांधायचा. एकावर एक, एक-मेकांच्या खांद्यावर, डोक्यावर चढून हंडी फोडायची. हंडी फोडून केळे, नारळ याचा प्रसाद खायचा आणि पाण्यात, पावसात फेर धरून नाचायचं. कृष्ण गोपाळांशी खेळत असे तसं आपण खेळायचं.

'गोविंदा आला रे आला–' हे गाणं मुलांना कसं आनंदानं नाचायला लावतं. मुंबईसारख्या शहरात, कोकणात बालेगडी घरोघर जाऊन दहीहंड्या फोडतात, नाचतात. स्वतःला गोपाळ समजतात. असा कृष्ण लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडणारा.

कृष्णाष्टमी पाठोपाठ येतो पोळा. श्रावण अमावास्येला. हा सण शेतकऱ्यांचा. बैलांची पूजा करण्याचा.

बैल शेत नांगरणारे, आपल्याला पोटभर खायला मिळावं म्हणून जमिनीत राबणारे. त्यांचे उपकार कसे फेडायचे?

त्यांची शिंगं रंगवायची. त्यांच्या अंगावर रंगीत झुली घालायच्या. वाजत गाजत त्यांची मिरवणूक काढायची. आपापल्या बैलांची शक्ती दाखवण्यासाठी शेतकरी बैलांच्या शर्यतीसुद्धा

लावतात आणि दिवसभर झुंज खेळून दमलेल्या बैलांना संध्याकाळी मिरवीत घरी आणतात. घाटावरच्या कित्तीतरी गावात मग संध्याकाळी गुरांना ओवाळतात. त्यांना पोळ्याच्या दिवशी खायला काय द्यायचं? रोजचा कडबा गवत? छे:! त्या दिवशी खास त्यांच्यासाठी पुरणपोळी करून घालायची त्यांना खायला!



आपल्यासाठी जमिनीत राबणारा हा बैल. त्याच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी, त्याच्यावरचं प्रेम दाखवण्यासाठी शेतकरी काय करतात? हा पोळ्याचा सण.

श्रावण असा फुललेला, खुललेला, रंगीत संगीत. सोळा परींची पत्री गोळा करताना आनंद देणारा, 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी' या तुकारामाच्या अभंगातल्या ओळीचा अर्थ समजावून

देणारा. मंगळागौरीच्या खेळांचा आनंद उसळतो श्रावणाच्या रिमझिमत्या पावसांच्या धारांबरोबर. समुद्राची सफर कोळ्यांच्या वल्ह्यांच्या तालावर रंगते, रक्षाबंधन बहीणभावाच्या प्रेमाची खूण पटवते, कृष्णलीला आणि कृष्णचरित्र, सगळ्यांनी कसं वागावं, दुष्टांना शासन करावं, गाईगुरांवर प्रेम करावं, अन्यायाचा प्रतिकार करावा हे सांगणारे प्रसंग डोळ्यांसमोर उभे करते, सापासारखा दंश करणारा विषारी प्राणी त्यालासुद्धा दूध पाजून प्रेमानं वश करता येतं हे सांगते नागपंचमी, तर आपल्यासाठी काबाडकष्ट करणाऱ्या मुक्या जनावरांचं, बैलांचं देखील ऋण फेडलं पाहिजे हे दाखवून देतो पोळा.

निसर्ग, झाडंझुडपं, प्राणी, गाईगुरं, माणसं, समुद्र, व्यापार, व्यवहार सगळ्यांचीच सांगड घालणारा हा श्रावण. सगळ्यातून एक सूर मात्र उमटतो. परस्पर प्रेमाचा, कृष्णाच्या मुरलीच्या सुरांमधून ऐकू येत असल्यासारखा.

* *

# भाद्रपद

'गणपतिबाप्पा मोरया
पुढच्या वर्षी लौकर या–'

गणपती येण्यापूर्वीच त्याला पुढच्या वर्षी येण्याचं आमंत्रण दिलं जातं. भाद्रपद म्हटला की आठवतो गणपती. गणपतींच्या कारखान्यात शाडूची माती मळली जाऊ लागते. साचे बनतात. तऱ्हेतऱ्हेच्या गणपतीच्या मूर्ती कारखान्यात तयार होतात. काही रंगवलेल्या, काही रंगवायच्या राहिलेल्या पण तयार झालेल्या.

दुकानात हारीनं तयार गणेशमूर्ती मांडून ठेवलेल्या असतात. लहानमोठे किती आकार, किती तऱ्हा. शंकर, विष्णू, कृष्ण, राम सगळ्या देवांची रूपं गणपतीच्या रूपात. कितीतरी प्रसंगही मूर्तींच्या रूपात दाखवलेले. कोणता गणपती आणायचा ती चर्चा होते. घरात रंगीत कागद, चकचकीत चांद्यांचे कागद गोळा होतात. कामट्या आणल्या जातात. छोटंसं मखर तयार होतं. गणपती आणण्यापूर्वी सगळं झालं पाहिजे. लहान मुलं चॉकलेटच्या जमवलेल्या चांद्या आणून देतात. मुलीबाळी शाळेत हस्तव्यवसायाच्या तासाला शिकवलेली कागदाची फुलं कातरून देतात आणि मखर सजवलं जातं.

भाद्रपद शुद्ध चतुर्थीचा दिवस. गणेशचतुर्थीचा. सकाळी लौकर आंघोळी करून मुलं तयार होतात. हातात झांजा येतात. एक पाट, बरोबर रेशमी कापड सगळं घेतलं जातं. गणपतीची मूर्ती

आधीच दुकानात निवडून ठेवलेली असते. बाबांबरोबर जायचं. मूर्ती पाटावर बसवायची, तिच्या अंगावर रेशमी कापड पांघरूण घालायचं. मग बाबा किंवा दादा गणपतीची मूर्ती सांभाळून धरतात पाटावर. तोंड मूर्तीचं घराच्या दिशेला आणि मागून सगळी बालगोपाळमंडळी 'गणपतिबाप्पा मोरया ..' च्या सुरात, झांजांच्या तालात गणपती घरी घेऊन येतात. मखरात त्याची



स्थापना होते. पूजा होते. सुखकर्ता, दुखहर्ता आरती दणाणते. ॐ स्वस्ति साम्राज्यं...चा मंत्रजागर घुमतो आणि प्रसाद वाटला जातो.

कुणाच्या घरी दीड दिवसाचा, कुणाकडं पाच, कुणाकडं सात, तर कुणाकडं दहा दिवसांचा गणपती बसतो. गणपती घरी

असेतोवर घर कसं वेगळंच दिसतं.

सार्वजनिक गणपती उत्सवही जोरात असतात. कुठेकुठे मोठमोठे मांडव पडतात. आरास होते. वेगवेगळ्या, तऱ्हेतऱ्हेच्या मूर्ती बसतात. दहा दिवस तऱ्हेतऱ्हेचे मनोरंजक कार्यक्रम होतात. भजनं, कीर्तनं, व्याख्यानं, नाटकं, सिनेमा कितीतरी कार्यक्रम.

गणपतीपुढं स्वतः बसवलेली नाटकं, नाच करण्याची सर्वांना फारच हौस असते. खेळांच्या, पाठांतराच्या स्पर्धा घेतलेल्या असतात. बक्षीससमारंभ होतात. सगळी धामधूम दहा दिवस गणपतीच्या साक्षीनं.

लोकमान्य टिळकांनी लोकांचं मन ओळखून सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला. लोकांना व्याख्यानातून, इतर कार्यक्रमातून देशाची परिस्थिती समजावण्यासाठी, स्वातंत्र्याकरता लढण्याची स्फूर्ती देण्यासाठी गणपती सर्वांचा. लहानमोठ्यांचा. तुमचा नाही, आणि आमचा नाही, असं नाहीच त्यात.

हे दहा दिवस लहानमोठ्यांच्या सर्वांच्या ज्ञानसाधनेचे. कारण गणपती म्हणजे विद्येचा दाता. पाठांतराच्या स्पर्धा उच्चार सुधारण्यासाठी. निबंधाच्या लेखन सुधारण्यासाठी. गणपती विद्येचा तसाच कलांचाही देव आहे. म्हणून त्याच्यासमोर कलांनाही उत्तेजन मिळेल असे कार्यक्रम करायचे.

'ते सगळं झालं हो बाबा पण एवढा मोठा गणपती, एवढ्याशा उंदरावर काय बसतो ? हसायलाच येतं ते पाहून. दुसरं वाहन नाही मिळालं त्याला ?' संदीपने विचारले.

'अरे, न मिळायला काय झालं? तुझ्याच सारखा चंद्र पण एकदा हसला गणपतीला उंदरावरून घसरलेला पाहून. मग गणपतीनं त्याला शाप दिला, 'तुझ्याकडे बघतील त्यांच्यावर चोरीचा

आळ येईल.' चंद्र मग घाबरला. त्यानं गणपतीची प्रार्थना केली. गणपतीनं त्याला क्षमा केली आणि फक्त गणेशचतुर्थीला तुझ्याकडे बघणारांवर चोरीचा आळ येईल एवढाच ठेवला तो शाप.'

'म्हणून तर म्हणतो, एवढासा उंदीर, चंद्राला का नाही हसायला येणार? तर हा उंदीर–'

'अरे, उंदीर म्हणजे काळ! उंदीर कसा सगळ्या वस्तू कुरतडून त्यांचा नाश करतो तसंच काळाचं असतं. त्या काळावर गणपतीनं विजय मिळवला. संहार करणाऱ्या शक्तींवर विजय मिळवून तो बनला सुखकर्ता, दुखहर्ता. म्हणून तो विजय म्हणजेच उंदरावर स्वार होणं.

असा हा गणपती भारतात सर्वांचा आवडता आहे. त्याच्या प्रसादाचे मोदक तर लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेजण आतुरतेने वाट पाहतात असा पदार्थ. महाराष्ट्रात हा उत्सव दहा दिवस चालतो. द्रविड देशात रामेश्वरपर्यंत हा गणपती उत्सव चालतो. उत्सव करण्याची पद्धत प्रत्येक ठिकाणी वेगळी आहे.

कर्नाटकात गणेशचतुर्थीला म्हणतात बेनकन हब्ब आणि तेलगू लोक म्हणतात पिल्लेयर चवती. पिल्लेयर हे त्यांनी दिलेलं गणपतीचं नाव. गुजरातेत गणेशचतुर्थीच्या दिवशी गूळ आणि तूप घालून तयार केलेल्या बाजरीच्या पिठाच्या गोळ्या घरात जागोजागी ठेवतात उंदरांना खाण्यासाठी. गणपतीच्या वाहनाला, उंदराला असा मान देतात तिथं.

नेपाळात, तिबेटात, आसामात सगळीकडं गणेशाची मूर्ती पोचलेली आहे. एवढंच काय, जगभर गणेशाची वेगवेगळी मूर्ती दिसते. गणेशाचा असा प्रसार जगभर झालेला आहे. अगदी पुरातन लेण्यांमध्येसुद्धा गणेशाच्या मूर्ती कोरलेल्या आहेत.

थोरले माधवराव पेशवे गणपतीचे भक्त होते. थेऊरला फार मोठं गणपतीचं देऊळ आहे– त्यांनी बांधलेलं. पुण्याजवळ चिंचवडला, कोकणात पुळ्याला, कर्नाटकात इडगुंजी इथली गणपतीची देवळं फार प्रसिद्ध आहेत. अष्टविनायकाची देवळं तर महाराष्ट्रात गाजलेलीच आहेत.

'आई, तू मोदक करताना आता काय म्हणालीस?' प्रज्ञाने विचारले.

'अग, मी म्हटलं–गजानना सगळं नीट सुरळीत होऊ दे. हे बघ. गणपती विघ्नहर्ता आहे ना म्हणून कुठल्याही चांगल्या कामापूर्वी गणपतीची पूजा करतात, प्रार्थना करतात आणि त्याला विनवतात, 'बाबा रे, सगळी विघ्नं दूर कर. सगळं नीट होऊ दे. कसलीही पूजा असली तरी आधी गणपतीची पूजा करतातच.'

'ए ताई, उठ ना. आम्ही केव्हाचं तयार आहोत. गणपती येईपर्यंत तू ती फुलं लावणार आहेस ना मखराला? आई, अशी काय ग ही झोपली आहे आज!' संदीपने जरा घुश्शातच म्हटले.

'अरे, हरतालिकेचं जागरण झालं आहे काल रात्री.'

'हं! म्हणजे ती खेळत होती सगळ्या मुलींबरोबर ते?'

'हो.'

'ही कसली पूजा?'

'अरे, पार्वतीची. पार्वतीला शंकराशी लग्न करायचं होतं. पण शंकर प्रसन्न होईना. मग पार्वती गेली रानात. तिच्याबरोबर तिची सखी पण होती. पार्वतीनं तपश्चर्या केली. शंकर प्रसन्न झाला. त्यानं पार्वतीशी लग्न केलं. म्हणून तर ताईनं त्या सखी पार्वतीच्या मूर्तीची काल पूजा केली. रात्री झोप घालवण्यासाठी खेळ खेळल्या त्या. दिवसभर कडक उपास केला होता. पहाटे दही-

भात खाऊन त्यांनी तो सोडला.'

'म्हणजे आता ताईला शंकरासारखा हवा तो नवरा मिळणार ?'

'अरे, शंकरासारखा नवरा मिळायला हवा असेल तर त्याच्यासाठी प्रयत्न करायचा पार्वतीसारखा. फक्त पूजा करून काही होत नाही. पूजा करून आठवण ठेवायची आपल्याला काय करायचं आहे त्याची.'

'आता चिडवतोच, शंकरासारखा नवरा हवा तर तपश्चर्या कर पार्वतीसारखी.'

आई नुसतीच हसली. कारण ताईला आणि तिच्या सगळ्या मैत्रिणींना तिने हरतालिकेच्या पूजेच्या वेळी हे सगळे आधीच सांगितले होते.

गणपती उत्सव चालू असतानाच महालक्ष्मी येते. भाद्रपद अष्टमीला आणि गौरीउत्सवासाठी घरातल्या बायका आतुर होतात. कुणी कागदावरच्या गौरीच्या चित्रांची पूजा करतात. कुणी तेरडा किंवा आघाडा यांची जुडी बांधतात. जुडीवर मुखवटा घालतात. गौरीप्रमाणं दागिने घालतात आणि पूजा करतात'

'पण मग ही मडकी कशाला आणली आहेत आत्यानं?' प्रज्ञाला कळेना.

'अग, त्यांच्या घरी तशीच पद्धत आहे. ही पाच मडकी त्यांना म्हणतात सुगडं! ही आता आत्या एकावर एक ठेवून रचील. वर एक मातीचा मुखवटा रचून ठेवील. मग त्या गौरीला जरीचं पातळ नेसवील. तिच्या अंगावर दागिने घालील आणि तिची पूजा करील.'

'पण त्या मडक्यात काय ग घातलं?'

'मडक्यात ना? खोबऱ्याचे तुकडे, खारीक, धान्य, करंज्या वगैरे फराळाचं ठेवलंय.'

'कशाला?'

'गौरीचं विसर्जन करायच्या वेळी ते काढून घ्यायचं प्रसाद म्हणून. आता बघ पाऊसपाणी झालं आहे. धान्याच्या पेरण्या आल्या आहेत. तेव्हा अगदी पोटभर धनधान्य मिळू दे असं देवीला म्हणायचं आणि तिच्याच पोटातून सगळं मिळालं असं म्हणायचं. गौरे नाचतात नाही का मुंबईला ते आपल्या गाण्यात हेच म्हणतात.'

'गौरे म्हणजे ते कोळी लोक आणि रामागडी?' संदीपला फारच आश्चर्य वाटले.

'हो. त्यांची शेतीवाडी असते कोकणात. इकडं ते घरकामं करतात. मग दोन तीन दिवस गौरीचा उत्सव करतात. नाचतात. गौरीची प्रार्थना करतात शेती पिकू दे म्हणून!

दहा दिवसांचा गणपती अनंतचतुर्दशीला अकराव्या दिवशी समुद्रावर विसर्जन करण्यासाठी नेतात. गणपती आणताना आनंदानं नाचणाऱ्या मुलांना, आता वाईट वाटतं. आपल्या घरी आलेला कुणीतरी पाहुणा, अगदी आवडता पाहुणा परत गेल्यावर वाईट वाटतं तस्संच. मग समुद्रावर गणपतिविसर्जनाची मिरवणूक निघते. पुण्या–मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरात गणपतिविसर्जनाची मिरवणूक पाहायला रस्त्याच्या दुतर्फा खूप गर्दी जमते. कित्तीतरी वेगवेगळ्या मूर्ती आणि सजावट बघायला मिळते या मिरवणुकीत.

मग गणपती पोचवून परत येताना जरा उदासपणे मुलं म्हणतात,

'गणपती गेले गावाला, दु:ख झाले जीवाला' आणि 'पुढच्या वर्षी लौकर या' असं आमंत्रण दिलं जातं. गणपती आपल्या आमंत्रणाला मान देऊन पुढच्या वर्षी नक्की येणार ही खात्री असतेच.'

'गणपती पोचवायचा त्याला गणेशचतुर्दशी का नाही म्हणायचं? आणताना नाही का आपण गणेशचतुर्थी म्हणतो?'

'पण अनंतचतुर्दशी हा केवळ गणपतिविसर्जनाचाच दिवस नाही. तो अनंताच्या पूजेचा, व्रताचा दिवस आहे.'

'अनंताची पूजा? व्रत? कशासाठी?'

'अहंकार, गर्व होऊ नये म्हणून. गर्वामुळे काय नुकसान होतं ते कळावं म्हणून. कौंडिण्य ऋषींना हे कळलं आपल्या बायकोमुळे.'

'ते कसं?' मुले आता ऐकायला सरसावली.

'कौंडिण्य ऋषींची बायको सुशीला. दोघंही खूप गरीब होती. दोघं अरण्यात राहात असत. एकदा सुशीला अरण्यात हिंडत होती. तिला एका ठिकाणी काही बायका दिसल्या. लाल रंगाचे कपडे घालून त्या एका कलशाची पूजा करीत होत्या. तिनं त्यांना विचारलं,

'तुम्ही हे काय करता?'

'अनंताचं व्रत. हा कलश आहे सुखसमृद्धीचा, वैभवाचा. याची आम्ही पूजा करतो. ज्याला अंत नाही अशा वैभवाची प्राप्ती होते यामुळं.'

सुशीलेनं अनंताची पूजा केली. तिला वैभव खूप मिळालं. तिनं अनंताच्या व्रताचा १४ गाठींनी बांधलेला दोरा कौंडिण्य ऋषींना दाखवला आणि म्हणाली,

'मडक्यात ना? खोबऱ्याचे तुकडे, खारीक, धान्य, करंज्या वगैरे फराळाचं ठेवलंय.'

'कशाला?'

'गौरीचं विसर्जन करायच्या वेळी ते काढून घ्यायचं प्रसाद म्हणून. आता बघ पाऊसपाणी झालं आहे. धान्याच्या पेरण्या झाल्या आहेत. तेव्हा अगदी पोटभर धनधान्य मिळू दे असं देवीला म्हणायचं आणि तिच्याच पोटातून सगळं मिळालं असं म्हणायचं. गौरे नाचतात नाही का मुंबईला ते आपल्या गाण्यात हेच म्हणतात.'

'गौरे म्हणजे ते कोळी लोक आणि रामागडी?' संदीपला फारच आश्चर्य वाटले.

'हो. त्यांची शेतीवाडी असते कोकणात. इकडं ते घरकामं करतात. मग दोन तीन दिवस गौरीचा उत्सव करतात. नाचतात. गौरीची प्रार्थना करतात शेती पिकू दे म्हणून!

दहा दिवसांचा गणपती अनंतचतुर्दशीला अकराव्या दिवशी समुद्रावर विसर्जन करण्यासाठी नेतात. गणपती आणताना आनंदानं नाचणाऱ्या मुलांना, आता वाईट वाटतं. आपल्या घरी आलेला कुणीतरी पाहुणा, अगदी आवडता पाहुणा परत गेल्यावर वाईट वाटतं तस्संच. मग समुद्रावर गणपतिविसर्जनाची मिरवणूक निघते. पुण्या–मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरात गणपतिविसर्जनाची मिरवणूक पाहायला रस्त्याच्या दुतर्फा खूप गर्दी जमते. कित्तीतरी वेगवेगळ्या मूर्ती आणि सजावट बघायला मिळते या मिरवणुकीत.

मग गणपती पोचवून परत येताना जरा उदासपणे मुलं म्हणतात,

'गणपती गेले गावाला, दु:ख झाले जीवाला' आणि 'पुढच्या वर्षी लौकर या' असं आमंत्रण दिलं जातं. गणपती आपल्या आमंत्रणाला मान देऊन पुढच्या वर्षी नक्की येणार ही खात्री असतेच.'

'गणपती पोचवायचा त्याला गणेशचतुर्दशी का नाही म्हणायचं? आणताना नाही का आपण गणेशचतुर्थी म्हणतो?'

'पण अनंतचतुर्दशी हा केवळ गणपतिविसर्जनाचाच दिवस नाही. तो अनंताच्या पूजेचा, व्रताचा दिवस आहे.'

'अनंताची पूजा? व्रत? कशासाठी?'

'अहंकार, गर्व होऊ नये म्हणून. गर्वामुळे काय नुकसान होतं ते कळावं म्हणून. कौंडिण्य ऋषींना हे कळलं आपल्या बायकोमुळे.'

'ते कसं?' मुले आता ऐकायला सरसावली.

'कौंडिण्य ऋषींची बायको सुशीला. दोघंही खूप गरीब होती. दोघं अरण्यात राहात असत. एकदा सुशीला अरण्यात हिंडत होती. तिला एका ठिकाणी काही बायका दिसल्या. लाल रंगाचे कपडे घालून त्या एका कलशाची पूजा करीत होत्या. तिनं त्यांना विचारलं,

'तुम्ही हे काय करता?'

'अनंताचं व्रत. हा कलश आहे सुखसमृद्धीचा, वैभवाचा. याची आम्ही पूजा करतो. ज्याला अंत नाही अशा वैभवाची प्राप्ती होते यामुळं.'

सुशीलेनं अनंताची पूजा केली. तिला वैभव खूप मिळालं. तिनं अनंताच्या व्रताचा १४ गाठींनी बांधलेला दोरा कौंडिण्य ऋषींना दाखवला आणि म्हणाली,

'मी अनंताचं व्रत घेतलं म्हणून आपल्याला वैभव मिळालं.'

'अग, वैभव अशा कुठल्या व्रतानं मिळत नाही. मी केलेल्या उद्योगामुळंच वैभव मिळालं. अनंत वगैरे काही नाही.'

'तुमचा उद्योग, तुमचे कष्ट आणि माझं व्रत या दोन्हीमुळे कशावरून नाही?'



'नाही. माझ्याच कष्टांचं फळ आहे.'

कौंडिण्याने मोठ्या गर्वानं तिच्या हातातला तो दोरा फेकून दिला. जाळून टाकला. सुशीलेला खूप वाईट वाटलं. तिची तिच्या व्रतावर श्रद्धा होती ती म्हणाली,

'तुम्ही अहंकारानं माझ्या श्रद्धेचा अपमान केलात. माझा अनंताचा दोरा जाळलात. मला तो परत आणून द्या.'

ती खाईना पिईना. 'दोरा आणून द्या' हाच हट्ट तिचा.

कौंडिण्याचा काही उपाय चालेना. तो निघाला अनंताच्या शोधासाठी. रानोमाळ भटकत असताना त्याला एक फळांनी लगडलेला आम्रवृक्ष दिसला. पण फळे खूप असली तरी ती वाईट होती म्हणून कुणी पक्षी त्या झाडाजवळ फिरकतही नव्हते. पुढे दिसला एक बैल. त्याच्यासमोर भरपूर चारा होता पण त्याला तो खाता येत नव्हता. तो आणखी पुढे गेला तर त्याला दोन सरोवरं दिसली. पण ते पाणी कुणीच पीत नव्हते. पुढे दिसले एक गाढव आणि एक हत्ती. दोघे नुसते उभे होते.

कौंडिण्याला सगळ्याचंच फार आश्चर्य वाटलं. त्याच्या मनात विचार आला, 'हे असं का?'

आणि अनंताचे शब्द त्याला ऐकू आले,

'तुला वाटेत भेटलेला आंबा म्हणजे एक विद्वान होता. पण त्यानं आपली विद्या दुसऱ्याला दिली नाही. म्हणून हे ज्ञान-वृक्षाचं कडू फळ.

बैलापुढे चारा आहे. पण त्याला तो खाता येत नाही कारण हा एक धनिक माणूस. आपण केलेल्या दानधर्माचा खूप गर्व चढला होता त्याला. त्यामुळे चांगलं नाव समोर असूनही त्याला मिळालं नाही.

दानधर्माचं समाधान तर मिळावं पण हातचा पैसा जाऊ नये अशी युक्ती करून दोन बहिणींनी एकमेकीनाच दान केलं. ती ही दोन सरोवरं. अरे या अशा संपत्तीचा इतरांना काही उप-योग आहे का? ही झाली दानाची फसवणूक.

आणि गाढव आणि हत्ती जमिनीला खिळल्यासारखे उभे आहेत. ते आहेत तुझा गर्व आणि दुसऱ्याबद्दलची तुच्छता. सुशी-

लेच्या भक्तीला, श्रद्धेला तुच्छ मानलंस आणि आपल्या पराक्रमात दुसऱ्याचा काहीच वाटा नाही असा गर्व झाला तुला. अशी वृत्ती असणाऱ्या माणसाचं पाऊल कणभर तरी पुढे पडेल का? त्याची प्रगती होईल का?'

कौंडिण्याचे डोळे उघडले. आपल्या कष्टात, पराक्रमात सुशीलेच्या श्रद्धेचा, त्यागाचाही वाटा आहे हे पटलं त्याला. अहंकार गळून पडला. त्यानं पुन्हा अपार कष्ट केले. सुशीलेची साथ होतीच. तिच्या जोडीनं त्यानं अनंत वैभव प्राप्त करून घेतलं.

तेच हे अनंताचं अनंतचतुर्दशीचं व्रत.

भाद्रपदातली ही अशी रंगत, संगत. श्रावणासारखा रिमझिमणारा, सुखवणारा पाऊस नाही या महिन्यात. कधी येतो तो मुसळधार तर कधी चक्क उघाडी असते. गणेशोत्सवाचे कार्यक्रम कधी ठरल्याप्रमाणं पार पडतात, कधी जोराच्या पावसानं मांडव ओलाचिंब होतो. कार्यक्रम रद्द होतो. पण आरत्यांचा गजर दणाणत राहतो. मंत्रजागर घुमत राहतो. प्रसाद दिला, घेतला जातो. दहा दिवस कसे वेगळ्या वातावरणात भुर्रकन् उडून जातात. कुणी म्हणतात हा पावसाचा विचका टाळण्यासाठी माघी गणपती उत्सव करावा. पण ही अशी पावसाचीच गंमत असते उत्सवात. हे दहा दिवस आठवण ठेवून जातात विद्यादाता गणपतीची. ज्ञानसंपादनाची. कलांमध्ये प्राविण्य मिळवण्याची.

नद्या, तळी तुडुंब भरली आहेत. पाऊसपाणी भरपूर झालेले आहे. सुखकर्त्या दुःखहर्त्या गणेशाला नकळत मनातल्या मनात वचन दिलं आहे खूप अभ्यास करण्याचं, शिकण्याचं, बुद्धिदात्या गणपतीची ही खरी पूजा सार्थ करण्याचं.

हरतालिका आणि गौरी हवं ते प्राप्त करून घेण्यासाठी

निष्ठेनं प्रयत्न करायला सांगतात.' अहंकारी माणसाची प्रगती होत नाही हे सांगतो अनंत. तेही मनात ठसून राहतं. उगवणाऱ्या शेतातल्या अंकुरासारखे हे पण अंकूर मनात रुजतात आणि फोफावणाऱ्या उगवलेल्या शेतासारखे हे चांगले विचार, चांगले निश्चय मनात रुजून फोफावतात. सगळं आयुष्यच समृद्ध करतात.'

* *

# आश्विन

सोने लुटुनी सायंकाळी
मोरू परतुनि आला
बहीण काशी दारी येऊनि
ओवाळी मग त्याला
दसरा सण मोठा,
नाही आनंदा तोटा

आश्विन महिना हा खरंच 'नाही आनंदा तोटा' असं क्षणाक्षणाला जाणवून देत असतो. केवळ 'दसरा सण मोठा' एवढ्यावरूनच नव्हे तर जिकडं नजर टाकावी तिकडं हिरव्यागार फुलत्या शेतांवरून ती फिरते आणि हा आनंदाचा हिरवा, ताजा रसरशीत रंग उधळून देते. हिरव्या चाऱ्याचा, हिरव्या झाडामाडांचा हा वास अंगात भिनतो आणि नुसत्या वासानंच पोट भरल्यासारखं वाटतं.

आश्विन हा पावसाळ्यातला शेवटचा महिना. पावसाचा जोर तर आता राहिलेलाच नसतो. अधूनमधून एखादी सर 'चुकून यायचं राह्यलं की काय' अशा कल्पनेनं मध्येच डोकावते. तापलेल्या धरणीला पावसानं केव्हाच थंडावा आणलेला असतो. जमिनीत जिरलेला हा ओलावा सगळ्या हवेलाच, वातावरणालाच थंडपणा आणून देतो. थंडीची सुरुवात होऊ लागलेली असते. उन्हाचा कडाका नाही, पावसाची मुसळधार नाही, गुलाबी थंडीची

शिरशिरी मात्र हवीहवीशी वाटते.

हा महिना विजयोत्सवाचा. विजय कशाकशावर ? सगळ्या अनिष्ट गोष्टींवर विजय.

लौकर निजे लौकर उठे
तया ज्ञान आरोग्य संपत्ती भेटे

पण लौकर उठलंच नाही तर ? या आळशीपणामुळे आपण लौकर उठण्याचे सगळेच फायदे घालवणार. ते आळशीपण घालवायचं म्हणजे लौकर उठायचं.

'पण लौकर उठून करायचं काय ?' 'कार्तिकस्नान आणि मग काकडआरती करायची असली तर यायचं माझ्याबरोबर देवळात.'

'म्हणजे ग काय, आई ?' प्रज्ञाने विचारले.

'हे बघ आता पावसाळा संपत आलाय. आश्विन महिना आला की सकाळी कशी छान हवा असते. तेव्हा उठायचं. मग जास्त थंडी पडायला लागेपर्यंत एक महिनाभर करायची सकाळी आंघोळ. ही कार्तिकाच्या महिन्यापर्यंत करायची म्हणून तिला म्हटलं आहे कार्तिकस्नान. आंघोळ केल्यावर एकदम कसं उत्साही वाटतं. मग आपलं जर घर खेड्यापाड्यात असेल तर आपल्याला उगवता सूर्य पहात पहात नदीकिनारी जाता येईल. शेताच्या बांधावरून फुललेल्या शेतांची शोभा बघता येईल. शेतावरचा हिरवा सुगंधी वारा अंगावर घेता येईल. कुठं एखाद्या टेकडीवर पूर्वेच्या बाजूला फटफटताना चढून जाता येईल. तोवर उजाडेल. मग चारी बाजूला नजर टाकली की दिसतील शेतं, नद्या, तळी. आकाशाचा गुलाबी रंग कसा मजेदार वाटेल. हे काहीच करता आलं नाही तर माझ्याबरोबर नाहीतर आजीबरोबर काकड-

आरतीला येता येईल.'

'काकडआरतीला ?' संदीपला शब्द नवीन होता.

'हो. अरे कार्तिकस्नान करायचं आणि महिनाभर सकाळी देवळात जायचं. काकडा म्हणजे देवाची आरती करण्याची पेटवलेली ज्योत. काकडआरतीची खूप गाणी असतात. तू ऐकलं आहेस ना, आजी तुला पहाटे उठवताना म्हणते ते– उठी गोपाळजी जाय धेनूकडे–'

'हो. मग मी तिला म्हणतो– दे धेनू आणून म्हणजे जातो तिच्याकडे.'

'आणि ती म्हणते– बाबा मी काय यशोदा आहे का? पण तू माझा कृष्णच आहेस. हे गाणं आजी देवळात छान म्हणायची. आता तिला येववत नाही. म्हणून घरीच म्हणते. ही काकडआरतीची गाणी दोन दोन तास चालतात. कृष्णाला उठवण्यापासून सबंध दिवसाचे त्याचे कार्यक्रम आटपून त्याला झोपवण्यापर्यंत लहान मूल मानून सगळी गाणी म्हणतात. अरे, पुण्याच्या देवळात तर दोनदोनशे बायका एकदम ही गाणी म्हणायच्या. आजीचा आवाज खूप गोड होता. ती सांगायची ही गाणी देवळातल्या बायकांना. तुझ्या बाबांनासुद्धा न्यायची बरोबर. लोणी, खडीसाखरेच्या वाटीवर नजर असायची त्यांची असं सांगते आजी.'

'कुठली लोणीसाखर?'

'अरे, नैवेद्याला ठेवलेली.' बाबा आत येत म्हणाले. 'अरे, त्या प्रसादाला उदबत्तीचा, फुलांचा असा काही छान स्वाद लागायचा; ती चव तुमच्या कुठच्या पक्वान्नाला देखील नाही.'

'बाबा, पण तुम्ही बायकांच्यात जात होतात?' संदीपने आश्चर्याने विचारले.

'अरे, मी खूप लहान होतो तेव्हा! आता तू मोठा झाला आहेस. पण ताईला जायला काही हरकत नाही. तिला सांग लोणी-साखरेची वाटी द्यायला तुला.'

'ताई गेल्यावर्षीपासूनच येतेय म्हटलं माझ्याबरोबर देवळात. सगळी गाणीं पाठ केली आहेत तिनं काकडआरतीची. पण संदीप, तू देवळात येणार नसलास तरी–'

'तरी मी पहाटे आंघोळ करीन. मला उठव. मग मी नि शेजारचा विनय दोघं जाऊ फिरायला.'

अशी ही काकडआरती पुण्याला देवळादेवळातून व्हायची. पहाटेच्या वेळी गोड चालींची एका सुरात म्हटलेली गाणी ऐकून कान तृप्त होत असत.

वाईट साईटाचा मागमूस राहू नये म्हणून असं सुंदर, पवित्र वातावरण देवळात निर्माण करायचं. देव तरी वेगवेगळे अवतार घेतो असं आपण म्हणतो ते कशासाठी ? दुष्टांचं पारिपत्य करण्यासाठीच.

नवरात्र म्हणजे नऊ रात्री. देवी दुष्टांचा संहार करण्यासाठी नऊ रात्री लढली आणि तिनं त्यांचा नाश करून विजय मिळवला तो विजयादशमी किंवा विजयाचा दहावा दिवस, दसरा.

महिषासुर फार मातला होता. सर्व देव खूप रागावले. त्यांच्या सगळ्यांच्या क्रोधातून एक शक्ती निर्माण झाली. दहा दिवस दहा वेगवेगळ्या वाहनांवर बसून ही देवी महिषासुराशी लढली. तिनं त्याला शेवटी ठार मारलं, तिचं नाव पडलं महिषासुरमर्दिनी.

देवीच्या देवळातून हा नवरात्र उत्सव फार मोठ्या प्रमाणात

म्हणूनच साजरा केला जातो. पुण्याला अष्टभुजादेवीच्या देवळात नऊ दिवस देवीची आरास करतात. रोज नवं वाहन. रोज नवा पोषाख. आठ हातात आठ शस्त्रं. पायाशी महिषासुर. देवीची ही आरास पाहायला अलोट गर्दी लोटते रात्री या देवळात.



कलकत्त्याला तर हा नवरात्रोत्सव फारच मोठ्या प्रमाणावर होतो. महाराष्ट्रात जशा चौकाचौकात मांडव घालून गणपतीच्या मूर्ती बसवतात तशा देवीच्या मूर्ती बंगालमध्ये बसवतात सार्व-जनिकच नव्हे तर हा दुर्गापुजेचा उत्सव हा बंगालचा राष्ट्रीय महोत्सव मानला जातो. आश्विन प्रतिपदेपासून नऊ दिवस उत्सव होतो. दहाव्या दिवशी देवीच्या मूर्ती वाजत गाजत नेऊन समुद्रात विसर्जन करतात.

'पण मग आपण घरी गणपती बसवतो तशी देवी घरी बसवतात ?'

'हो. देवघरात देवीची मूर्ती बसवतात. घटस्थापनाही करतात.'

'घटस्थापना म्हणजे काय ?'

'म्हणजे एक घट किंवा कलश घ्यायचा. त्यात धान्य पेरायचं. दहा दिवसात ते उगवतं. रोज त्या घटाची पूजा करायची, त्याला माळ घालायची. रोज एक माळ याप्रमाणे नऊ दिवस नऊ माळा वहायच्या.'

'हे आपल्या मावशीकडं पण करतात की. मी बघितलंय !' प्रज्ञा म्हणाली.

'हो. आपण नवरात्रात घटस्थापना करतो.'

'पण कशासाठी हे धान्य पेरायचं ?'

'अरे, आता शेतातही धान्य उगवतं नाही का ? नवीन धान्य येतं म्हणून हा त्या धान्याच्या स्वागताचा उत्सव असतो. अरे, शेतकरी तर नवमीच्या दिवशी शेतात तयार झालेला भाताचा लोंगर आणून त्याची पूजा करतात. दारावर देखील टांगून ठेवतात. अन्नधान्य आपल्याला जगवतं म्हणून त्यांचं स्वागत करायचं. त्याच्याबद्दलची कृतज्ञता प्रगट करायची.'

'पण आपण बंगालसारखी दुर्गापूजा करीत नाही का ?'

'नाही. ती पद्धत फक्त बंगालमध्येच आहे. देवीच्या देवळात आणि मांडवात तर गाणी, वाद्यसंगीत, नाटकं सगळे कार्यक्रम होतात देवीपुढे. माणसं मूर्ती बघायला रस्त्यारस्त्यातून हिंडत असतात. 'कालीमातेचा विजय असो' अशा घोषानं तर सगळं आकाश दुमदुमत असतं. गणपती उत्सवात कसे लहानमोठे, गरीबश्रीमंत

सगळे एकत्र येऊन भाग घेतात, तसंच असतं या दुर्गापूजेच्याही उत्सवाचं.'

'देवीची मूर्ती कशी असते ग ?'

'ती मात्र गणपतीसारखी हासरी नसते हं ! बोलूनचालून ती राक्षसाच्या नाशासाठी प्रगट झालेली रणचंडी. तिचं रूप तसंच भयंकर असतं. जीभ बाहेर काढलेली, रागानं डोळे लालबुंद झालेले, हातात वेगवेगळी शस्त्रं, एका हातात उपसलेली तलवार, एका हातात राक्षसाचं मुंडकं धरलेलं आणि राक्षसाच्या अंगावर पाय देऊन नाचते आहे अशी असते ही मूर्ती. राक्षसाला मारणारी देवी ती इतकी उग्र असणारच नाही का ?'

'आणखी पण कुठे होतो का हा उत्सव ?' संदीपची उत्सुकता फारच वाढली.

'हो. गुजराथमध्ये होतो. पण तो असा दुर्गापूजेचा नाही हं. तो नवरात्राचा अगदी सौम्य. वेगळ्याच प्रकारचा. ऐक हं. भिंतीवरची एक छोटीशी जागा निवडतात. ती पांढऱ्या रंगानं रंगवतात. त्यावर काढतात शेंदुराचा त्रिशूळ.'

'तो कशाला ?' प्रज्ञाने विचारले.

'तो त्रिशूळ म्हणजेच दुर्गादेवी मानतात. त्या भिंतीपुढे त्रिशूळाखाली मातीचा एक ढीग रचतात. त्या मातीत पेरतात गहू आणि बाजरी.'

'म्हणजे घटासारखी?'

'हो. या ढिगाच्या मधोमध एक कलश ठेवतात. त्यावर ठेवतात नारळ. एका मातीच्या भांड्याला भोक पाडतात. त्या भांड्यात एक दिवा ठेवतात. तो नऊ दिवस त्रिशूळापुढे पेटत ठेवतात. या सगळ्या गोष्टींची खेड्यापाड्यात तर यापेक्षा मजा.'

'ती कसली?'

एखाद्या मोकळ्या मैदानात झाड किंवा खांब पुरतात. त्याला दिवे टांगतात आणि त्याच्याभोवती फेर धरून मुली आणि बायका गाणे म्हणून नाचतात. हा खांब, दिवे वगैरे रचना असते ना, त्याला म्हणतात गरबी आणि त्या गाण्याला म्हणतात गरबा.'

'हं, म्हणजे ताईनं शाळेच्या गॅदरिंगमधे केला होता तसला नाच? गरबा नृत्य?'

'हो. अरे घरातसुद्धा देवापुढच्या दिव्याभोवती नाच करतात. हा नाच बघायला बाहेरच्या लोकांनासुद्धा बोलावतात.'

'आई, पण नवरात्रात ते मशाली पेटवून कोण ग येतात गाणी म्हणत?' 'अरे, ते भुत्ये! अंबाबाईचे भक्त. ते घरोघर कपडे आणि तेल गोळा करीत हिंडतात. अंबाबाईचा जोगवा म्हणून धान्य मागत बायकासुद्धा हिंडतात घरोघर. सगळे देवीच्या पूजेचेच प्रकार. सगळ्यांचं म्हणणं एकच– पृथ्वीवरचं अनिष्ट जाऊ दे आणि चांगलं घडू दे.'

'बाबा, मघाशी तुम्ही तुमच्या लहानपणी पुस्तकात होती ती कविता मला सांगितलीत. त्यातला मोरू खरं सोनं लुटायला गेला होता?'

'खरं? नाही रे बाबा! पण खरं सोनं एकेकाळी लुटून आणलं जाई आणि लुटलंही जाई. हे बघ, विजयादशमी किंवा दसरा, म्हणजे विजयाचा दिवस. या दिवशी खूप वेगवेगळ्या प्रकारांनी विजयोत्सव करतात. इतिहासात, पुराणात या सोनं लुटण्याबद्दल आणि विजयोत्सवाबद्दलचे कितीतरी प्रसंग आहेत.'

'सांगा ना मला, बाबा!'

'हे बघ, अजूनसुद्धा तुम्ही मुलं दसऱ्याला सोनं लुटायला

जाता. ते सोनं म्हणजे काय असतं?'

'ती पानं असतात. दारावर ती बाई देते फांद्या विकत, त्याच तर घेऊन जातो आम्ही एकमेकांना द्यायला. एकेक पान तोडून देतो.'

'पण ती फांदी कसल्या झाडाची असते?'

'कसल्या? हं, आपट्याच्या झाडाची. पण याच झाडाची पानं का लुटायची?'

'तेच सांगतो.

स्कंद पुराणात त्याची गोष्ट आहे. पूर्वीच्या काळी वरतंतु नावाचे एक ऋषी होते. तुला माहीतच आहे पूर्वी ऋषिमुनींकडे विद्यार्थी शिकण्यासाठी जात. त्यांच्या आश्रमात राहात. कृष्ण कसा सांदीपनी ऋषींच्या आश्रमात राहात असे, तसाच एक मुलगा कौत्स या वरतंतु ऋषींच्या आश्रमात शिक्षणासाठी राहिला होता. त्याचं शिक्षण पूर्ण झालं. त्यानं आपल्या गुरूचे आभार मानले आणि म्हटले,

'गुरुजी, तुम्ही मला इतकी विद्या दिलीत. मी तुम्हाला काय गुरुदक्षिणा देऊ?'

'अरे, दक्षिणा घेऊन विद्या द्यायची नसते. तू इतका शिकलास, शहाणा झालास यातच मला आनंद आहे. हीच माझी गुरुदक्षिणा.'

पण कौत्स काही आपला हट्ट सोडीना. तेव्हा शेवटी वरतंतु ऋषी म्हणाले,

'मी तुला चौदा विद्या शिकवल्या. तेव्हा प्रत्येक विद्येबद्दल एक अशा चौदा कोटी सुवर्णमुद्रा मला आणून दे!'

कौत्साला वाटले–आपल्याला एवढ्या विद्या येतात, तेव्हा

आपण सहज या चौदा कोटी सुवर्णमुद्रा मिळवू.

पण ही काही सोपी गोष्ट नव्हती. मग त्याला असं समजलं की रघुराजा हा फार उदार आहे. त्याच्याकडं मागितलं तर?

कौत्स गेला रघुराजाकडं. पण त्याला समजलं की नुकताच रघुराजानं विश्वजित यज्ञ करून आपली सगळी संपत्ती दान करून टाकली आहे.

कौत्साला रघुराजानं विचारलं, 'आपण कशासाठी येणं केलं महाराज?' कौत्स म्हणाला,

'आलो होतो एका कामासाठी. पण आता ते तुझ्याकडून होईलसं वाटत नाही.'

'असं नका म्हणू, महाराज. या रघुराजाकडून कुणीही निराश होऊन परत गेलेलं नाही.'

'अरे, पण मला चौदा कोटी सुवर्णमुद्रा हव्या होत्या आणि तू तर तुझं सगळं द्रव्यभांडार लुटून टाकलं आहेस. पण वाईट वाटून घेऊ नकोस. मी दुसरा दाता शोधतो.'

रघुराजा हसला आणि म्हणाला, 'कौत्समहाराज, मला तीन दिवसांची मुदत द्यां. मी आपली मागणी पूर्ण करीन.'

इंद्राचा खजिनदार कुबेर. त्याच्याकडे रघुराजाचे कितीतरी पैसे येणं होतं! ही थकलेली बाकी वसूल करण्यासाठी त्यानं कुबेराला निरोप दिला. कुबेरानं त्याकडं फारसं लक्ष दिलं नाही. तेव्हा त्यानं पैसे वसूल करण्यासाठी इंद्राशी लढाई करण्याची तयारी केली. इंद्राला हे कळताच तो घाबरला. त्यानं कुबेराला रघुराजाचे पैसे देऊन टाकण्याची आज्ञा केली आणि कुबेराकडून अयोध्या नगरीच्या वेशीवर आपट्याच्या झाडावर सुवर्णमुद्रांचा वर्षाव केला.

रघुराजानं त्या सुवर्णमुद्रा कौत्साला दिल्या. कौत्सानं त्या वरतंतु ऋषींना नेऊन दिल्या. पण त्या खूप होत्या. ऋषींनी त्यातल्या फक्त चौदा कोटी मुद्रा ठेवून बाकीच्या कौत्साला परत दिल्या. कौत्स म्हणाला, 'यावर माझा हक्क नाही. मला या नकोत.' त्यानं त्या रघुराजाला परत दिल्या. रघुराजा म्हणाला,



'मी या मुद्रा आपल्याला दिल्या आहेत. दिलेलं दान मी परत घेत नसतो.'

'आता या उरलेल्या मुद्रांचं करायचं काय?

मग रघुराजानं त्याच गावाबाहेरच्या आपट्याच्या झाडाखाली या सुवर्णमुद्रांचा ढीग रचला आणि लोकांना त्या घेऊन

जायला सांगितलं.

लोकांना अनायासं श्रीमंत होण्याची संधी मिळाली. त्यांनी त्या झाडाची पूजा केली. मनसोक्त त्या मुद्रा लुटून नेल्या. एकमेकांना दिल्या.

हा दिवस होता विजयादशमीचा. तेव्हापासून या आपट्याच्या झाडाची पानं लुटून, एकमेकांना देऊन आनंद प्रकट करायला लोकांनी सुरुवात केली. हा आनंद आणि विजय होता सर्वांचाच. कौत्साचा, वरतंतु ऋषींचा आणि रघुराजाचाही.

ही पुराणातली कथा झाली.

पूर्वीच्या काळी रजपूत लोकांनी उत्तर भारतात पुष्कळ ठिकाणी आपली सत्ता स्थापन केली होती. रजपूत हे शिवभक्त आणि शंकराची बायको पार्वती ही आदिशक्ती मानतात. म्हणूनच रजपूत लोक नवरात्रात देवीच्या ऐवजी तोफेची पूजा करतात. तोफेवर कुंकवानं त्रिशूळ काढतात आणि भोवती दिवे पेटवतात.'

'दसऱ्याचा मुहूर्त म्हणजे काय पण?'

'अरे, मुहूर्त म्हणजे चांगला दिवस. एखाद्या चांगल्या कामाची सुरुवात चांगल्या दिवसानं करावी असं म्हणतात. दसरा हा विजयाचा दिवस. तेव्हा या दिवशी सुरू केलेल्या कामात विजय मिळणारच. पूर्वी म्हणूनच लढाईवर या दिवशी जात. तुझं नावही दसऱ्यालाच शाळेत घातलं.'

'शाळेत जाणं म्हणजे काय लढाई?'

'लढाई नाही कशी? अज्ञानाशी लढाईच असते आणि विद्येचा आरंभ दसऱ्याला केला की शिक्षण चांगलं होणारच. गणपतीची बायको सरस्वती हिला तर विद्येची देवी मानतातच. तेव्हा शाळांमधे सरस्वती किंवा शारदोत्सव करतात. तो याच

दहा दिवसात. तू मघाशी लढाई म्हणालास ना तसाही अर्थ आहे विजयादशमीला, वेगळा...'

'पांडव वनवासात होते ते माहीत आहे ना तुला?'

'हो. आणि तेव्हा त्यांनी आपली शस्त्रं शमीच्या झाडावर ठेवली होती. मग ती काढून घेऊन ते कौरवांशी लढले. मी वाचलं आहे.' संदीपने माहिती दिली.

'ती शस्त्रं त्यांनी काढून घेतली ती दसऱ्याच्या दिवशी आणि मग कौरवांबरोबर झालेल्या पहिल्याच लढाईत विजय मिळवला. रामानंही रावणाबरोबर लढाई करण्यासाठी कूच केलं तो दिवस दसऱ्याचाच होता. रजपूत राजे, मराठी राजे नेहमी लढाईवर जात तेव्हा दसऱ्यालाच निघत. कारण या दिवशी निघालं की लढाईत विजय मिळणार अशी खात्रीच असे त्यांची.

स्वातंत्र्य पूर्वीच्या काळात भारतात संस्थानं होती तेव्हा मोठमोठे संस्थानिक विशेषत: बडोदे, म्हैसूर यासारख्या संस्थानचे संस्थानिक दसऱ्याचा फार मोठा उत्सव करीत. मोठ्या लव्या-जम्यासह सीमोलंघन करून लढाईचा थाट दाखवीत. मग मोठा दरबार भरवीत. पदव्या, जहागिरी, नेमणुका यांची खैरात करीत. पूर्वीच्या काळी क्षत्रिय लोक जिंकून आणलेलं सोनं शत्रूवर स्वारी करताना आपल्या सैनिकांकडून लुटवीत असत असं म्हणतात, बरं का?'

'म्हणजे बाबा, ही विजयादशमी म्हणजे खरी खरी विजयाची पताका हो ना?'

'हो. पण नुसता विजय मिळवून आणून नंतर काही न करता स्वस्थ बसायचं नाही. आपली कामं सतत करीत रहायचं. नाहीतर लक्ष्मी जाते रूसून आणि अक्काबाईचा फेरा येतो असं

सांगते कोजागिरी.'

'अक्काबाईचा फेरा? ही अक्काबाई कोण?'

'लक्ष्मीची मोठी बहीण. तिचं नाव अक्काबाई. कोजागिरी पौर्णिमा म्हणजे पण देवीचीच. आश्विन महिन्यातल्या देवीच्या पूजांपैकी ही शेवटचीच पूजा.

कोजागिरीला आपण मसाल्याचं दूध नाही तर कॉफी पितो. चांदण्यात गच्चीवर खेळतो. गेल्या वर्षी आपण काकांच्या गावी गेलो होतो. आठवतं ना?'

'हो. आठवतं की. काय मज्जा आली होती.'

'येणारच. पावसाळा संपलेला असतो. आकाश कसं निळं निळं निरभ्र. शुभ्र चांदणं पसरलेलं. मग या चांदण्यात मज्जा वाटणारच. पण आपण जागे होतो म्हणून. जर का झोपलो असतो तर...'

'तर काय झालं असतं ?'

'अरे, मग कोजागिरीची देवी आली असती विचारीत– 'को जागर्ति–' कोण जागं आहे ? आणि आपण झोपलेले असतो तर ती रागावून निघून गेली असती आणि तिच्या मोठ्या बहिणीचा, अक्काबाईचा फेरा आला असता. लक्ष्मी म्हणजे सगळा आनंद आणि अक्काबाई म्हणजे दुःख.'

'कोजागिरी कशासाठी जागं राहायला सांगते ? दूध पिण्यासाठी ?'

'वाः खाबूराव ! कोजागिरी विचारते–कोण जागं आहे ? म्हणजे कोण आपल्या कर्तव्याला जागतं आहे? म्हणजे कोण कोण आपलं काम नीट करतं आहे? शेतकरी शेतात काम करताहेत ना? मुलं अभ्यास करताहेत ना ? मोठी माणसं आपापली कामं नीट

आनंदानं पार पाडताहेत ना? हे जागेपण, ही जागृती कर्तव्याची.'

'हं ! म्हणजे कोजागिरी म्हणते–जे कोणी आपापलं काम नीट करील त्याला चांदण्यात दूध पिण्याचा आनंद मिळतो तसा आनंद मिळेल.'

'हो. म्हणजे भरपूर खायला प्यायला मिळेल. खेळायला, हसायला मिळेल. म्हणूनच कोजागिरीनं विचारलं, 'कोण जागं आहे ?' की उत्तर द्यायचं–'

'मी जागा आहे. मी माझं काम करणार आहे.' संदीप एकदम जोरात म्हणाला.

'बरोब्बर ! अशी ही कोजागिरी सर्वांना जागं ठेवणारी. आकाशात चांदण्यांचे दिवे लागतात आणि आपणही दिवाळीच्या दिव्यांची तयारी करतो. आश्विन वद्य तृतीयेलाच दिवाळी सुरू होते.'

'पण बाबा, दिवाळीत व दिवे का हो लावायचे ? आकाशात चांदण्या चमचमतात म्हणून आपण आकाशदिवा लावायचा ?'

'छान कल्पना आहे हं तुझी ! पण एका छोट्या मुलीनं केलेल्या युक्तीची आठवण म्हणून दिवाळीत दिवे लावायला सुरुवात झाली. पूर्वी एक हैम नावाचा राजा होता. त्याच्या मुलाचं चौदाव्या वर्षी लग्न झालं. त्याची नवरी होती त्याच्यापेक्षा थोडी लहान, बारा वर्षांची. त्या राजपुत्राला लग्नाच्या चौथ्या दिवशी झोपेत साप चावून मृत्यू येणार असं भविष्य सांगितलेलं होतं–

या मुलीनं, राजकन्येनं काय केलं लग्नाच्या चौथ्या दिवशी राजपुत्राला झोपूच दिलं नाही. ती गोष्टी सांगत बसली, गाणी म्हणत बसली आणि तिनं केलं काय–राजपुत्राच्या महालाच्या

दारात खूप मोठा दागिन्यांचा, पैशांचा ढीग रचला आणि चौफेर दिवे लावून ठेवले.

सापाचं रूप घेऊन यमाचा दूत आला राजपुत्राला चावायला. पण इतका लखलखाट होता सगळ्याभर की त्याचे डोळेच दिपले.



आणि त्याला खोलीत जायची वाट दिसेना. त्याला दिसला संपत्तीचा ढीग. तो त्या ढिगावर चढून बसला. राजकन्येनं पुंगी वाजवायला, गाणी म्हणायला सुरुवात केली आणखीनच जोरात. मग साप रात्रभर तिथंच डोलत बसला.

सकाळ झाल्याबरोबर त्याला परत जावं लागलं. राजपुत्र काही गेला नाही. या छोट्या पोरीनं यमाला चकवलं म्हणून तिच्या आठवणीसाठी तिने लावले तसे आपण सगळ्याभर दिवे

लावतो. तो दिवस होता धनत्रयोदशीचा म्हणून त्या दिवशी यमालाही दिव्याचं दान करतात. यमदीपदान म्हणतात त्याला.'

मुलांनी ही गोष्ट ऐकली मग संदीप म्हणाला,

'पण बाबा, व्यापारी लोक वगैरे दिवाळीत लक्ष्मीपूजन करतात ते कशाला ?'

'पूर्वी बळी नावाचा खूप पराक्रमी राजा होता. त्यानं सगळ्या देवांना पकडून तुरुंगात टाकलं. सगळ्यांच्याबरोबर लक्ष्मी पण कोंडली गेली. मग विष्णु बनला वामन. त्यानं बळी-राजाच्या डोक्यावर पाय ठेवला. बळी गेला पाताळात. लक्ष्मी सुटली कैदेतून इतर देवांबरोबर. तिच्या सुटकेचा दिवस म्हणून तिची पूजा करतात त्या दिवशी. म्हणजे पुन्हा ती लक्ष्मी असुरांच्या म्हणजे चोरदरोडेखोरांच्या हाती जाऊ नये आणि चांगले व्यापार उद्योगधंदे करणारांच्या हातीच ती राहील असं वाटतं लोकांना. पूजा ही फक्त आठवणीसाठी. ती लक्ष्मी राहावी म्हणून उद्योगधंद्याकडे लक्ष द्यायचं. मनात ठेवायचं– आपण या व्यापाराकडे, उद्योगांकडे लक्ष दिलं नाही तर लक्ष्मी, म्हणजेच पैसा मिळणार नाही.'

'हं! आता कळलं. पण बाबा आणखी एक राह्यलं!'

'काय राह्यलं आणखी?'

'अहो, नरकचतुर्दशीला अगदी पहाटे आई उठवते आणि म्हणते लौकर आंघोळ करून नरकासुराला मारा नाहीतर नरकात जाल. ते कारीटाचं फळ आम्ही पायानं चिरडतो तो नरकासुर? तो असा होता?'

'छे: रे! तुम्ही काय खऱ्या नरकासुराला का मारणार? तो काय कायम असतो तुमच्यापुढे उभा करून ठेवलेला मारण्या-साठी ? अरे, हे सगळे सण म्हणजे एकेका प्रसंगाच्या आठवणी

आणि प्रतिकं. हे वघ, आश्विन वद्य चतुर्दशी म्हणजे नरकचतुर्दशी. भागवतात अशी कथा आहे की नरकासुर नावाचा राक्षस एकदा खूप माजला होता. त्यानं आपल्या राजधानीच्या भोवती पर्वतांचे आणि शस्त्रांचे कोट रचले. जिंकून आणलेल्या सोळा हजार राज-कन्यांना त्यानं कोंडून ठेवलं होतं. श्रीकृष्णाला हे समजताच त्यानं त्याच्याशी लढाई करून, त्याच्या किल्ल्यावर स्वारी करून त्याला ठार मारलं आणि राजकन्यांची सुटका केली. चतुर्दशीच्या दिवशी अगदी पहाटे, उषःकाली कृष्ण परत आला. त्यानं नरकासुराच्या रक्ताचा टिळा कपाळी लावला होता. तो परत येताच नंदानं त्याला मंगलस्नान घातलं. सगळ्या स्त्रियांनी दिवे ओवाळून पंचारती केली. या युद्धाचं स्मारक म्हणून नरकचतुर्दशीला दिवा-ळीचा मुख्य दिवस समजायला लागले लोक. स्वतःला समजायचं कृष्ण, ते कारीटाचं फळ समजायचा नरकासुर आणि त्याला पहाटे पायाखाली ठेचून गरम पाण्यानं आंघोळ करायची, आईकडून ओवाळून घ्यायचं, गरीबगुरिबांना त्रास देणाऱ्या दुष्टांचा नाश करायचा, त्यांना शिक्षा करायची हे लक्षात ठेवायचं. उगीच कृष्ण समजता येत नाही स्वतःला म्हटलं !

असा हा भरपूर, वेगवेगळ्या प्रसंगांनी भरलेला आश्विन. दुष्टांचा संहार करण्यासाठी देवीला म्हणजे शक्तीला आवाहन करणारा, आनंदाला तोटा नाही असं सांगणारा दसरा, याच दिवशी चांगल्या कामाला सुरवात करा म्हणून सांगतो. दसऱ्याला शाळेत नाव घाला, म्हणजे चांगलं शिक्षण होईल असं सुचवतो. इतिहासात, पुराणात लोकांनी मिळवलेल्या विजयाची कथा मनात ठसवतो. खरी सोन्याची लूट म्हणजे काय ते समजावून सांगतो. 'गुरुजींना काही दिल्याशिवाय, गुरुदक्षिणा दिल्याशिवाय शिक्षण कसं पूर्ण

झालं? असं म्हणणारा कौत्स, 'मी चौदा कोटी सुवर्णमुद्रा मागितल्या, जास्त कशा घेऊ ?' असं म्हणून बाकीच्या परत करणारे वरतंतु ऋषी, आणि 'मी दिलेलं दान परत घेणार नाही' असं म्हणून उर-लेल्या सुवर्णमुद्रा लोकांना लुटून न्या म्हणून सांगणारा, याचकाला निराश होऊन परत जाऊ न देणारा रघुराजा ह्या आश्विनातल्या निरभ्र आकाशात चमचमणाऱ्या ताऱ्यांसारख्या तत्त्वनिष्ठ व्यक्ती. 'कर्तव्यासाठी कोण जागं आहे ?' म्हणून विचारणारी कोजा-गिरी. युक्तीनं यमदुतालाही परत फिरायला लावणारी हैमराजाची छोटी सून. नरकासुरासारख्या गरिबांना त्रास देणाऱ्याचा नाश करणारा कृष्ण. या सगळ्यांच्या विजयाची कथा गुंफणारा महिना म्हणजे आश्विन. 'चौफेर फुललेल्या धान्यांच्या कणसा-तल्या मोत्यांची रास कष्ट केलेत तर, आपापलं काम केलंत तर तुमच्या अंगणात रचली जाईल.' असं सांगणारा हा आश्विन. सुजला, सुफला मातृभूमीला आपल्या कर्तृत्वानं, विजयश्रीची माळ घालून सजवायला सांगणारा आश्विन. क्षणाक्षणाला, वाऱ्याच्या झुळुकीतून, नदीझऱ्यांच्या खळखळाटातून, शेतातल्या डोलणाऱ्या कणसाच्या दाण्यादाण्यातून आणि चमचमणाऱ्या चांदण्याच्या चमचमाटातून प्रकट होणारं, उमटणारं आश्विनाचं हे सांगणं मनात साठवून जगण्याचं व्रत घेतलं, निश्चय केला तर खरंच आनंदाला तोटा येईलच कसा ?

❋ ❋

# कार्तिक

पावसाळा जवळ जवळ संपलेला आहे. उगीच कुठे थोडीशी भुरभुर येते चिडवायला आणि पाऊस संपला म्हणून रेनकोट, छत्र्या परत बासनात गुंडाळून ठेवणारांची फजिती पाहून हसते.

ते हसणं कसं स्वच्छ! सारा परिसरही असाच स्वच्छ करायला हवा आता. नरकचतुर्दशीला नरकासुराला मारलं. तो असुर गेला पण पावसाळ्यात ठिकठिकाणी निर्माण झालेला नरक नाहीसा केला नाही तर स्वच्छ मनानं हसता कसं येईल ?

हा कोणता नरक ?

पावसाआधी येतात वाऱ्याचे झोत. ग्रीष्म ऋतूत पिकून पिवळी झालेली पानं अगदी जीर्ण होतात. वाऱ्याच्या झोताचा वेग त्यांना सहन होत नाही. कशीबशी देठाला घट्ट पकडून राहिलेली ही पानं एकदम ती पकड सुटून खाली येतात भिरभिरत. त्यातली काही जागोजागी साठून राहिलेली असतात. काही उडत जाऊन तळ्याच्या पाण्यात पडतात. विहिरींच्या पाण्यावर दिसावतात.

गावाबाहेर गाईगुरांचं शेण न वाळता तसंच साठलेलं असतं. चिखल झालेलाच असतो. त्यात ही पानं, शेण साठून आणखीनच घाण होते. आळ्या, किडे होतात सांडपाण्याचे ओहोळ असले तर तिथं डास गुणगुणतात. माणसाच्या रक्ताची तर त्यांना चटकच लागलेली असते. ते मग आपल्या रक्तावर पोसले जातात. नुसतं रक्तच पितात असं नाही तर आपल्याला तापाची बक्षिशीही देऊन

जातात. माशा तर काय रोगराई पसरवणारी उडती यंत्रं. दिवाळीचे चार दिवस आनंदाचे गेले की हा नरक दूर करण्याचं मनाशी ठरवून सर्वांनी कामाला लागायचं. आश्विनात सुरू झालेली दिवाळी कार्तिकात खऱ्या कर्तृत्वानं उजळायची. ही दिवाळी कशी आश्विन आणि कार्तिक दोन महिन्यात वाटून दिलेली. उगीच भांडण नको. आई नाही का म्हणते,

'काय दिवे लावायचे ते लावा. पण भांडू नका.'

'दिवाळीचा फराळ हेच तर सांगत असतो. एकमेकांकडं जायचं. एकमेकांना फराळाचं खाऊ घालायचं. सगळी भांडणं विसरून तोंड गोड करायचं. आपलं घरदार उजेडानं भरून टाकायचं दिव्यांची ओळ लखलखते तसा आसमंत लखलखला पाहिजे आणि मनही प्रेमाच्या तेजानं चकाकलं पाहिजे.

आली दिवाळी, मंगलवेळी
घालू चला रांगोळी—

गाणं रंगलं आहे.

वेळ मंगल आहे. दिवाळीचा आनंद मनात ओसंडून वाहतो आहे. घराघरांची साफसफाई झालेली आहे. कुठं घरांना नवा रंग दिला आहे. तो झुळझुळतो आहे.

आश्विन सरता सरता येणाऱ्या दिवाळीचं स्वागत मोठ्या आनंदानं होतंय घराघरात. दारातली जागा स्वच्छ करून, सारवून रांगोळ्या काढण्यासाठी रांगोळी, वेगवेगळे रंग यांची जमवाजमव झाली आहे. आकाशदिव्यांसाठी कामटयांचे सांगाडे तयार झाले. रंगीबेरंगी कागद चिकटवून वेगवेगळे आकार सजले आणि आकाशात आकाशदिवे डोलू लागले.

दिवाळीला रंगरूप यायला लागलं. कार्तिकाचा पहिला

दिवस म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा. ही जशी बलिप्रतिपदा म्हणतात तशीच ती गोवर्धन प्रतिपदाही म्हणतात.

खरं तर, पावसाळा संपलेला होता. पण तरीही या दिवशी खूप मुसळधार पाऊस पडला. त्या पावसाचं कारण इंद्राचा राग. पावसाचा देव इंद्र. त्याची पूजा करायची अशी प्रथा. कृष्ण म्हणाला वरुणदेव पावसाचा. सर्वांनी त्याची पूजा केली. गोवर्धन पर्वताची पूजा केली. मग इंद्राला राग आल्याशिवाय कसा राहील?



इंद्रानं मुसळधार पाऊस पाडायला सुरुवात केली. गोपगोपी, गुरवासरं सगळी पावसानं झोडपून निघायला लागली. काय करावं सुचेना.

शेवटी कृष्णानं गोवर्धन पर्वत उचलून धरला. त्या पर्वताखाली सगळ्या लोकांना, गोपगोपींना, गाईगुरांना त्यानं आश्रय दिला म्हणून या दिवसाला गोवर्धन प्रतिपदा असं नाव दिलं.

पावसानं झोडपलं, नैसर्गिक संकट आली म्हणून नुसतं घाबरून कसं चालेल? काहीतरी मार्ग शोधायला हवा, आसरा धुंडाळायला हवा. वाटेल तेवढ्या जोरदार पावसालाही न जुमानणारा असा आश्रय निर्माण करायला हवा. श्रीकृष्णानं हाच मार्ग दाखवला गोपगोपाळांना. संकटांना भिऊन चालत नाही. त्यावर युक्तीनं, शक्तीनं त्या संकटांवर मात करायला हवी.

या गोवर्धन प्रतिपदेला या प्रसंगाची आठवण म्हणून गोठ्यात शेणाचा गोवर्धन करायचा. कारीटांची गाईगुरं करायची. त्यांची पूजा करायची अशी पद्धत सुरू झाली. गाईगुरं म्हणजे पूर्वीच्या काळी आपल्या घरच्या मुलाबाळांइतकीच प्रिय असत सर्वांना. गाईचं दूध आणि बैलांच्या श्रमानं पिकणारी शेती यावरच सगळ्यांचं जीवन अवलंबून. या दिवशी गाईगुरं वाचली म्हणून त्यांचाही हा उत्सव मानू लागले काही लोक. गुरांच्या शिंगांना रंग आणि बेगड लावून अंगावर लाल रंगाचे ठिबके द्यायचे. त्यांची पूजा करायची आणि त्यांच्या गळ्याला एक पोळी आणि नारळाची कवड बांधून त्यांना द्यायचं सोडून मनसोक्त हुंदडायला. मग ती गुरं दिवसभर भटकून परत आली की गवळी आणि शेतकरी त्यांची आरती करून, दिवे ओवाळून त्यांना ओवाळणी घालतात. महाराष्ट्रात पुष्कळ ठिकाणी अजूनही ही पद्धत आहे.

फटाक्यांचा कडकडाट संध्याकाळभर चालू असतो. आकाशदिवे लुकलुकत असतात. चमनचिड्या, फुलबाज्या, डामरी फटाके, चक्र—कुणी किती उडवायचो यावरून भांडणं झालेली असतात आणि दारू जशी उडून जाते तशी भांडणंही संपलेली असतात. दिवसभर खेळून सगळी मुलं दमलेली असतात. डोळ्यांवर अगदी जबरदस्त झोप आलेली असते तरीही भाऊ बहिणीला बजावतोच—

'भाऊबीज वध उद्या सकाळी
तेल लाव मज न्हाऊ घाली–'

आणि बहीण 'हो' म्हणते कारण–

कारण भाऊबीज उकळायची असते ना!

दमली भागलेली मुलं गुडगुडुप झोपी जातात आणि नकळत पहाट होते. फटफटीत उजडायच्या आतच बहीण भावाच्या अंगावरचं पांघरूण ओढून त्याला उठवते. काल त्यानं बजावलेलं असतं, आज तिचाही हक्काचा दिवस असतो. तो गुलाबी थंडीत, साखर झोपेत असतो. उठायला कुरकुरतो. मग बहीण झटक्यानं म्हणते–

'नको उठूस. माझं काय ! पण आज भाऊबीज आहे. लौकर आंघोळ करून घेतली नाहीस तर आई फराळाला नाही देणार. आज आईनं ओल्या नारळाच्या करंज्या केल्या आहेत.'

ओल्या नारळाच्या मऊ, लुसलुशीत सारणाचा खमंग वास दरवळतच असतो. आता ती चवही ओठावर आल्यासारखी वाटते. बंधुराज पटकन् उठतात.

एक पाट, त्याच्याभोवती चौफेर रांगोळी घातली ताईनं. रांगोळीत कुंकवाची रेघ ओढली आईनं सांगितल्यावरून.

जवळ एक वाटी तेलाची. भाऊ पाटावर येऊन बसल्याबरोबर तिनं तेल लावायला सुरुवात केली. त्यानं अगदी पोटभर अंग रगडून घेतलं. तिनंही त्याचा वचपा काढायला कमी केलं नाही. जबरदस्तीनं त्याच्या कानात तेल घातलं आणि–

'अरे अरे माकडा, कान कर वाकडा' म्हणून चिडवून घेतलं.

स्नानगृहात एक वाटी दुधाची, एक सुगंधी उटण्याची. गरम वाफा काढणारं पाणी.

भावाची आंघोळ होते आणि बहीण त्याला फराळाचं आणून देते. आग्रहानं वाढते. कोणाकोणाकडे या आंघोळ फराळानंतर लगेच ओवाळतात. सकाळीच भाऊबीज होते.

पण सगळीकडं बहुतेक भाऊबीज संध्याकाळीच असते. लहानपणी एकाच घरात राहणारी बहीणभावंडं दिवसभर भांडतात, पण संध्याकाळी मात्र भाऊ पाटावर बसला की बहीण अगदी प्रेमानं त्याला ओवाळते. तबकात ओवाळणी पडली की तिचे डोळे हसायला लागतात. भाऊ मनाशी म्हणतो,

'आत्ता बाबांनी दिलेला रुपया घातला आहे मी. पण मोठेपणी माझ्या कमाईची ओवाळणी घालीन मी ताईला.'

लहानपण सरतं. ताई लग्न होऊन सासरी जाते आणि भाऊबीजेच्या दिवशी सकाळपासून भावाची वाट बघते. भाऊ येईल की नाही या शंकेनं ती अस्वस्थ होते. पण भाऊ दारात दिसला की तिला उत्साह येतो. मग मनात लहानपणी ठरवल्याप्रमाणं भाऊ बहिणीला आपल्या कमाईची काहीतरी छान ओवाळणी घालतो.

भावाला काहीच आणणं शक्य नसलं तरी त्यानं दिलेली साधी सुपारीची ओवाळणी देखील बहिणीला लाख मोलाची वाटते.

निरांजन तेवत असतं आणि चकचकीत तबकात त्या निरांजनाचा प्रकाश पडतो तसंच तेज चढतं या दिवशी भावाबहिणीच्या प्रेमाला.

एखादी बहीण बिचारी भाऊ नाही, कुणाला ओवाळू म्हणून काळजीत पडलेली असते. मग आकाशातला चंद्र खिडकीत डोकावून म्हणतो,

'अग, मी आहे ना ? तुझ्या मुलांचा मामा, चंदामामा. मीच तुझा भाऊ नाही का ? मला ओवाळ.'

बहीण त्या चंद्राच्या चांदण्यासारखी खुलते. अंगणात जाऊन चंद्राला ओवाळते.

चंद्र असं म्हणतो त्याला कारण आहे. आपल्या जुन्या कहाण्यात एक कहाणी आहे.

एक गरीब मुलगी, तिच्या सगळ्या जावा श्रीमंत. भाऊबीजेच्या दिवशी सगळ्या जावांचे भाऊ आले. त्यांनी खूप श्रीमंतीचा थाट उडवून दिला. एकेकीची ओवाळणी म्हणजे काय विचारता ?

ही बिचारी गरीब भावाची वाट पहात होती. तो आला तरी घालणार काय ? तिला काही नको होतं. फक्त भाऊ यायला हवा होता.

पण काय झालं कोण जाणे. भाऊ आलाच नाही. हिला सगळ्यांनी चिडवलं. टोचून खोचून बोलल्या. सासूनं तर दाराबाहेर ढकललं.

ही बिचारी अंगणात मुसमुसून रडत बसली होती. आकाशातल्या चंद्रानं ते बघितलं. तो हळूच खाली येऊन तिच्या कानाशी पुटपुटला,

'ताई, उठ. घरात जा. ओवाळायची तयारी कर. मी तुझा भाऊ येतो आहे.'

तिनं घरात जाऊन तयारी केली. सासू, जावा सगळ्या चिडवायला तयार होत्याच. पण आता ती कुणाचंच ऐकणार नव्हती.

दारातून एक सुंदर, भरजरी पोषाख केलेला माणूस आला. त्यानं हाक मारली, 'ताई' आवाज ऐकून तिनं ओळखलं. आपल्याला

मघाशी येतो म्हणून कानात सांगणारा भाऊ हाच. तिनं ओवाळलं. त्यानं नवरत्नांचा हार ओवळाणी म्हणून घातला. तो खाऊन-पिऊन निघून गेला.

हार पाहून सगळ्या चकित झाल्या. स्वर्गातलीच रत्नं ती. त्यांचं तेज पाहून त्यांचे डोळेच दिपले.

हिनं हार गळ्यात घातला. सहज खिडकीतून बाहेर लक्ष गेलं. चंद्र दिसला. तिनं मागं हळूच दिसणारा चेहरा ओळखला. भाऊ बनून आलेला हाच.

भाऊ नसलेल्या बहिणीचा चंद्र असा भाऊ झाला.'

'आई, पण आमच्या पुस्तकात या भाऊबीजेला यमद्वितीया म्हटलं आहे.'

'अग, ते बरोबर आहे. भाऊबीजेला यम आपल्या बहिणी-कडं यमीकडं गेला. तिथं जेवला-खाल्ला. त्याने यमीला कपडे, दागिने भेट म्हणून दिले. मग यमीनं त्याला ओवाळलं. तेव्हापासून तर बहीणभावाच्या प्रेमाची ही आठवण म्हणून भाऊबीज सुरू झाली.

रुक्मिणी आणि सत्यभामा. दोघी कृष्णाच्या बायका. रुक्मिणी शांत तर सत्यभामा रागीट. कृष्ण आपला एकटीचा असायला हवा हा तिचा हट्ट. कृष्णाला तिची गंमत करायची आली लहर. तो म्हणाला,

'चल, मला विकत घे. हा तराजू. तू आणि रुक्मिणी दोघींनी एकामागून एक आपल्याजवळ असेल नसेल ते एका पारड्यात टाकावं. मी दुसऱ्या पारड्यात बसतो. जिचं पारडं खाली जाईल तिच्या मी. कबूल ?'

सत्यभामेजवळ कित्तीतरी दागिने होते. खूप संपत्ती होती.

तिला वाटले, 'भाराभर सोनं घातलं की माझंच पारडं खाली जाईल.'

तिनं कबूल केलं. झालं. आता कृष्ण बसला एका पारड्यात आणि दुसऱ्या पारड्यात सत्यभामेनं दागिने, सोनंनाणं टाकायला सुरुवात केली. तिचं सगळं भांडार रिकामं झालं, अगदी शिगोशिग पारडं भरलं पण ते आपलं वर ते वरच.



मग आली रुक्मिणी. तिनं पारड्यात टाकलं फक्त एक तुळशीचं पान आणि काय आश्चर्य, कृष्णाचं पारडं एकदम वर गेलं. सत्यभामेला काही कळेना. शेवटी कृष्ण म्हणाला,

'अग, नुसतं सोनंनाणं देऊन एखाद्या माणसाला आपलंसं

करता येत नाही. एक तर त्या माणसावर खरं मनापासून प्रेम असावं लागतं आणि त्याचं आवडतं व्हायचं तर त्याची आवड ओळखावी लागते. त्याची खरी किंमत काय ते कळून घ्यावं लागतं. रुक्मिणीची एक तर माझ्यावर भक्ती आहे, खरं प्रेम आहे आणि दुसरं म्हणजे तुलसीदल, म्हणजेच तुळशीचं पान. तुळस मला किती प्रिय आहे हेही तिला ठाऊक आहे म्हणून एका तुळशीच्या पानानं जे पारडं जड झालं ते तुझ्या भारंभार सोन्यानं झालं नाही.'

'पण आई, कृष्णाला तुळस इतकी का आवडते?' प्रज्ञाने विचारले.

'हे बघ, त्याची गोष्ट अशी आहे, की एक जालंधर नावाचा राक्षस खूप शूर आणि बलवान होता. तो सर्वांना अजिंक्य होऊन बसला होता. त्याची बायको वृंदा अत्यंत पतिव्रता होती. तिचं पातिव्रत्य भंग पावलं तरच जालंधरावर देवांना विजय मिळवता आला असता.

तेव्हा देवांनी कपट रचलं. त्यांनी जालंधर मेला असं खोटंच वृंदेला सांगितलं. त्याच्यासारखं दिसणारं कुणाचं तरी धड आणि डोकं तिच्यापुढं माकडांकरवी नेऊन टाकलं. ती बिचारी फसली आणि शोक करू लागली. त्याबरोबर एका कपट वेषधारी साधूनं त्याला संजीवनी मंत्र टाकून उठवायचा प्रयत्न केला आणि वृंदे-पुढे उभा राहिला जालंधराचा वेष घेतलेला विष्णू. वृंदेला खूप आनंद झाला आणि तिनं विष्णूलाच जालंधर समजून मिठी मारली. तो जालंधर नव्हताच त्यामुळं वृंदेचं पातिव्रत्याचं सामर्थ्य नाहीसं झालं आणि जालंधर लढाईत मेला.

वृंदेला खरा प्रकार कळल्याबरोबर ती अतिशय रागावली

आणि तिनं विष्णूला शाप दिला की, 'तुला तुझ्या बायकोचा विरह सहन करावा लागेल आणि माकडांची मदत घ्यावी लागेल.' आणि तिनं चिता रचून अग्निप्रवेश केला.

'पुढं विष्णूनं रामाचा अवतार घेतला तेव्हा सीतेचा त्याला विरह सहन करावा लागला आणि वानरांची मदत घ्यावी लागली.'

'पण असं एखाद्या चांगल्या बाईला कपटानं फसवणं तुला योग्य वाटतं का आई?' प्रज्ञाला खरंच विष्णूचा राग आला होता वृंदेला फसवल्याबद्दल.



'अरे पोरांनो, तसं युद्धात काहीही चालतं म्हणतात. पण आपण या साध्वीचा कपटानं नाश केला म्हणून विष्णूलाही खूपच पश्चात्ताप झाला. इतकंच नाही तर तो वृंदेच्या राखेजवळ वेड्या-

सारखा बसून राहिला.

'मग त्याचं वेड घालवण्यासाठी पार्वतीनं स्मशानभूमीत वृंदेच्या रक्षेवर तुलसी, आवळा आणि मालती ही तीन झाडं उत्पन्न केली. त्यातली तुलसी हीच सर्वगुणसपन्न वृंदेप्रमाणं आहे असं विष्णूला वाटलं म्हणून ती त्याची आवडती झाली. विष्णूनंच पुढे कृष्णाचा अवतार घेतला म्हणून कृष्णालाही ती आवडायला लागली. कारण वृंदेनं रुक्मिणी बनून विष्णूचा अवतार कृष्ण नाच्याशी कार्तिकशुद्ध द्वादशीला लग्न केलं.'

'म्हणून तुळशीचं लग्न करतात का ग आई?'

'हो. बघ, तुमच्याशी बोलत बसले. कालच्या एकादशीचं पारणं फिटायचं आहे. शिवाय तुळशीच्या लग्नाची तयारी करायची आहे.'

'मी करू तयारी?'

'करतेस? कर.'

'काय काय करू?'

'अंगणात तुळशीवृंदावन आहे ना ते चांगलं मातीनं सारवून घे. त्यावर जरा वाळलं की रांगोळी काढ कावेच्या तुकड्यानं. तुळशी वृंदावनात ऊस पुरून आवळे आणि ओली चिंच टाक. वृंदावनाच्या भोवती ऊस रच चारी बाजूंनी.'

'कशाला?'

'अग, म्हणजे तो मांडव तयार होईल लग्नासाठी. मग कृष्णाची मूर्ती आहे ना ती चंदनाची देवघरात, ती घेऊन ये बाहेर. आपण दोघी मंगलाष्टकं म्हणू आणि लग्न लावू या.'

'म्हणजे अगदी खऱ्या लग्नासारखं!'

'हो. खऱ्याच लग्नासारखं लग्न करायचं हे. तुझ्या मैत्रिणीं-

नाही बोलाव आणि लाह्या, कुरमुरे, उसाच्या गंडेऱ्या वगैरे दे.'

'अय्या, म्हणजे स्वागतसमारंभ, रिसेप्शन!' प्रज्ञाला फारच मजा वाटली.

'हो. तसंच म्हण. अग, हे तुळशीचं लग्न लागलं ना की मगच खरी लग्नं करतात खूप लोक. तोपर्यंत चातुर्मासात लग्न-कार्य करायचं नाही अशी पद्धत आहे.'

'पण मग ताईचं लग्न—!'

'अग, मी पूर्वीच्या लोकांचं सांगितलं. आता आपण कोण-ताही चांगला दिवस बघून करतो लग्नकार्य.'

'पण आई तीन झाडांपैकी विष्णूनं तुळसच का निवडली!'

'कारण तुळस फार गुणकारी आहे. ती औषधी आहे. तुळ-शीचा रस, काढा थंडीतापावर उपयोगी आहे. घराच्या आसपासची जागा तुळशीच्या झाडामुळं निरोगी राहते म्हणतात. म्हणून तर प्रत्येक घराच्या अंगणात तुळशीवृंदावन असतं. अगदी मोठमोठ्या शहरात गॅलरीत एखाद्या कुंडीत किंवा कडीनं अडकवलेल्या डब्यात देखील तुळस लावलेली बघितली आहेस ना तू ? आणि वृंदेची आठवण म्हणून तिची पूजाही करतात बायका.'

'नुसती आठवण म्हणून पूजा करून काय होणार ?' प्रज्ञा म्हणाली.

'म्हणजे ?'

'म्हणजे आई, तू जसं सांगतेस ना की सगळ्यातून सार शोधावं तसं मी यातून एक सार शोधून काढलं आहे.'

'कसलं ? आता टोमॅटोऐवजी तुळशीचं सार प्यावं लागणार की काय आम्हाला ?' संदीप म्हणाला.

'दादासाहेब, चेष्टा करू नका म्हटलं. तुम्हीही ऐकून ठेवा.

मला वाटतं वृंदेचं पातिव्रत्य याचा अर्थ तिची पतीवर खूप भक्ती होती. ती त्याची खरी सहधर्मचारिणी होती. अर्थातच जालंधर प्रत्येक कार्यात तिचा सल्ला घेत असेल. ती त्याला संकटकाळी धीर देत असेल. त्यामुळं तो विजयी होत गेला. पुढं विष्णूनं कपट केल्यामुळं तिचा सल्ला, आधार त्याला मिळू शकला नाही त्यामुळे त्याचा नाश झाला. तेव्हा दादासाहेब पूर्वीच्या काळी बायका पुरुषांना सर्व बाबतीत मदत करीत, सल्ला देत आणि त्याचा पुरुषांना फार उपयोग होत असे 'तुला काय व्यवहार आणि राजकारण कळतंय ?' असं बायकांना न म्हणता त्यांचाही सल्ला घेत गेल्यास पुरुषवर्ग आपल्या कार्यात यशस्वी होऊ शकेल.'

संदीप चकित होऊन पहात, ऐकत राहिला. आई प्रज्ञाची पाठ थोपटीत म्हणाली, 'शाब्बास. खरंच तुळस ही बहात्तर रोगां-वर औषध आहे म्हणतात. म्हणजे तुळस ज्या वृंदेचं प्रतीक आहे अशा वृंदेसारख्या स्त्रिया बहात्तर संकटातून तारून नेतील असं समजूया आपण आणि हे बघ, संध्याकाळी तुम्ही दोघं विचारून या तुमच्या दोघांच्या मित्रमैत्रिणींना पुढच्या आठवड्यात आवळी-भोजनाला कोण येणार आहे ते.'

'आवळीभोजन ?'

'हो. अग ती एक सहलच म्हण. कार्तिक शुद्ध नवमीला धात्रीपूजन करायचं. जगद्धात्री, सर्व जगाला जिनं पावसाळ्याच्या चार महिन्यांच्या अशुद्ध हवेतून, मुसळधार पावसाच्या संकटातून तारलं त्या जगद्धात्रीचं पूजन. पण ते करायचं कसं ? आवळी-भोजन करून.

महाराष्ट्र, कर्नाटक, गोमंतक सगळीकडं अशी आवळी-भोजनाची पद्धत आहे. गावाबाहेर आवळीच्या झाडाखाली बसून

सर्वांनी जेवायचं. ती जागा आधी स्वच्छ करून घ्यायची. आसपासची घाण काढून टाकायची.

'सगळीकडं स्वच्छ सुंदर वातावरण असलं की कसं बरं वाटतं नाही का ? ही शहर किंवा गावसफाईची सुरवात.'

'म्हणजे ?'

'म्हणजे मघाशी सुरवातीला सांगितलं तसा घाणीच्या नरकाचा नाश करून आसमंत स्वच्छ करायचा.'

पावसाळ्यात पाऊस वाऱ्याचाही त्रास होतो, कमीजास्त खाणंपिणं होतं, ते सगळं सावरून येणाऱ्या उत्साही थंडीचं स्वागत करायला तयार व्हायचं. आवळीभोजनाचा आपला मुहूर्त. मग सर्वांनी मिळून सहली काढायच्या. कधी गावाबाहेर रानात, कधी समुद्रावर, कधी नदीकाठी चांदण्यात हिंडायचं ; आकाशातले तारे कोणकोणते,त्यांची नावं काय ते मोठ्या माणसांकडून समजावून घ्यायचं. नक्षत्रांकडं, आकाशातल्या ताऱ्यांकडं बघताना चंद्राकडं लक्ष गेलं की भावाबहिणीच्या दिव्य प्रेमाची आठवण होईल दररोज.

तुळशीवृंदावनाकडं बघितलं की आठवेल वृंदा आणि तिचं पतीच्या जीवनातील कर्तृत्व.

गोवर्धन पूजा निसर्गाच्या संकटांवर मात करण्याची डोंगराएवढी शक्ती देईल आपल्याला.

असा हा कार्तिक आकाशातल्या तेजस्वी चांदण्यासारखा चमकता. दुधासारखं शुभ्र चादणं पसरवणारा आणि तशाच पवित्र, शुद्ध विचारांनी आणि कार्यांनी आपलं जीवन आपण भरून टाकलं पाहिजे असं सांगणारा.

कार्तिक कर्तव्याचा– कर्तृत्वाचा.



# मार्गशीर्ष

दिवाळीची गडबड संपली. कामातून थोडी उसंत मिळाली आणि आईला मुलांची काळजी वाटू लागली.

'हळूहळू थंडी वाढत जाणार. ही मुलं म्हणजे काय ? त्यांना कशाचंच काही नाही. थंडी बाधली की निस्तरावं लागेल मलाच !'

काय खोटं होतं आईचं ? कार्तिकापासूनच हळूहळू थंडीचा मोसम सुरू होतो. सकाळची गुलाबी थंडी बोचऱ्या थंडीचं रूप घेऊ लागते. अंगावर गळ्यापर्यंत पांघरूण ओढून घ्यावंसं वाटू लागतं. पाणी कसं बर्फ न घालताच थंडगार होत असतं. सकाळी उठल्याबरोबर तोंडातून वाफा काढण्याचा खेळ सुरू होतो. शेती-भातीची कामे उरकलेली असतात. छोट्या छोट्या गावात सकाळसंध्याकाळ शेकोट्या पेटू लागतात. थंडीनं गारठलेले हात शेकायचे. एकीकडं गप्पाही रंगतात.

सकाळची शाळा असली म्हणजे तर विचारायलाच नको. नेहमीच्या गणवेशावर स्वेटर चढतो. बोचरे वारे वहात असतात. रस्त्यातून जाताना पाय गारठतात. मग ऊब आणण्यासाठी पळत पळत जावंसं वाटतं.

संध्याकाळी मैदानावर खेळायला किंवा लांब कुठे फिरायला जायचं जिवावर येतं. वाटतं त्यापेक्षा आई शेगडीवर भाकऱ्या शेकत असेल तर तिथंच उबेत बसावं जाऊन. कधी नव्हे ती आजीची अर्धी शाल पांघरून तिच्याजवळ बसून रामरक्षा घोकली जाते.

परवचा म्हटला जातो. आजीही खूष. आपलंही काम होतं.

थंडीचा कडाका असणाऱ्या दिल्लीसारख्या शहरात खोल्या-खोल्यातून हीटर लावले जातात खोलीत ऊब आणण्यासाठी.

पण तरीही थंडी हवीहवीशी वाटते. सकाळच्या कोवळ्या उन्हात गच्चीवर किंवा अंगणात बसायला किती मजा वाटते. भूकही खूप लागते. पोटभर खाल्लं की कशी मस्त शक्ती येते. उबदार कपड्यात आणि पांघरूणात झोपही कशी झकास लागते. उठल्याबरोबर ताजंतवानं वाटतं लगेच.

पण अंगात ऊब मात्र हवी हं! आणि त्यासाठी ऊबदार कपडे पण हवेत. मग कुठं नवे विणलेले स्वेटर अंगावर चढतात. कुठं जुने ठेवलेले लोकरीचे कपडे तपासले जातात. कसरीनं तर खाल्ले नाहीत ना? आईला सगळीच काळजी.

जुनी ट्रंक उपसली गेली आणि फटकन् एक जीर्णशीर्ण झालेली वही एका जुन्या कोटाच्या घडीतून टपकली.

'अय्या, मामांची गाण्याची वही.' आई बाकी सगळं विसरली. मामांनी कितीतरी गाणी शिकवलेली होती. दत्ताची, विठोबाची, कृष्णाची, देशभक्तीची. बघता बघता एक पान फडफडलं.

भारता तारि या कालि कालि
हरि वाजवे गीता मुरली–
तव मुरली मोहन गीत
निर्जिवा करी जिवंत
षंढासि समर पंडीत
रणधीर रिपुसि भयभीत
अबलांसी करी बलशाली–
हरि वाजवे गीता मुरली–

कृष्णाच्या मुरलीनं गाईगुरं, गोपगोपी भान हरपून ऐकत राहायच्या तो सूर. हे गाणं नवीन, आई इतकं छान म्हणते हे नवीन. प्रज्ञा अगदी रंगून गेली.

'आई, कुठलं ग हे गाणं ? मी कधीच ऐकलं नाही आणि तू म्हणतेस तरी किती छान !'

'तू केव्हा आलीस ?'

'केव्हाच ! तुझं गाणं ऐकत उभी होते. पण सांग ना आई हे गाणं–'

'अग, आता कुठं वेळ आहे ? तुमचे कपडे बघायचे आहेत. रफूबिफू करायचे असले तर–'

'मी लागीन तुला रफू करायला. आम्हाला शाळेत शिकवलंय कसं करायचं ते. पण हे गाण्याचं सांग ना !'

'अशी हट्टी आहेस. हे बघ हे गाणं आहे गीताजयंतीचं !'

'अय्या ! गीताजयंती ?'

'हो. माझ्या मामांची फार भक्ती होती गीतेवर. ते नेहमी गीताजयंती करायचे. आम्हाला अठरा अध्याय गीता त्यांनीच पाठ करायला शिकवली होती.'

'बापरे!'

'बापरे काय! अग, एक गीता पाठ येत असली की भेंड्या लावायला कधीच अडचण यायची नाही. परवा तुम्ही कोजागिरीला अडलातच भेंड्या लावताना. शिवाय उच्चार, वाणी कशी स्वच्छ होते.'

'ते जाऊ दे. पण गीताजयंती करायचे मामा आजोबा म्हणजे काय करायचे आणखी!'

'देवघरात, देवापुढे एक पाट मांडायचे, त्यावर गीतेचं

पुस्तक ठेवायचे. मग फूल वाहून तिची पूजा करायचे आणि त्या दिवसापासून एका तरी मुलाला गीता पाठ म्हणायला शिकवायची असा त्यांचा नियम होता.'

'पण गीता संस्कृतात आहे ना? मग हे गाणं तर मराठी होतं.'

'अग, हे गीतेतलं नाही. आपला देश पारतंत्र्यात होता. स्वातंत्र्यासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या चळवळी होत होत्या. पण



कधी कधी काय करावं कळायचं नाही. अशा वेळी कृष्णानं अर्जुनाला जशी गीता सांगितली, तशी भारताला तारण्यासाठी त्यानं गीता सांगावी असं म्हणत मामा. आम्हाला एका गीता-जयंतीलाच त्यांनी हे गाणं शिकवलं. गीतेमुळं काय काय घड

शकेल हे कसं छान सांगितलं आहे या गाण्यात.'

'हो. निर्जिवाला जिवंत करील तुझी मुरली. षंढाला समरपंडित बनवील म्हणजे भित्र्याला शूर बनवील. अगदी युद्धात कुशल असलेल्या शत्रूला देखील रणांगणावर भयभीत करील आणि अबलांना बलशाली बनवील.'

'हेच तर गीतेचं सार! अर्जुन लढला याचमुळे. मार्गशीर्ष शुक्ल एकादशी हा कृष्णानं सांगितलेल्या गीतेचा दिवस असं मानतात. म्हणून त्या दिवशी गीताजयंतीचे उत्सव खूप ठिकाणी करतात. देवळादेवळात गीतापठण, गीतेवर प्रवचनं करतात आणि गीतेचा अर्थ समजावून सांगतात.'

'आई, आजी रोज वाचीत असते ती गीताच का ग?'

'नाही. आजी वाचते ते गुरुचरित्र, म्हणजे दत्ताचं. दत्तजयंती हा मार्गशीर्ष महिन्यातला आणखी एक उत्सव. हा खूप ठिकाणी करतात. दत्ताची मूर्ती तू बघितलीच आहेस. ब्रह्मा, विष्णू, महेश या तिघा देवांची एकत्र त्रिमूर्ती ती दत्ताची मूर्ती. ब्रह्मा सृष्टी निर्माण करणारा, विष्णू तिचं रक्षण करणारा आणि महेश म्हणजे शंकर नाश करणारा. नाश झाला की पुन्हा निर्मिती, सृष्टी आलीच. मग संरक्षणही करायला हवं. असं हे चक्र असतं. त्याला म्हणतात उत्पत्ती, स्थिती आणि लय. विश्वाचं चक्र हे असंच चालतं. चैत्रात नवी पालवी फुटते, ती वर्षाची सुरुवात. मग सृष्टी नवं रूप धारण करते. तिचं फळाफुलांनी बहरलेलं रूप, त्याचं रक्षण केलं जातं. धनधान्य भरपूर येतं आणि मग शिशिर ऋतू आला की पुन्हा पडझड. पुन्हा सगळं गोठतं. नाश पावतं. पुन्हा चैत्र आला की नव्या जीवनाची सुरुवात. सृष्टीचं हे ऋतूचक्र आणि दत्ताची त्रिमूर्ती दोन्ही ह्या तीन अवस्थाच

सांगतात. तेव्हा सर्व सृष्टीचं, जगाचंच रूप असलेल्या या दत्ताची भक्ती लोक करायला लागले. मार्गशीर्ष महिन्याच्या पौर्णिमेला हा दत्तजयंतीचा उत्सव होतो. अत्रि ऋषींची बायको अनसूया हिचा मुलगा दत्त. त्याचा हा जन्मदिवस.'

'पण उत्सव म्हणजे काय करतात?'

'या पौर्णिमेपूर्वी एक आठवडा महाराष्ट्रात गुरुचरित्राचं पारायण करण्याची पद्धत आहे. यालाच म्हणतात गुरुचरित्र सप्ताह, भजन, कीर्तन देवळातून होतं. पण या दत्तजयंतीचं माहात्म्य महाराष्ट्राबाहेर फारसं नाही दत्ताची वस्ती औदुंबर वृक्षाखाली असते अशी समजूत आहे. म्हणून औदुंबराची देखील पूजा करतात. गाणगापूर, नरसोबाची वाडी, मिरजजवळचं औदुंबर हे खेडं, गोमंतकात साखळी गाव, म्हैसुरात चिकमगळूरजवळ चंद्रद्रोण किंवा बाबाबुडन पर्वतावरचं पिताचं देऊळ ही सगळी दत्ताची जागृत देवस्थानं मानतात त्यांचे भक्त.'

'खूप थाटात होतो का ग हा उत्सव?'

'नाही हं! हे उत्सव खूप साधेपणानं होतात. दत्त म्हटलं म्हणजे संन्यासी वृत्ती. दत्तभक्त त्यागी वृत्तीचे असतात. दत्त गावोगाव हिंडायचा, लोकांचं दुखलं खुपलं बघायचा, त्यांना मदत करायचा, माणसं, जनावरं सर्वांचं दुःख हरण करायचा. सगळ्यांना संकटातून सोडवायचा. तू दत्ताच्या तसबिरीत दत्ताजवळ चार कुत्रे आणि गाय बघितली आहेस ना ?'


'हो.'

'सगळ्या प्राणिमात्रांवर दया करा असं सांगतो दत्त. अहिंसा हे त्याचं मोठं तत्त्व आहे. बुद्धाच्या कालानंतर खोदलेल्या काही लेण्यात दत्ताच्या मूर्ती आहेत. दत्ताच्या तसबिरीतले चार कुत्रे

म्हणजे चार वेद आणि गाय म्हणजे कामधेनू.'

'कामधेनू म्हणजे?'

'म्हणजे इच्छा पूर्ण करणारी. अहिंसेनं वागा, कुणाला दुखवू नका. सर्वांवर प्रेम करा, चारी वेदांमध्ये असलेलं ज्ञान प्राप्त करून घ्या, म्हणजे इच्छा असेल ते मिळेल. कारण या सगळ्या गुणांमुळे आपल्याला हवं ते आपण नाही का मिळवू शकणार?'



इतरांना सुखी केलं की आपणही सुखी होतो. इतरांचं दुःख दूर केलं, त्यांना मदत केली की आपलंही दुःख नाहीसं करायला इतर लोक येतात. आपल्यालाही मदत करतात. आपण अहिंसेनं वागलो तर आपल्याला मारायला कोण येईल? पण दत्तामध्ये आहे रक्षणकर्ता विष्णू. म्हणजे अहिंसादेखील स्वतःचं आणि दुस-

ऱ्याचं रक्षण करणारी सामर्थ्यवान असायला हवी.

म्हणूनच दत्ताचे भक्त तीर्थाटन करतात. हिंडतात, भटकतात. साधूसंन्यासी बनतात. सर्वसंगपरित्याग करून समाजसेवेचं व्रत घेतात. दत्ताचा आदर्श असतो ना त्यांच्यापुढं?

असा हा मार्गशीर्ष. माणसानं माणूस म्हणून कसं जगावं ते सांगणारा. कृष्णानं या महिन्याला सर्वांत श्रेष्ठ म्हटलं आहे. कारण स्वतः जगण्याची आणि दुसऱ्याला प्रेमानं जगवण्याचीच शिकवण देतो हा. गीतेचं सामर्थ्य आणि दत्ताचं अहिंसापूर्ण प्रेम हे दोन गुण म्हणजे माणसाला मिळालेलं वरदानच. पण ते जन्मतःच नसतं हं! वरदान मिळवावं लागतं. असा माणसातलं माणूसपण जागं करणारा हा मार्गशीर्ष.

❋ ❋



# पौष

इंग्रजी जानेवारी आणि मराठी पौष जसे हातात हात घालून येतात. स्नेहाचं, मैत्रीचं प्रतीक सांगणारा हा महिना म्हणून असेल.

जानेवारी म्हटलं की लगेच डोळ्यांसमोर रंगीबेरंगी पतंग फडफडायला लागतात. संक्रात आणि पतंग यांचं असं एकदमच आगमन होतं.

'तुमची संक्रात १० तारखेची का हो ?'

'नाही, आमची १४ तारखेची.'

सण भारतीय आणि तो इंग्रजी तारखांनुसार ? संक्रात सणाचं असं आहे खरं. कारण संक्रात सूर्यावरून आपण धरतो. आपलं इतर पंचांग चंद्राप्रमाणे असतं. पण इंग्रजी पंचांग सूर्यावरून असतं म्हणून संक्रांत आणि इंग्रजी तारीख तेवढी जमून येतात. यातही तशी आपल्याकडे दोन पंचांग आहेत. टिळक पंचांग मानणारे संक्रात १० जानेवारीला करतात तर निर्णयसागर पंचाग मानणारे १४ जानेवारीला करतात.

'पण इतर सणांच्या तारखा बदलतात तशी ही तारीख कधीच बदलत नाही ?' प्रज्ञाने विचारले.

'बदलते, पण केव्हातरी. बारातेरा वर्षांनी आणि ती सुद्धा एखादा दिवस मागेपुढे होते एवढंच.'

'हे बरं हं--लक्षात ठेवायला सोपं. म्हणजे पतंग आणायला

बाजारात जाण्यासाठी न बघता येणारं पंचांग बघायला कुणाची मदत नको घ्यायला.'

'बाबा, तुम्ही उडवीत होतात का हो पतंग ?'

'हो. आम्ही लहानपणी खेड्यात राहात होतो, त्यामुळे खूप जागा मोकळी असायची. अरे, तुम्हाला माहीत आहे का, या पतंगाच्या काटाकटीच्या स्पर्धा लागायच्या राजे महाराजांच्या ?

'हो ?'

'तर ! आणि मांज्या तयार करण्याच्या तरी किती पद्धती. जितका मांज्या पक्का तितका पतंग काटला जाण्याची शक्यता कमी. यमुना नदीच्या किनाऱ्यावर एक राजा आणि दुसऱ्या तीरावर दुसरा, अशा या स्पर्धा चालत. एकदा एका राजाने मांज्यासाठी आपल्या खजिन्यातले हिरे कुटून लावले होते असं सांगतात.' बाबा म्हणाले

'काय मज्जा येत असेल नाही बघायला ? पण बाबा हल्ली पतंग उडवण्यात गंमतच नाही. आपण मारे उंच पतंग उडवायचा आणि खाली काठ्या आणि झाडाच्या फांद्या घेऊन पोरांनी मधल्यामधे कापून न्यायचा तो. स्पर्धेत काटाबा, पण असा का म्हणून ?'

'हं. सगळ्या चांगल्या गोष्टीत वाईट गोष्टी घुसवणारे समाजकंटक असतातच.'

'बाबा, यातलेच कापलेले चांगले धड पतंग ही मुलं म्हणे दुकानदाराला नेऊन विकतात. खरं का हो?'

'प्रज्ञा, ते खरंही असेल, खोटंही असेल. पण असे पतंग कापून घेणं ही चोरीच आहे एकप्रकारची. सर्वांनीच या गोष्टीला आळा घालायला हवा.'

'आम्ही अडवू अशा मुलांना. पण बाबा, संक्रांत, संक्रांत

आम्ही नुसतं ऐकतो. त्याचा अर्थ काय हो?'

'ऐकणार? की पतंग उडवणार?'

'ऐकणार सांगा.'

'संक्रांतीचा हा महिना म्हणजे पौष. पौष आला आणि गुलाबी थंडी गेली. कडाक्याच्या थंडीचा मोसमही संपला. आता सूर्याची कोवळी किरणं पसरू लागली. एका वर्षात सूर्य बारा राशींतून फिरतो. पौषात तो मकरराशीत प्रवेश करतो. मकर संक्रांत. तुम्ही वाचलं आहे. ऐकलं आहे. संक्रमणकाल हा शब्दही कानावर पडला असेल.

संक्रमण म्हणजे काय? क्रमून—क्रमण करून जाणं, ओलांडून जाणं. आता सूर्य दक्षिणायनाच्या फेऱ्यात दक्षिणेकडे बंदिस्त झाला. उत्तरायण सुरू झालं. पृथ्वीवर भूमध्य रेषेच्या उत्तरेकडील प्रदेशात २२ डिसेंबरला रात्र सर्वात मोठी असते. नंतर ती कमी कमी होऊन दिवस वाढतो. मग दिवस मोठा होत जातो. २१ जूनला तो सगळ्यात मोठा असतो. मग २१ मार्चला दिवस आणि रात्र सारखी असतात. नंतर दिवस कमी होऊन २३ सप्टेंबरला दिवस रात्र पुन्हा सारखी होतात. ऋतू बदलतो. सूर्य मकर राशीवर येतो. ती मकर संक्रांत. आता थंडी संपली, गुरगुटून झोपणं संपलं. रात्रीची झोपही आता कमी मिळणार. कारण आता रात्रच लहान होणार. सूर्य मकर राशीमध्ये गेला की दिवस होऊ लागतो मोठा आणि रात्र होते लहान. मोठा दिवस सांगतो जास्त वेळ कामाला मिळणार आहे. थंडीत भरपूर झोप झाली आहे. ताजं तवानं वाटतं आहे. कोवळ्या सूर्यकिरणांनी अंगात बेताची ऊब येते आहे. आता दिवसाचे वाढलेले सगळे तासही काम करायचं.'

'कसलं काम?' संदीपने विचारले.

'मकरसंक्रांतीला आपण काय मानतो महत्त्वाचं? तिळगूळ. तिळगूळ हे प्रतीक स्नेहाचं, गोडीचं. एवढासा तीळ पण त्याच्यावरूनही म्हण पडली आहे– एक तीळ सात जणांनी वाटून खावा.' बाबा सांगत होते.

'एक तीळ असंच का म्हटलं? तांदूळ का नाही म्हटलं?' संदीपने शंका विचारली.

'कारण फक्त छोटेपण एवढाच अर्थ नाही त्यात. तिळाचा गुण धरला आहे जमेला.

तिळाचे लाडू करताना आईला बघितलं आहेस का तू कधी? गुळाच्या कढत कढत पाकात तीळ घातलेले असतात. मोठ्या पातेल्यात आई मोठ्या उलथन्यानं किंवा झाऱ्यानं ढवळीत असते. ताई, काकू, मावशी सगळ्याजणी बसलेल्या असतात. हाताला थोडं पाणी किंवा तूप लावीत आई छोटे छोटे तिळाचे गोळे बाकीच्यांजवळ देते. त्या झेलीत झेलीत त्याचे लाडू वळतात. झेलण्याचा खेळ चालला आहे असं माहीत नसणाराला वाटेल. पण हातात लाडू सतत धरला तर गुळाचा पाक हाताला चिकटतो. चटका बसतो म्हणून तो अधूनमधून हातातून दूर करण्यासाठी झेलायचा. इतरांचे हातही तसे थोडेसे लाल होतात. पण गोळे काढून देणाऱ्या आईचे हात मात्र पाकाच्या चटक्याने लालबुंद होतात.

पण तरीही ती लाडू अगदी आनंदानं करते. कारण तिला ते वाटायचे असतात सगळ्यांना सांगायचं असतं मुलांना की हे लाडू आपल्या मित्रमैत्रिणींना द्या. गुळाचा पाक आणि तीळ कसे अगदी एकजीव झाले आहेत. तिळाचा स्निग्धपणा, तेलकटपणा म्हणजे स्नेहशीलता. स्नेह म्हणजे तेल—हाच स्नेह आहे तिळात.

त्यात मिसळली गुळाच्या पाकाची गोडी. मनात भावना स्नेहाची, बोलण्यात आणि वागण्यात गोडी गुळाची–अर्थात मैत्री पक्की. मुलांनी नीट शिकावं, चांगलं वागावं म्हणून कष्ट करणाऱ्या, खस्ता खाणाऱ्या आईला म्हणूनच तिळाचे लाडू करताना हाताला चटके बसले तरी सहन होतात. ती ते लाडू नातेवाइकांना वाटते, मुलांमुलीना सांगते–आपल्या मित्रमैत्रिणींना द्या आणि सांगा– 'तिळगूळ घ्या, गोड बोला.'

पण आपण फक्त संक्रांतीला हा मंत्र घोकतो आणि लगेच दुसऱ्या दिवशी विसरूनही जातो. तीळ धुतला, भाजला, कुटला तरी त्यातला स्निग्धपणा कमी होतो का? मग आपल्याला कितीही अडचणींना, संकटांना तोंड द्यावं लागलं तरी लगेच आपल्यातला स्नेह कमी का व्हावा? काय संदीप?'

संदीपला पटलं, त्यानं मान डोलवली आणि प्रज्ञाला पूर्वी ऐकलेला संवाद अचानक आता आठवत होता.

'काय विमलाबाई, यंदा काय लुटणार?'

'अहो मिळतंय् काय स्वस्त तर लुटायचं?'

प्रज्ञा पण बघायची. तिची मावशी देखील संक्रांतीच्या सणाला, हळदीकुंकवाच्या दिवशी काहीतरी वस्तू लुटायची. पण हे कसलं लुटणं? आपल्याला हवी ती एखादी एवढीशी वस्तू मोजून द्यायची कुणालातरी आणि म्हणायचं, 'लुटणं!'

'आई, हे काय ग असतं तुमचं दरवर्षी?'

'कशाबद्दल म्हणते आहेस?'

'अग, हे तुमचं लुटणं ग संक्रांतीला? गेल्या वर्षी तर मला इतका राग आला सुमतीकाकूचा!'

'कशाबद्दल?'

'तू दरवर्षी संक्रांतीला फक्त हळदीकुंकू देतेस ना बायकांना. तर गेल्या वर्षी सुमतीकाकू म्हणत होती—एवढा पगार आहे भावोजींना तरी आपल्या दरवर्षी फक्त हळदीकुंकू लुटतात. मी बाई यंदा प्लास्टिकचे डबे आणले आहेत.'

आई फक्त हसली. पण प्रज्ञाचा राग काही अजून गेला नव्हता.

'हसतेस काय आई नुसती? तू हे का लुटतेस ते सांग आणि काकूसारखं दुसरं काही का देत नाहीस बायकांना, ते पण सांग.'

'हो हो. रागवू नकोस प्रज्ञा. हे बघ मी दरवर्षी फक्त हळदीकुंकू देते त्याला कारण आहे.'

'काय?'

'एक लोककथा आहे.'

'सांग ना आई. लोककथा मला फार आवडतात. काय छान छान तत्त्वं असतात त्यात सांगितलेली?'

'ही पण तशीच आहे. ऐक हं.

एका राजाची एक राणी होती. लोककथांतल्या सारखीच. त्या राज्यात एक गरीब पुजारीण पण होती. संक्रांतीचं हळदीकुंकू फार थाटात व्हायचं. राणी राज्यातल्या सगळ्या सुवासिनींना हळदीकुंकवाला बोलवायची. दरवर्षी काहीतरी ठसठशीत वस्तू लुटायची.

शेजारच्या गावातल्या राणीचाही हाच नेम होता. दोघीं-च्यात जणू चढाओढ चाले. एकमेकींवर कुरघोडी करण्याच्या नादानं दरवर्षी वस्तू चढ्या किंमतीची होत गेली.

आणि एका वर्षी तर राजाच्या खाजगी खजिन्यात काहीही राहिलं नाही. मग राणीने आपले दागदागिने दिले. तेही संपले.

मग त्यानंतर तिने राजाचे मोत्याचे कंठे, भिकबाळी या वस्तू दिल्या. असं करीत करीत चार वर्षं गेली आणि पाचव्या वर्षी तर फक्त राजाची अंगठी म्हणजे राजमुद्रा आणि राजमुकुट तेवढाच राजाजवळ उरला. या वस्तू जरी राजा वापरीत असला तरी त्या राज्याच्या मालकीच्या. त्यांचा राणीला काहीच उपयोग नाही. राणी अगदी काळजीत पडली. जर लुटायला काहीच नाही तर राज्यातल्या सुवासिनींना हळदीकुंकवाला तरी कसं बोलवायचं ?

करता करता संक्रांतीच्या हळदीकुंकवाचा सबंध महिना संपत आला. अजूनही राणीजवळ काही नव्हतं. तिला फारच वाईट वाटलं. आता शेजारच्या राणीपुढं मान खाली घालावी लागणार म्हणून दु:खीकष्टी झाली.

आता दोनच दिवस उरले आणि त्या दोन दिवसातल्या आधीच्या दिवशी राणी अशीच काळजी करीत आपल्या राजवाड्याच्या सौधावर. '

'सौधावर म्हणजे काय ग आई ?'

'सौधावर म्हणजे गच्चीवर. हं ! तर राणी अशी सौधावर बसली होती आणि तिला एक विलक्षण दृश्य दिसलं.'

'कसलं ?'


'नवी कोरी लुगडी नेसून, दागदागिने घालून कितीतरी बायका रस्त्यानं जात होत्या. कुठं जात असतील या ? असा राणीला प्रश्न पडला आणि तिला भीतीही वाटली. तिला वाटलं—

यंदा आपण हळदीकुंकू केलं नाही म्हणून आपल्या शेजारच्या राणीकडे तर सगळ्या चालल्या नाहीत हळदीकुंकवाला ? तसं असेल तर आपल्याला ते किती कमीपणाचं ! आपल्या फजितीला पारावार राहणार नाही.

तिनं आपल्या दासीला घाईघाईनं बोलावलं.

'हे बघ, त्या सगळ्या बायका कुठं निघाल्या आहेत ते विचारून ये लौकर.'

दासी त्यांना विचारायला धावली. एकदोघींना थांबवून तिनं चौकशी केली. ती धावत धावत पुन्हा सौधावर आली.



'राणी सरकार, राणी सरकार...'

'अग, काय झालं? कुठं निघाल्या आहेत त्या बायका? काय म्हणाल्या? शेजारच्या राणीकडं नाही ना?'

राणीनं भराभर प्रश्नावर प्रश्न विचारले. तिला फार उत्सुकता लागली होती.

'नाही राणी सरकार. शेजारी नाही. त्या सगळ्या गावातल्या पुजारीण बाईकडे चालल्या आहेत हळदीकुंकवाला!'

'पुजारीणबाईकडं? म्हणजे? यंदा मी बोलावलं नाही म्हणून माझ्या नाकावर टिच्चून तिनं बोलावलं काय?'

राणी खूपच रागावली.

'नाही, राणीसरकार! पुजारीणबाईकडं सगळ्या दरवर्षी जातात.'

'अस्सं! काय लुटते ती एवढं?'

'काही नाही. हळदीकुंकू.'

'काय? हळदीकुंकू ही काय लुटायची वस्तू झाली? बाकी ती काय देणार म्हणा! तरी या सगळ्या नुसत्या हळदीकुंकवा-साठी जातात?'

'क्षमा करा राणीसरकार, पण तिच्याकडं काही नाही तेवढ्याचसाठी काही ती फक्त हळदीकुंकू देत नाही. ती म्हणते हे सौभाग्यदान आहे आणि लुटलेली वस्तू दुप्पट होते. म्हणून ती ते देते आणि सगळ्या बायका दरवर्षी घेतात.'

'काय पण सांगतेय्! म्हणे लुटलेली वस्तू दुप्पट होते. मी इतकी वर्षं इतक्या वस्तू लुटल्या. दुप्पट होणं बाजूलाच, पण वस्तू संपत मात्र गेल्या. यंदा तर काही म्हणजे काही राह्यलं नाही.'

'पण राणीसरकार...' दासी घुटमळली.

'काय ग?'

'नाही, पुजारीण म्हणते–फक्त हळदीकुंकू लुटलं तरच ते–'

'या इतक्या सगळ्यांना ती दरवर्षी निमंत्रण देते?'

'नाही राणीसरकार. सगळ्याजणी आपणहून जातात. हळदीकुंकवाला बोलावणं लागत नाही म्हणे!'

राणी चमकली. आपलं काहीतरी चुकतंय असं तिला वाटलं.

ती दासीला म्हणाली,

'म्हंजे, मी देखील निमंत्रणाशिवाय जायला हरकत नाही!'

'पण, राणीसरकार आपण..' दासीला काय बोलावं सुचेना.

'हे बघ, माझी जाण्याची तयारी करायला सांग आमात्यांना.'

आणि राणी आपल्या राजेशाही गाडीतून पुजारणीकडं निघाली. सगळ्याभर नुसतं कुतूहल भरून राहिलं होतं. सगळ्या बायका चकित झाल्या होत्या आणि आता पुजारीणबाईची किती त्रेधा उडेल याची त्यांना काळजी वाटत होती.

राणी गाडीतून उतरली. सगळ्या बायका तिच्या मागोमाग जात होत्या पुजारीणबाईचं घर एवढंसं. राणी तिथं गेली, चारीकडं बघत उभी राहिली.

पुजारीण गोंधळली नाही. गडबडली नाही. तिनं एक चटई पटकन् अंथरली. नमस्कार करून हसून ती म्हणाली,

'वसा ना, राणीसरकार!'

राणी बसली. तिनं बघितलं आधी आलेल्या काही बायकांना पुजारणीनं शांतपणं हळदीकुंकू दिलं. वडाच्या पानांचा ढीग रचलेला होता. शेजारीच दोन मोठे खापराचे वाडगे होते. एकात हळद, एकात कुंकू. प्रत्येक बाईला पुजारीण हळदीकुंकू लावून, गुळाचा खडा हातावर देई. मग ती बाई दोन पानं उचली वडाची. चमच्यानं एका पानावर हळद, एकावर कुंकू काढून पुडी करून हातात घेई आणि पुजारणीला म्हणे–

'तुझं माझं अहेवलेणं
वडासारखं त्याचं वाढणं!'

आणि पुडी घेऊन निघून जाई. राणी थक्क होऊन बघत होती.

आता पुजारीण राणीजवळ आली. तिनं राणीला हळदी-

कुंकू लावलं, तिच्या हातावर गुळाचा खडा ठेवला आणि म्हटलं, 'या ना राणीसरकार. लुटा अहेवलेणं !'

राणी पटकन् उठली. इतका वेळ तिनं सगळं बघितलं होतं. तिनं वडाची दोन पानं घेतली. दोन पुड्या केल्या आणि पुजारणी-जवळ जाऊन म्हणाली,

'तुझं माझं अहेवलेणं
वडासारखं त्याचं वाढणं !'

आणि इतर बायकांसारखी निघून न जाता तिनं पुजारणीला मिठी मारली. तिच्या डोळ्यातून पाणी ओघळत होतं. पुजारीण समंजस होती. राणीपेक्षा वयानंही मोठी होती. तिनं राणीच्या पाठीवरून हात फिरवला मायेनं. सगळ्या बायका चकित होऊन पहात होत्या. राणी कावरीबावरी झाली. तिला असा कधी अनुभव आला नव्हता. आता ती राणी नव्हती, पुजारीण पुजारीण नव्हती. दोघींच्यात प्रेमाचं एक नातं निर्माण झालं होतं.

राणी जरा शांत झाल्यावर म्हणाली, 'पुजारीणबाई, आज मला हळदीकुंकवाचा खरा अर्थ कळला. कुंकवाच्या धन्याला छळून लुटलेल्या वस्तूंनी सौभाग्य कसं वाढणार ? उलट काळजीनं महाराजांना पोखरून काढलंय. तुम्ही मला छान धडा दिलात !'

'राणीसरकार, मी काय धडा देणार ? पण माझ्या मनाला पटलं ते मी करीत आले. माझ्या आईनंही हेच केलं होतं. देवापुढं जमणारा पैसा पुजाऱ्यांचा पण त्या देवाच्या पैशाचा आम्ही घरासाठी नाही उपयोग करीत.सरकारातून आम्हाला देवळाच्या राखणीसाठी, पूजेअर्चेसाठी मिळणारी बिदागी पोटापाण्याला भरपूर होते. मी त्या देवाच्या पैशातूनच हळदीकुंकू आणते. हा देवाचा, अहेवलेण्याचा प्रसाद म्हणून मी सगळ्यांना वाटते. माझी श्रद्धा आहे भोळी-

भाबडी. देवाच्या प्रसादाचं हे अहेवपण लुटलं की वाढतं. दुप्पट होतं. राणीसरकार, आपण देखील...'

'नको, नको बोलू पुढे. ताई, हो...मोठ्या बहिणीप्रमाणं डोळ्यात अंजन घालून धाकट्या बहिणीला ताळ्यावर आणलंस. आता याच्यापुढं आपल्या राज्यात फक्त पुजारीणताईकडेच हळदीकुंकू होईल दरवर्षी संक्रांतीचं. आपण सगळ्या अहेवाचा सौभाग्याचा देवाचा प्रसाद नेत जाऊया लुटून!'

आणि राणीचा कंठ दाटून आला. आता इथं जास्त थांबलं तर रडू कोसळेल या भीतीनं ती पटकन् निघून बाहेर गेली आणि राजवाड्याकडं गाडी चालू लागली.'

'आई, आई, काकूला लुटू दे काहीही. तू हळदीकुंकूच लूट फक्त.' गोष्ट ऐकून प्रज्ञा म्हणाली. लोककथेतल्या त्या सगळ्या कल्पनेनं ती भारावून गेली होती. प्रज्ञाची आई समाधानानं हसली.

अशी ही संक्रांतीच्या हळदीकुंकवाची कथा, मुलींच्या मनात पटकन् ठसणारी.

पण संक्रांतसणाचा हळदीकुंकू हा एक भाग झाला. कारण हा सण काही फक्त स्त्रियांचा नाही. या सणाचा मुख्य हेतू प्रेम वाढवणं हा आहे आणि परस्पर स्नेह, प्रेम वाढवणं हे अमुकच माणसाचं काम असं म्हणता येईल का? ते तर प्रत्येकाचंच काम आहे. स्त्री, पुरुष, लहान-मोठे, गरीब-श्रीमंत असा या प्रेमवर्धनाच्या कामात भेदभावच नसतो.

हा जसा भेद नाही तसंच याला प्रांताप्रांताचंही बंधन नाही. महाराष्ट्रातही हा आहे, बंगालातही आहे आणि दक्षिण भारतातही आहे. सगळा देश व्यापून राहिला आहे हा सण. फक्त पद्धतीत थोडा फार फरक इतकंच.

बंगालमध्ये संक्रांतीला तिलदान करतात. गुळाच्या किंवा खजुराच्या काकवीत तीळ घालून ते वाटण्याची देखील तिथं चाल आहे. त्या मेव्याला नाव आहे 'तिळूंआ.' या सारखाच आणखी एक पदार्थ 'पिष्टक.''

'पिष्टक! तो कसला?'

'तांदुळाच्या पिठात साखर आणि तूप मिसळून हा पदार्थ तयार करतात. नातेवाईक जमून हा एकत्र बसून खातात. गरीब लोकांना वाटतातही कुणी कुणी. या दोन पदार्थांच्या नावावरून तिळूंआ संक्रांत आणि पिष्टक संक्रांत असं देखील म्हणतात बंगाल्यात या सणाला. बाहेरगावी राहणारी नातेवाईक, मित्र-मंडळी असली ना तर त्यांना हे 'पिष्टक' रेशमी किंवा साध्या कापडात गुंडाळून पाठवतात.'

'म्हणजे आपण तिळाचे लाडू नाही तर वड्या पाठवतो तसंच ना?'

'हो आणि संक्रांतीला गंगेत स्नान करणं पुण्यकारक मानतात त्यामुळं प्रयागला आणि गंगासागरावर लाखो लोक जातात स्नान करण्यासाठी.'

'आई, अग आमच्या वर्गात ती सरस्वती आहे ना ती म्हणत होती की त्यांच्याकडे अगदी आपल्याकडच्या सारखाच संक्रांतीचा सण असतो. अगदी तस्साच. काय बरं त्याचं नाव म्हणाली ती?'

बाबा घरात येत म्हणाले, 'पोंगल' म्हणाली असेल. ती सरस्वती द्रविड आहे ना? दक्षिण भारतातली!'

'हो. खरंच–'पोंगल.' पण, बाबा पोंगल म्हणजे काय हो?'

'अरे संदीप, 'पोंगू' हा शब्द आहे तामीळ भाषेतला.

त्याचा अर्थ शिजवणं असा आहे. या शब्दावरून 'पोंगल' हे सणाला नाव पडलं. शिजवलेला भात किंवा खीर असाही अर्थ आहे याचा. तेव्हा पोंगल हा एक प्रकारचा 'पाकोत्सव' असं देखील म्हणायला हरकत नाही. बरं का, संदीप—द्रविड लोकांमध्ये 'खीर शिजली का?' असं या दिवशी विचारण्याची पद्धत आहे.'

'असं होय? छान आहे मजेशीर नाव!'

'शिवाय प्रज्ञा, संक्रांतीच्या तिसऱ्या दिवशी एक 'मट्टपोंगल' नावाचा सण असतो.'

'म्हंजे सगळं 'मट्ट' करायचं ना?'

'संदीपराव, आपल्या खादाडीचा योग्य अर्थ लावलात. पण हा सण तसा नाही. हा आहे गाईचा पोंगल. त्यावेळी गुरंढोरं, घोडे, सगळ्या पशूंची पूजा करतात, त्यांना गावातून वाजत गाजत मिरवीत नेतात, मदुरा आणि तिन्नेवेल्ली इथे हा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर होतो.'

'म्हंजे आपल्या पोळ्यासारखंच.'

'हो. गाईगुरांनासुद्धा स्नेह देणारा, तसं सांगणारा हा सण. तिळाची स्निग्धता कधीही न कमी होणारी, कधीही शुष्क न होणारी, सदा ओलावा टिकवणारी.'

'हो ना. म्हणूनच तर प्रज्ञा—संदीप, आजीनं तुम्हाला शिकवलेल्या श्लोकात तिळाच्या तेलाला महत्त्व आहे. आठवला का श्लोक?'

'हो. मी सांगते—

तिळाचं तेल, कापसाची वात
दिवा तेवो मध्यान्हरात.'

'बरोबर सांगितलंस, प्रज्ञा! कापसाच्या वातीला तिळाचं

तेल दिलं की ती विझत नाही. मध्यरात्रीपर्यंत तेवत राहते. हीच स्निग्धता, हाच ओलावा आपल्या स्वभावात आणायचा आणि प्रेमाचा दीप उजळत ठेवायचा. या सगळ्याचा जणू भावार्थ काढून संक्रांतीला एकमेकांना शुभेच्छा द्यायच्या.'

'आई, यंदा मी झक्क संक्रांत भेटकार्ड रंगवून, चित्र काढून बनवली आहेत. देणार आहे सगळ्यांना.'

'मी देखील हलव्याच्या पिशव्या शिवून तयार केल्या आहेत वेगवेगळ्या आकाराच्या. आईनं मला खूप रंगीबेरंगी तुकडे दिले होते कापडाचे.'

'आणि मी हलव्याचे डबे केलेत छोटे छोटे कागदाचे.' मधेच छोटी विनया पण म्हणाली.

'छान! हस्तव्यवसायाची सुंदर कला आणि शुभेच्छा देऊन म्हणायचं गोड बोला.'

'वा: बाबा नुसतं नाही काही.'

'मग?'

'तिळगूळ घ्या, गोड बोला!'

❋ ❋



# माघ

'आई, अग–आज मी इतकं मस्त सरबत पिऊन आले.' प्रज्ञा सांगत होती.

'कसलं सरबत? आणि कुणाकडं गेली होतीस?'

'अग, आमच्या वर्गातली ती कल्याणी वरदराजन् आहे ना, तिच्याकडे. काय बरं नाव त्या सरबताचं...' प्रज्ञा आठवू लागली.

'मी सांगतो. पानक!' बाबा म्हणाले.

'अय्या बाबा, तुम्हाला कसं माहीत?'

'तू कुणाकडं गेली होतीस ते सांगितलंस तेव्हा मी ओळखलं की ती कल्याणी कर्नाटकातली. आज तिच्याकडं वसंतपंचमीचा उत्सव असणार आणि मागे मी ऑफिसच्या कामासाठी कर्नाटकात राह्यलो होतो ना, तेव्हा त्या उत्सवात हे पानक प्यायलो आहे.'

'बाबा, आम्ही थापा दिल्या म्हणजे रागावता आणि आता–' संदीप जरा अडखळतच पण धीर करून म्हणाला.

बाबांना गंमत वाटून ते म्हणाले, 'आता मी थापा देतोय असं म्हणायचं आहे का तुला? हे बघ मी हे पानक प्यायलो आहे. या थापा नाहीत.'

'त्याचं नाही म्हणत मी बाबा. ते सरबत तुम्ही प्यायला असाल आणि वसंतपंचमीचा उत्सवही असेल त्यावेळी. पण आत्ता वसंतऋतू नसताना तुम्ही प्रज्ञाला म्हणालात की कल्याणीकडे वसंतपंचमीचा उत्सव असेल.'

बाबा हसत हसत म्हणाले, 'आता समजलं आणि मी थापा देतो असं तुला का वाटलं तेही कळलं. सध्या वसंतऋतू नाही आणि वसंतपंचमी कशी, असं तुला वाटलं असणार!'

'हो ना. म्हणून तर मी म्हटलं–'

'हे बघ संदीप, वसंतऋतू चैत्राच्या महिन्यात येतो हे कबूल पण जसं राजाची स्वारी यायची असली की आधी भालदार, चोपदार 'हुश्यार रहे, हुश्यार– महाराजाधिराज आ रहे है–' अशी ललकारी देत येतात...'

'किंवा, बाबा– एखाद्या प्रमुख नेत्याच्या आगमनाची वर्दी देत पायलट कार येते असं म्हणूया का–'

'म्हणा. अरे बाबा मला आमच्या काळातलं आठवलं, आता तसे राजेमहाराजेही नाहीत आणि ललकाऱ्याही नाहीत. आता पायलट कारच तुम्हाला दिसणार. पण दोन्हीपैकी काहीही म्हटलं तरी आगाऊ सूचना देणं हाच अर्थ होतो की नाही?'

'होय, बाबा.' प्रज्ञा म्हणाली.

'हं–तर वसंतोत्सवाची अशी आगाऊ सूचना वसंतपंचमी देते आणि ती येते माघ महिन्यात. माघ महिन्यात उत्तरायणाबरोबर वसंतकाल सुरू होतो. तेव्हा माघ शुक्ल पंचमीपासून वसंतोत्सवाची सुरुवात होते असं म्हणायला हरकत नाही.'

'पण, बाबा– आपण महाराष्ट्रात कुठं हा उत्सव करतो?' प्रज्ञाने विचारले.

'नाही, आपण नाही विशेष करीत. पण कर्नाटकात मघाशी सांगितलं तसा पानक देऊन देवीच्या देवळात हा उत्सव करतात. गोमांतकात शांतादुर्गेचा मोठा उत्सव होतो वसंतपंचमीला. आपल्याकडे आपण पाटीपूजन किंवा सरस्वतीपूजन केव्हा करतो?'

'दसऱ्याला.'

'पण— बरं का, प्रज्ञा संदीप! बंगालमधे सरस्वतीपूजनाचा दिवस हा वसंतपंचमीचा मानतात. शाई, दौत, लेखण्या, पुस्तकं यांच्यासह सरस्वतीची पूजा करतात आणि या तिथीला श्रीपंचमी असं म्हणतात आणि मुलांना शाळेत घालण्याचा हा दिवस समजून त्यादिवशी पाटीपूजा करतात. एक गंमत माहीत आहे का?'

'काय?'

'त्या दिवशी लेखन बंद ठेवतात. शाई, दौत, लेखणी यांची पूजा केलेली असते ना, म्हणून त्यांच्याकडून त्या दिवशी काम करून घ्यायचं नाही.'

'पण मग काही लिहायची वेळ आली तर?'

'तीच तर गंमत म्हटली मी. अगदी तितकंच निकडीचं, घाईचं काम निघालं लिहिण्याचं तर खडूने किंवा कोळशाने फळीवर लिहितात. या श्रीपंचमीच्या दिवशी संध्याकाळी मुलं वेगवेगळे खेळ खेळतात आणि त्या दिवशी दुसऱ्याच्या बागेतली फळफळावळ लुटायचा आपल्याला पूर्ण अधिकार आहे असं मानतात.'

'मग त्या दिवशी आपण जाणार बुवा तिकडं!' संदीपही मजेने म्हणाला.

'शिवाय आपल्याकडं जसं आपण गणपतिविसर्जन करतो तसंच पूजेच्या दुसऱ्या दिवशी शारदादेवीची मूर्ती मोठ्या थाटामाटानं जवळच्या जलाशयाकडं नेतात आणि तिथं तिचं विसर्जन करतात. फक्त आपल्या भारतातच नाही, तर पूर्वीच्या काळी रोम वगैरे देशातही वसंतपंचमीचा उत्सव करीत असत.'

'कशावरून?'

'रोमन पंचांगात हा वसंतारंभाचा दिवस आहे असं दाखवलेलं आहे. वसंत म्हणजे आनंदाचं, उत्साहाचं प्रतीक. तेव्हा वसंत-कालाच्या आरंभापासूनच आपल्यातही उत्साह संचरायला हवाच.'

'बाबा, पण उत्साह संचारल्यावर करायचं काय?'

'सूर्योपासना.'

'म्हणजे?'

'हे बघ, संदीप– ऋग्वेदात एक ऋचा आहे. ती आहे सूर्यस्तवनाची.'

'सांगा, बाबा– कोणती ऋचा?'

'तत्सवितुर्वरण्यं भर्गो देवस्य धीमहिः ।
धियो यो नः प्रचोदयात् ॥'

'पण बाबा– हा तर...' संदीप बोलता बोलता थांबला.

'समजलं, संदीप–तुला काय म्हणायचं आहे ते. ही ऋचा म्हणजेच तुला मुंजीत शिकवलेला गायत्रीमंत्र. मुंज म्हणजे उपनयन. दुसरे नेत्र–म्हणजे दुसरी दृष्टी प्राप्त होणं आणि उपनयन म्हणजे जवळ जाणं आदर्शाच्या, ध्येयसिद्धीच्या. या दोन्ही अर्थांनी बघितलं तर ज्ञानाची दुसरी दृष्टी शिक्षणाच्या साहाय्याने मुलांनी मिळवायची आणि सर्वांग परिपूर्ण होण्याचं ध्येय प्राप्त करायचं.'

'हो, पण मग त्यासाठी हा मंत्र कशाला पाठ करायचा?'

'अरे, दोन तास अभ्यास करताना तीन वेळा तुला ताप आला तर चालेल का? शिवाय या ऋचेचा अर्थ जर लक्षात घेतलास तर तुला समजेल नीट. ऐक हं अर्थ–

अखिल चराचराला प्रेरणा देणारा जो भगवान् त्याचे सर्वांना प्रिय असे जे एक सर्वश्रेष्ठ अवर्णनीय उज्वल तेज आहे,

त्याचे आम्ही ध्यान करतो. तोच भगवान् (सूर्य) आमच्या बुद्धीला आणि ध्यानभक्तीला उत्तम प्रेरणा देवो.'

'खरंच बाबा, किती छान प्रार्थना आहे. मला कधी नीट कळलीच नव्हती. आता मी रोज अभ्यासाला बसताना ही म्हणत जाईन.'

'वा: उत्तम! पण सूर्योपासनेला सुरुवात झाली ती काही इतर उद्देशानं देखील.'

'ती कशी?'

'सूर्य हा एक मोठा तेजोगोल आणि त्याच्याभोवती पृथ्वी-सारखेच इतर गोल फिरत असतात हे माहीत आहे ना तुम्हाला?'

'होय बाबा, आमच्या शास्त्राच्या पुस्तकात दिलेलं आहे. आमच्या बाईंनी खगोलशास्त्र शिकवताना सुरवातीलाच हे सांगितलं होतं.' प्रज्ञा म्हणाली.

'हे शास्त्राचा अभ्यास करणारांनी जाणलं. पण सर्वसामान्य माणसांना यापेक्षा वेगळं काहीतरी जाणवलं. मानवी सुखाला मदत करणाऱ्या कितीतरी गोष्टी सूर्याकडूनच घडून येतात, नाही का?'

'हो ना. समुद्राच्या पाण्याची वाफ होते सूर्याच्या उन्हानंच. म्हणूनच ढग निर्माण होऊन पाऊस पडतो. पावसाच्या पाण्यानं जमीन भिजली आणि पिकं उगवली तरी जमीन आधी सूर्याच्या उन्हानं तापते, म्हणूनच बी अंकुरतं.' प्रज्ञा मोठ्या उत्साहाने सांगत होती.

'खरंच की, शिवाय फुलं फुलतात ती सूर्याच्या उन्हामुळंच. सारखी रात्रच असती आणि सूर्य उगवून दिवसच झाला नसता तर काय हाल झाले असते. आपलं सगळं आयुष्यच बदलून गेलं

असतं.’ आता संदीपलाही हुरूप आला.

‘सहा महिने रात्र आणि सहा महिने दिवस असणाऱ्या विषुववृत्तावरच्या प्रदेशाचं आपण वाचतोच की.’ प्रज्ञा म्हणाली.

‘प्रज्ञा, मी वाचलंय एका पुस्तकात की जिथं अगदी रक्त गोठवणारी थंडी असते त्या देशातले लोक सूर्याचे दोनचार किरण मधूनच पडले तरी ती फार मोठी पर्वणी मानतात.’ संदीपने माहिती दिली.

‘तर–बरं का मुलांनो! तुमच्या लक्षात आलीच आहे ही सूर्याची करामत. सर्वसामान्य माणसालाही याची जाणीव झाली आणि आपल्याला सर्व तऱ्हेनं जीवन देणाऱ्या या सूर्याला ते देव मानू लागले. त्याची पूजा करू लागले. ही सूर्योपासना भारत, इराण, मध्यआशिया, रोम, ग्रीस सर्व देशात जाऊन पोचली होती. आपल्या पुराणात ज्या बऱ्याच कथा आहेत ना त्यात सूर्योपासनेचा खरा अर्थ सांगणारी कथा आहे.’

‘सांगा ना बाबा…’ प्रज्ञा उत्सुकतेने म्हणाली.

‘ही प्रज्ञा म्हणजे गोष्ट म्हटली की लगेच सगळं विसरते.’ आईची तक्रार.

: ‘मग? आपल्या पुराणातल्या आणि लोककथा इतक्या छान असतात काही काही.’ प्रज्ञाने आपली बाजू मांडली.

‘पण ही कथा तशी नुसती छान वगैरे नाही हं. फक्त फार महत्त्वाची आहे. ऐका बरं का–’

आणि बाबांनी ती छोटी गोष्ट सांगितली.

‘पूर्वी कांबोज देशात यशोवर्मा म्हणून एक राजा होता. त्याला खूप वर्षं मूलबाळ झालं नाही. नंतर त्याला अगदी म्हातार-पणी एक मुलगा झाला. पण तो इतका अशक्त आणि रोगट होता

की कितीही उपाय केले तरी तो बरा होईना. मग राजानं विचारलं एका फल ज्योतिषाला. त्याला खरं कारण माहीत होतं राजपुत्राच्या दुखण्याचं. पण नुसतं काही साधंसुधं सांगितलं तर त्याच्यावर कुणी विश्वास ठेवीत नाही हेही त्याला माहीत होतं. मग त्यानं पंचांग पाहिलं, ज्योतिष पाहिलं आणि सांगितलं की नवग्रहातला मुकुटमणी जो सूर्य त्याची कृपा नाही. त्याच्या कृपा-



कटाक्षाच्या अभावी राजपुत्राची अशी अवस्था झाली आहे म्हणून त्याला आरोग्य लाभत नाही. तेव्हा या सूर्यदेवतेला अनुकूल करून घ्यावं.'

'कसं अनुकूल करून घ्यायचं?' राजाने विचारले.

'व्रत मोठं कठीण आहे. राजपुत्र आता आठ वर्षांचा झाला आहे. त्यानं रोज सकाळी डोंगरावर जाऊन उगवत्या सूर्याचं दर्शन

घ्यावं. नंतर सूर्यनमस्कार घालावेत. पोटभर पण दिवसातून फक्त तीनदा खावं. संध्याकाळी पाचशे पावलं चालत जाऊन नदी-किनारी बसावं आणि सूर्यास्ताचं दर्शन घ्यावं. पाच वर्षं हे व्रत आचरलं आणि न चुकता आचरलं, की राजपुत्र रोगमुक्त होईल. आणि खरोखरीच पाच वर्षांनंतर राजपुत्राला दुखणं तर कुठलं राह्यलंच नाही, उलट त्याची कांती तेज:पुंज झाली.

'तात्पर्य काय की हे सूर्योपासना व्रत म्हणजे–' आणि वाक्य अर्धवट सोडून बाबांनी दोघा मुलांकडे बघितले.

संदीप म्हणाला, 'हे सूर्योपासना व्रत म्हणजे काय त्याचं तात्पर्य कळलं मला, बाबा.'

'काय ते सांग!'

'तो राजपुत्र दिवसभर खा खा खात असणार. व्यायाम करीत नसणार. उशिरा उठत असणार आणि मोकळ्या हवेत फिरायला जात नसणार. तेव्हा फल ज्योतिषीबाबांनी त्याचं ज्योतिष जाणलं आणि त्याला हे व्रत सांगितलं.'

'बरोबर! त्याचे सवयीचे ग्रह कसे फिरत होते ते त्यांनी ओळखलं आणि त्याची ही ग्रहदशा दूर केली. पण हे व्रत सगळ्याच मुलांनी घ्यावं असं नाही तुम्हाला वाटत?'

'वाटतं तर!' प्रज्ञा म्हणाली.

'बाबा, मला वाटतं मुलींनीसुद्धा ते घेतलं पाहिजे. आम्हा-लाही व्यायामाची आणि सुदृढ प्रकृतीची आवश्यकता नाही का?'

'अग प्रज्ञा, मी तर म्हणते आम्हा मोठ्या माणसांना, बायकापुरुषांना सर्वांनाच त्याची गरज आहे. तुला ठाऊक नसेल पण माझे मामा या सूर्यनमस्काराच्या व्यायामाला फार महत्त्व द्यायचे. म्हणायचे, 'उठल्याबरोबर आपलं अंथरूण गुंडाळावं,

तेवढ्याच जागेत बारा सूर्यनमस्कार घालावेत. सगळ्या शिरा मोकळ्या होतात. दिवसभर कामाला उत्साह वाटतो आणि हा
९ साष्टांग नमस्कार म्हणजे सर्वांग सुंदर व्यायाम घडतो.' व्यायामाला जागा नसते म्हणतात त्यांना मामांचं हे उत्तर असायचं.'

'हे खरं हं! सूर्योपासना किंवा सूर्यपूजा ही अशीच करायला हवी. माझी आजी कोकणात रथसप्तमीला सूर्याची कहाणी सांगायची. आदित्यराणूबाईची. त्यात असायचं–

दैव देतं कर्म नेतं
कर्माचं फळ पुढे उभं राहतं.'

'म्हणजे काय बाबा?'

'म्हणजे असं की आपल्या नशिबानं आपल्याला मिळालं तरी आपण जर नीट वागलो नाही तर त्या कर्माचं फळ पुढं उभं राहतं आणि आपलं सगळं नुकसान होतं.'

'रथसप्तमीची पूजा आमची आजीसुद्धा करायची. सात घोड्यांच्या रथात बसलेला सूर्य पाटावर चंदनानं काढायची आणि कहाणी सांगून झाली की हातातले तांदूळ 'दाही दिशांना जा रे बाबांनो.' म्हणून फेकायची. सूर्याची कृपा दशदिशांवर होऊ दे; सगळीकडे समृद्धी नांदू दे असा त्याचा अर्थ. कारण सूर्यामुळेच सगळं फुलणार, फळणार, पिकणार!'

आईबाबांचं हे सांगणं लक्षपूर्वक ऐकणाऱ्या प्रज्ञाने विचारले,

'आई, इतर प्रांतात पण करतात ही रथसप्तमी?'

'हो. करतात ना! पण वेगवेगळ्या ठिकाणी हिची नावं वेगळी आहेत. बंगालमधे या तिथीला भास्करसप्तमी म्हणतात. माघ महिन्याला माकरी मास आणि रथसप्तमीला माकरी सप्तमी असं शब्दकल्पद्रुमकारांनी नाव दिलं आहे. उत्तरेत हिला

अचला आणि जयंतीसप्तमी म्हणतात. या दिवशी सूर्यनारायणाची स्वारी सात घोड्यांच्या रथात बसून आकाशातून फिरायला निघते या कल्पनेतून दक्षिणेत याला रथसप्तमी हे नाव मिळालं. बंगाल आणि द्रविड प्रांतातल्या भाविक स्त्रिया रथसप्तमीची पूजा खूप आकर्षक पद्धतीनं करतात.'

'कशी?'

'सप्तमीच्या आदल्या दिवशी उपास करतात. रात्र संपली, अरुणोदय झाला की डोक्यावर एक पेटलेला दीप घेऊन बाहेर पडतात, स्वच्छ आणि निश्चल पाण्यात शिरतात. दिवा नदीच्या किंवा तळ्याच्या काठावर ठेवतात. अरुणोदयापासून सूर्योदय होईपर्यंत त्या पाण्यात स्नान करतात. नंतर पुन्हा तो दिवा डोक्यावर घेऊन सूर्याचं ध्यान करून दिवा पाण्यात सोडून देतात. स्नान, सूर्याची प्रार्थना करून झाली की घरी आल्यावर तुळशी-वृंदावनासमोर सूर्यासह सात घोडे जुंपलेल्या रथाचं चित्र काढतात, त्याची पूजा करतात आणि गोवऱ्या पेटवून मातीच्या भांड्यात तयार केलेल्या दुधाच्या खिरीचा नैवेद्य सूर्याला दाखवतात.'

'आत्ता आठवलं – आई, तू पण अंगणात एका बुटकुल्यात निखाऱ्यावर खीर ठेवतेस ना? ती रथसप्तमीलाच नाही का?'

'हो. या पूजेतला तो आपल्याकडे आलेला थोडासा भाग.'

आता संदीपच्या मनात काहीतरी येऊन तो म्हणाला, 'एवढा पराक्रमी आणि महत्त्वाचा देव, इतकं मानतात सूर्याला आणि फक्त त्याचं चित्र काढून त्याची पूजा करायची. इतर देवांसारखी सूर्याची देवळं का नाहीत कुठं?'

'संदीप, अरे आहेत देवळं सूर्याची!'

'कुठे आहेत, बाबा?'

'हे बघ, पूर्वी अशी सूर्याची आयतनं मांडून--म्हणजे कुठली-तरी एक जागा सूर्याची पूजा करण्याचं पूजास्थान मानून तिथे सूर्याची, त्याच्या चित्राची चंदनानं रेखाटलेल्या–पूजा करीत असत. नंतर मूर्तिपूजेला सुरुवात झाल्यावर सूर्याची मूर्ती कशी असावी ते ठरवण्यात आलं. सुमारे १५०० वर्षांपूर्वी आपल्या देशात सूर्याची देवळं होती असा उल्लेख आहे. पश्चिम भारतात मुलतानपासून



कच्छपर्यंत ठिकठिकाणी सूर्याची मंदिरं होती पूर्वी. १७ व्या शतकात औरंगजेबानं मुलतान इथल्या सूर्यमंदिराचा संपूर्ण विध्वंस केला असं म्हणतात. जगन्नाथपुरीजवळ एक अतिशय सुंदर मंदिर आहे सूर्याचं, पण ते आता मोडकळीला आलं आहे.'

'हं! कोणार्क इथलं ना, बाबा?'

'हो. सोमनाथ, ठाण इथे काठेवाडातली सुंदर सूर्यमंदिरं आहेत. तसंच राजपुतान्यात भिनमाल इथलं सूर्यमंदिर आता जीर्ण

झालं असलं तरी फार प्रसिद्ध आहे. काश्मीरमध्ये मार्तंडाचं एक सुंदर देवालय आहे. पण आता तेही मोडकळीला आलं आहे. ते आठव्या शतकातलं असावं असं म्हणतात. काश्मीरमध्ये श्रीनगरपासून सुमारे वीस मैल अंतरावर पायेच इथेही एक सूर्यमंदिर आहे तेही सुमारे १५०० वर्षामागचं असावं असं वाटतं. कोकणात कशेळी इथे जैतापूरजवळ कनकेश्वराचं एक देऊळ आहे. आणखी पण लहानसहान गावी पूर्वी बांधलेली छोटी देवळं आढळतील सूर्याची. पण आता मात्र सूर्याचं खास असं एखादं देऊळ मुद्दाम बांधलेलं दिसत नाही.'

'नकोच!' संदीप एकदम म्हणाला.

'का रे?'

'सूर्याला काय असं देवळात कोंडायचं? मग त्या राजपुत्राला सांगितली तशी त्या सूर्योपासनेची काय किंमत राहणार? सगळे आपले देवळात जाऊन बसतील. ती खरी सूर्यपूजा होणारच नाही.'

'अगदी बरोबर बोललास. सूर्यशक्तीची खरी पूजा ती शक्ती ओळखून त्याच अनुरोधानं करायला हवी. सूर्यशक्तीचा माणसाने जास्तीत जास्त उपयोग करून घेऊन आपली प्रगती करून घेणं हीच खरी उपासना.'

'बाबा, एक मजा सांगू आईची?'

'प्रज्ञा–' आईने डोळे वटारले. तिकडे लक्ष न देता प्रज्ञा म्हणाली,

'बाबा, आई सगळे पदार्थ टिकावेत म्हणून उन्हात वाळवते ना तेव्हा म्हणते,

'सूर्यदेवाचं दर्शन घडवते आहे त्यांना.'

'उन्हात पाणी तापवून परवा तिनं मावशीच्या तान्ह्या बाळाला आंघोळ घातली आणि म्हणाली– त्यानं घामोळं जातं.'

'म्हणजे आई सूर्यशक्तीचीच उपासना करते आहे की! आता सूर्यशक्तीवर गिरण्या चालवाव्या, सैपाक करावा असे सुद्धा शोध लागले आहेत.'

'मला वाटतं, सूर्यदेवाला खरा आनंद यानेच होईल, नाही बाबा? पण आता मी मात्र एक ठरवलंय!'

'काय तें?'

'त्या राजपुत्रासारखं सूर्यव्रत घेणार आणि मुंजीतला विसरलेला गायत्रीमंत्र म्हणून तसा वागणार!'

'वाः वाः! सूर्यनारायण तुला आरोग्य आणि ज्ञानप्रकाश देवो!'

बाबांनी दिलेल्या आशीर्वादाने सर्वांनाच गंमत वाटली. हसू आले. आई म्हणालीसुद्धा,

'भोळ्या शंकरासारखा वरदहस्त ठेवलात आता हा सकाळसंध्याकाळ बाहेर भटकणार.'

'हो. पण चांगल्या कामासाठी. चांगलं वागण्यासाठी. आम्ही चांगलं वागलो तरी...'

'अरे, रुसू नकोस असा. चांगलं वागणं कुणाला आवडत नाही? चांगल्या वागण्यानं दुष्ट देखील संतुष्ट होतात, मग आई तर काय?'

'करेक्ट! बाबा, माझ्या डोक्यात अचानक सूर्यकिरण चमकला. हा माघ महिना. या माघ महिन्यात येते महाशिवरात्र आणि महाशिवरात्र म्हटलं की आठवण येते त्या चांगलं आणि खरं वागणाऱ्या हरिणाची.'

'अरे वा: बरंच आठवतंय की.'

'मग! आजीनं एकदा सांगितली ती कायमची ठसली आहे मनात.'

'मग सांग बरं– तुझ्या मनात ठसली आहे ती कथा.'

'तर बरं का... ऐकताहात ना ताईसाहेब?'

'ऐकते आहेच. शिवाय मलाही ती पाठ येतेय. पण आता तू सांगतो आहेस म्हणून गप्प बसून ऐकून घेणार आहे. आणि कुठं चुकलं की...' प्रज्ञाने चिडवले.

'चुकणार नाहीच मुळी! तर बरं का...'

आणि संदीपने ती गोष्ट सांगितली.

'महाशिवरात्रीचा दिवस होता. एका तळ्याकाठी एक मोठ्ठं बेलाचं झाड होतं. त्या झाडावर एक व्याध–म्हणजे पारधी चढून बसला होता. धनुष्यबाण अगदी तैयार होता ठेवलेला. पारधी तळ्याकडं अगदी नजर लावून बसला होता. कारण रानात बागडणारी हरणं त्या तळ्याचं पाणी पिण्यासाठी आली की पारध्याला त्यांची शिकार करायला मिळणार होती.

थोडा वेळ असाच गेला. दिवस गेला, संध्याकाळ होत आली आणि निराश झालेल्या, झाडावर बसून कंटाळलेल्या पारध्याला एक हरणांचा कळप लांबून येताना दिसला. त्यानं धनुष्य सरसावलं. बाण जोडला आणि हरणं संथपणे पाणी प्यायला तळ्याशी वाकली की शिकार साधायचं त्यानं ठरवलं.

हरणं बिचारी, त्यांना काय कल्पना! नेहमीसारखी आली आणि तळ्याच्या पाण्यावर वाकली. तेवढ्यात त्यांच्या कळपाच्या मुख्याला पाण्यात पारध्याचं प्रतिबिंब दिसलं. धनुष्याची दोरी ताणून बाण जोडून बसलेला पारधी आपला आता प्राण घेणार

हे त्याला कळून चुकलं आणि एकदम तो हरीण वर मान करून पारध्याला म्हणाला, 'हे व्याधा, तू आम्हाला मारणार हे खरंच! तो तुझा धर्मच आहे. त्याबद्दल आम्ही तुला दोष देत नाही. पण आम्ही सकाळीच घरातून निघालो आहोत. दिवसभर राना-वनातून हिंडतो आहोत. आमचे आप्तइष्ट, बायकामुलं सगळी घरी आहेत. आता दिवस मावळल्यावर आम्ही घरी येऊ म्हणून आमची वाट पहात असतील. आम्ही परत गेलो नाही तर त्यांना किती दुःख होईल? तेव्हा तुला एकच विनंती करायची आहे, आम्हाला आत्ता घरी जाऊ दे. आम्ही रात्रभर आमच्या मुला-माणसात आनंदानं राहू. त्यांचा मरणापूर्वी प्रेमानं निरोप घेऊ आणि सकाळी परत येऊ. मग खुशाल तू आमचे प्राण घे.'

व्याधाला आश्चर्य वाटलं, पण शंकाही आली की हे हरीण म्हटल्याप्रमाणे परत नाही आले तर? हातची एवढी मोठी शिकार घालवायची?

'अरे, पण तुम्ही परत याल ही खात्री कशावरून? तुम्हाला हातचं जाऊ देण्याचा मी मूर्खपणा करणार नाही.'

हरीण म्हणाला, 'माझ्या शब्दावर विश्वास ठेव. मी नक्की या सर्वांना घेऊन परत येईन.'

पारध्यानं त्याची परीक्षा पाहण्याचं ठरवलं. सूर्योदयापूर्वी परत येण्याच्या अटीवर त्यानं त्यांना परत जाण्याची परवानगी दिली.

रात्रभर पारधी झाडावर जागत त्यांची वाट पहात राहिला. एकीकडं बेलाच्या झाडाची पानं तो खुडून खाली टाकीत होता. ती झाडाखालच्या शंकराच्या पिंडीवर पडली. भोळचा शंकराला वाटलं–यानं आपल्यावर बेलाचा अभिषेक केला.

सूर्योदय व्हायला अजून अवकाश होता. पारध्याला दूर अंतरावर पालापाचोळा उडत असलेला दिसला. नंतर बारीक बारीक ठिपके दिसले. हळूहळू ते ठिपके मोठे मोठे होत गेले आणि धावत त्याच्याकडे येऊ लागले. अजूनही सूर्य उगवला नव्हता. पण व्याधासमोर, झाडाखाली, तळ्याच्या काठावर, काल रात्री परत गेलेला तो हरणांचा कळप येऊन उभा राहिला.



पारध्याचा आपल्या डोळ्यांवर विश्वास बसेना. ही हरणं, हे पशू आपल्या दिल्या वचनाला जागतात इतके ? आपल्या शब्दाची, वचनाची त्यांना इतकी चाड आहे ? हे पशू इतके सत्यवचनी आहेत ? आणि हे वचन पाळणं देखील मरणाच्या दारात असताना ? ते परत न येता आपले जीव वाचवू शकले असते.

आणि त्या पारध्याला त्यांचं हे वागणं पाहून गहिवरून आलं. त्यानं धनुष्यबाण टाकून दिला आणि हरिणाच्या पाठीवर हात फिरवून म्हणाला,

'मी यापुढं तुमची शिकार करणार नाही. कंदमुळं, फळं खाऊन राहीन.'

शंकर सगळं बघतच होते. त्यांना हरिणाचं आणि व्याधाचं सगळ्यांचंच कौतुक वाटलं. त्यांनी त्यांना कैलासावर आपल्याजवळ बोलावून घेतलं आणि सांगितलं,

'पृथ्वीवरच्या मानवाला हरिणांच्या वचन पालनाची आणि व्याधाच्या दयाबुद्धीची नेहमी आठवण राहावी म्हणून मी तुम्हाला आकाशात कायमचं स्थान देतो नक्षत्राच्या रूपानं.'

गोष्ट माहीत असूनही इतका वेळ अगदी रंगून जाऊन ऐकणारी प्रज्ञा एकदम म्हणाली, 'म्हंजे बाबा, ते मृग नक्षत्र याच हरिणांचं ?'

'हो आणि मधूनच रेघ काढल्यासारखी दिसते ती व्याधाच्या बाणाची. या नक्षत्राकडं बघितलं की या दोन उत्तम गुणांची आठवण होते. सत्यपालन आणि सहानुभूतीनं जागी झालेली करुणा, दयाबुद्धी.'

या गोष्टीने सगळ्यांनाच भारावून गेल्यासारखे झाले होते. तो ताण कमी करण्यासाठी आई म्हणाली,

'आणि बरं का रे, त्या दिवशी त्या व्याधाला उपास घडला म्हणून महाशिवरात्रीचा उपास करायचा आणि बेलाच्या पानांच्या अभिषेकानं शंकर प्रसन्न झाला म्हणून शंकराला बेल वहायचा. हे पण आठवण ठेवणंच या प्रसंगाचं.'

'पण काय ग आई, आजी एकदा म्हणाली होती की

शंकर सगळ्या देवात श्रेष्ठ आहे म्हणून त्याला सगळे घाबरतात. विष्णू आणि ब्रह्मदेवसुद्धा. खरंच का ग?'

'हे बघ, प्रज्ञा– तसे सगळेच देव श्रेष्ठ आहेत. पण विष्णू आणि ब्रह्मदेव यांनी एकदा शंकर आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहे का हे बघण्याचं ठरवलं. शिवलिंगाचा आदि अंत शोधून काढायचा म्हणून दोघं दोन दिशेला गेले आणि वर्षभर हिंडून पुन्हा परत आले. कारण आदि अंत त्यांना मिळालाच नाही. शिवलिंगाचं अस्तित्त्व सुरू कुठं होतं ते कळत नाही आणि ते कुठं संपतच नाही असा अनुभव आला त्यांना. म्हणजेच शंकर सर्वत्रच आहे. त्याचं स्वरूप सर्वांना व्यापून राहिलं आहे म्हणजेच तो आपल्याहूनही श्रेष्ठ आहे असं त्या दोघांनी मान्य केलं.'

'पण मग विष्णू शंकरापेक्षा श्रेष्ठ असं त्या माधवीअक्का का म्हणतात?' संदीपने विचारले.

'अरे संदीप, त्या वैष्णव म्हणजे विष्णूच्या भक्त आहेत. खरं तर देवांचं आपसात भांडण नाही, पण या देवांचे भक्तच आपसात उगीच भांडतात. हे बघ विष्णूचे भक्त ते वैष्णव, आणि शिवाचे भक्त ते शैव असे दोन संप्रदाय आहेत. दोघांनीही आपली ज्या देवावर श्रद्धा त्याची भक्ती करावी. पण दुसऱ्या देवाचं शत्रुत्त्व कशाला करावं? पण ते नाही. तुला गंमत माहीत आहे या दोघांच्या भांडणाची?'

'नाही ना, सांग ना.'

'आम्ही पूर्वी पुण्याला राहात होतो ना–तेव्हा आमच्या शेजारी एक विऱ्हाड होतं. त्यातल्या सासूबाई होत्या वैष्णव पंथाच्या आणि सूनबाई शैव पंथाच्या. सासूबाई जास्त कडक. शंकराची पिंड आडवी म्हणून त्या कुंकूदेखील उभ्या रेघेचं

लावायच्या. सून लावायची आडवी चिरी. त्यावरून दोघींचा वाद आणि मुलांची बिचाऱ्यांची फार त्रेधा उडायची.

'का?'

'त्या सासूबाई इतक्या कडक होत्या की शंकराचं नाव देखील घरात घेऊ द्यायच्या नाहीत. एकदा त्यांच्या घरातल्या एका मुलीची कानातली बुगडी हरवली. ती गेली रडत आजीकडे. म्हणाली,

'आजी, माझी बुगडी हरवली.' आणि आजीनं पुढं काही ऐकून घ्यायच्या आधीच केली नातीला बदडायला सुरुवात.'

'पण का?'

'तिनं बुगडी हरवली म्हटलं ना!'

'खूप किमतीची असेल ती. सोन्याची असते ना बुगडी?'

'अग, ते कारण नाही. पण ती हरवली म्हणाली ना?'

'मग काय म्हणणार? हरवलीच होती ना?' प्रज्ञाला कळेना घोटाळा.

'तीच तर गंमत. आजी मारते आहे आणि म्हणते आहे, 'घेशील त्या मेल्याचं नाव? सांडली नाही म्हणता येत.' अग प्रज्ञा हरवली म्हणणं म्हणजे शंकराचं नाव नाही का आलं? हर म्हणजे शंकर! बिचाऱ्या त्या पोरीला कळेना. मग आजोबांनी येऊन समजावून सांगितलं. अशा त्या आजी. हरवलं म्हणायचं नाही, शिवाशिवी म्हणायचं नाही, शिवली म्हणायचं नाही, सांडलं, पकडापकडी, लागली असं म्हणायचं.'

'मुलांनो, अरे हाच तर भक्तांचा आडमुठेपणा नडतो. देवांना जशी सगळी सारखी तसे आपल्यालाही सगळे वेद सारखेच नाहीत का? आपण भक्त असे उगाचच भांडतो आणि देवाचं

खरं रूप समजूनच घेत नाही.'

'बाबा,' संदीप म्हणाला, 'ते भक्तांचं चूकच. पण बाकी सगळ्या देवांना शंकर देखील हैराण करीत नसे का? आपला कुणालाही काहीही वर द्यायचा आणि देवांना संकटात टाकायचं.'

'त्याचं कारण शंकर तसा भोळा सांबच. एखाद्यावर प्रसन्न झाला की कुणाच्या भलेबुरेपणाचा विचार न करता द्यायचा वर. पण जितका प्रेमळ तितकाच रागीट. आपल्या तपश्चर्येचा भंग करायला मदन आल्याबरोबर तिसरा डोळा उघडून त्याला जाळून टाकलन् म्हणून तर त्याला रुद्र म्हणतात.'

'आणि तुम्ही रागावलात की आई तुम्हाला रुद्रावतार धारण केला म्हणते.' प्रज्ञाने आता बाबांनाच चिडवलं.

पण बाबा न चिडता पुढे म्हणाले, 'हे बघा– विष्णूच्या पूजेचा प्रारंभ प्रेमापासून आणि रुद्राचा भीतीपासून झाला म्हणतात. मेघगर्जना, समुद्रातली वादळं, विजेचा उत्पात, भूकंप, उल्कापात या सगळ्या प्रचंड संहारक शक्तींमुळे सगळे अनर्थ घडतात असं आपण मानतो आणि या अनर्थकारी भयानक शक्तीला ऋषींनी रुद्र हे नाव दिलं, त्या शक्तीची करुणा भाकली. ही रुद्रशक्ती म्हणजे शंकर असं मानलं. त्याला पशुपती– वनस्पतींचा राजा म्हटलं. जसं आर्यांनी हे दैवत पूज्य मानलं. तसंच शहरांपासून दूर असणाऱ्या निषाद, किरात यांनीही मानलं, मग आपल्या कल्पनांप्रमाणे त्यांनी त्याला अरण्यवासी बनवलं, उग्र, पंचाननाशी त्याचं साम्य ठरवलं. त्याच्या गळ्यात रुद्रमाळा घातल्या. मृगाजिनांचा पोषाख त्याच्या अंगावर चढवला. रानाच्या आणि स्मशानाच्या जवळ हे राहायचे म्हणून या रुद्राचं वसतिस्थानही तेच आहे असं त्यांनी ठरवलं. पण आर्यांनी मात्र त्याला कैलासा-

वर राहणारा प्रचंड शक्तिशाली पण अत्यंत सौम्य हितकारी मानलं. एवढंच नव्हे तर संकटहर्ता म्हणून प्रत्येक संकटाच्या वेळी, असूरसंहाराच्यावेळी शंकरपार्वतीचीच आराधना केली. शंकरांची रुद्रशक्ती आणि पार्वतीची आदिशक्ती यांचाच सर्व देवांना संकटकाळी आधार वाटायचा. या दोघांनी त्यांच्यावरची कितीतरी संकटं दूर केली.'



'अगदी विष देखील प्याले नाही, शंकर? देवांना वाचवण्यासाठी सबंधच्या सबंध विषाचा कुंभ पिऊन टाकणं काही सोपं नाही.' संदीप अगदी अभिमानाने म्हणाला.

'हो. पण ते पचवून टाकायची देखील शक्ती होती शंकरांमध्ये. म्हणून तर त्यांना नीलकंठ नाव मिळालं.' प्रज्ञा म्हणाली.

'हे पहा– म्हणूनच या दोघांना जगाचे मातापिता म्हणतात.

'जगत: पितरौ वन्दे पार्वतीपरमेश्वरौ'

हा श्लोक माहीत आहे ना?'

'आहे ना! बाबा, शंकराची देवळं खूप असतात नाही? आणि कसं वेगळं वाटतं प्रत्येक देऊळ.'

'म्हणजे कसं, प्रज्ञा?' आईने विचारले.

'शंकराचं देऊळ नेहमी तळ्याच्या काठी, गावाच्या कडेला, एकीकडं असतं. गाभारा कसा खोल असतो. सगळीकडं थंड, शांत! दाराशी काळाकुळकुळीत दगडाचा नंदी. मला तर इतकं छान वाटतं. वाटतं की शंकराच्या देवळात बसून काही वाचलं ना, तर ते जन्मात विसरणार नाही. तिथेच जाऊन अभ्यास करावा.'

'पण ताईसाहेब, तुम्ही तिथे जाऊन अभ्यास विसराल आणि देवळाजवळची बकुळीची फुलं वेचीत बसाल.'

'आणि संदीपबाबू, आपण गाभाऱ्यात जाऊन ओरडून, आवाजाचा प्रतिध्वनी ऐकत बसाल.'

'हे पहा– मी रुद्रावतार धारण करायला नको असेल तर नीट ऐका.' बाबा सांगू लागले.

'शंकराची देवळं खूप आहेत. विशेषत: सृष्टीच्या उत्पत्तीला कारण अशी जी दिव्यशक्ती तिचं द्योतक म्हणजे शिवलिंग असं मानतात आणि अशी बारा ज्योतिर्लिंग आपल्या भारतात प्रसिद्ध आहेत. नीट ऐका हं! –'

बाबांनी त्या ज्योतिर्लिंगांची नावं सांगितली–

१) प्रभासपट्टणचा सोमनाथ २) श्रीशैल इथला मल्लिकार्जुन ३) उज्जयिनीचा महाकाल ४) नर्मदेतला ओंकारमाधाता

५) हिमालयातला केदार ६) डाकिनीवनातला भीमाशंकर ७) श्रीक्षेत्र काशीचा विश्वेश्वर ८) नाशिकजवळचा त्र्यंबकेश्वर ९) चिताभूमीतला परळीचा वैजनाथ १०) दारुका वनातला आंवढ्या नागनाथ ११) सेतुबंध रामेश्वर १२) वेरूळचा घृष्णेश्वर.

तसंच मद्रासकडेही पाच शिवस्थानं फार महत्त्वाची आहेत. पंचमहाभूतांपैकी एकेकाचं अस्तित्त्व या एकेका ठिकाणी मानतात.

१) कांजीवरम् इथलं पृथ्वीलिंग एकांबरेश्वर २) त्रिचनापल्लीजवळ आपलिंग जंबुकेश्वर ३) तिरुवण्णामलाई इथे तेजोलिंग अरुणाचलेश्वर ४) कालहस्ती इथे वायुलिंग कालहस्तेश्वर ५) चिदंबरम् इथे आकाशलिंग. या शेवटच्या ठिकाणी शंकराची नटराजमूर्ती आहे. शिवलिंग नाही. कारण ते आकाशरूपी आहे आणि मूर्तीच्या पाठीमागच्या जागेत आहे असं मानतात.

'हं, बाबा म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश या पंचमहाभूतांची नावं अगदी छान आली यात.'

'हे तर झालंच, पण प्रज्ञा-संदीप, शंकराचं हे दैवी किंवा पंचमहाभूतांनी युक्त ही सगळी स्वरूपं आहेत. त्याचबरोबर अगदी तुम्हाला ज्याची नेहमी उपासना करता येईल पण ज्याला देव–म्हणजे नेहमीच्या अर्थाने देव म्हणता येणार नाही असं एक शंकराचं रूप आहे.'

'कोणतं?'

'मी वर्णन करतो त्यावरून ओळखा. भूभाग हा विशाल देह, हिमालय हा जटाभार, धवलगिरी हा मुकुट, मस्तकावरून वाहणारी गंगा ही स्फटिकमाळ, विंध्याचल हा कमरपट्टा होऊन बसलेला नाग, पूर्वपश्चिमप्रदेश हे हात आणि शंकराने धारण केलेला डमरू म्हणजे प्रचंड गर्जना करणारा हिंदीमहासागर.

म्हणजेच...’

‘म्हणजेच शंकर– म्हणजे आपला भारतदेश.’ संदीप-प्रज्ञा दोघं एकदम म्हणाली.


‘बरोबर ओळखलंत. तेव्हा शंकराची उपासना किंवा सेवा म्हणजेच भारताची सेवा. देशसेवा. देशभक्ती हीच शंकरभक्ती. तेव्हा ही सर्वांना सर्वकाळी करता येईल, नाही का?’

‘अर्थातच. आम्ही सगळी मुलं आता अशीच शिवभक्त बनतो आणि आमची ही सेना शिवसेना बनून भारताची सेवा करील. राष्ट्रभक्ती करील. जयहिंद! जयशंकर! जय भारत!’ प्रज्ञा आणि संदीप जोरात म्हणाले.

‘मुलांनो, शिवभारताची तुमच्या हातून सेवा घडो. तो तुम्हास प्रसन्न होवो!’

बाबाही त्याच जोरात आशीर्वाद देण्याच्या थाटात म्हणाले.

* *



# फाल्गुन

'होळी रे होळी, पुरणाची पोळी'
'होळीची लाकडं पाच पाच,
डोक्यावर घेऊन नाच नाच.. '

अशा घोषणा देतच फाल्गुन अवतरतो. हा वर्षाचा शेवटचा महिना. कडाक्याची थंडी ओसरलेली असते. नवीन चैतन्याची ऊब अंगात झिरपू लागलेली असते.

नजर मागे टाकून मन वर्षभराच्या कार्यक्रमांचा, जीवनाचा आढावा घेत असतं. आता नवजीवनाला, नवचैतन्याला सामोरं जायचं म्हणजे जुनं, निषिद्ध, पाप, वाईटसाईट जे काही असेल ते नष्ट करायचं, जाळून टाकायचं या होळीत. असा हा वाईटाला जाळून टाकणारा होलिकोत्सव.

फाल्गुन शुक्ल नवमीपासून पौर्णिमेपर्यंत हुताशनी किंवा होलिकोत्सव सगळीजणं मोठ्या उत्साहानं साजरा करतात.

'हो. कसल्या उत्साहानं ! सगळा गलिच्छपणा आणि बीभत्सपणा. बोंबा काय मारतात, शिवीगाळ करतात, कशाला काही धरबंधच नसतो ' आई चिडून म्हणाली.

'खरं आहे तू म्हणतेस ते. पण चांगल्या गोष्टीला कधी कधी त्यातलं तथ्य न कळून वाईट स्वरूप आलं आहे तसंच हे. खरं तर हे शिव्याशाप, आरडाओरडा बोंबाबोंब, ढोल नगारे पिटणं, वेडंवाकडं नाचणं हे एकेकाळी होळीला केलं होतं. त्याचं कारणं

वेगळं होतं !'

'म्हणजे बाबा, पूर्वी ह्या सगळ्या घाणेरड्या गोष्टी केल्या होत्या लोकांनी.'

'हो. पण त्या एका विशिष्ट कारणासाठी. महाराष्ट्र आणि कोकणपट्टीतल्या लोकांचा भविष्यपुराणावर विश्वास. त्याचा हवाला देऊन त्यांनी सांगितलं की पूर्वी हे घडलं होतं. ढुंढा



नावाची एक भयंकर राक्षसी लहान मुलांना पकडून नेऊ लागली. खाऊ लागली. त्रास देऊ लागली. तिला गावातून काढून लावायला हवं होतं. मग गावकऱ्यांनी गावाच्या शिवेवर खूप मोठा विस्तव पेटवला. चौफेर प्रचंड विस्तवाचे लोळ उठले. छोटे छोटे विस्तवाचे चौकोनही पेटवले. मग ढुंढा राक्षसीला घेरून तिच्याभोवती ढोल,

नगारे पिटून तिला त्यांनी घाबरून सोडलं. बोंबा मारल्या. रागा-रागानं तिला शिव्या दिल्या. ती राक्षसी घाबरली. गावातून पळून गेली. तिला हाकलून लावण्याची ही आठवण. एका संकटावर मात करण्यासाठी गावातून एक पाप नाहीसं करण्यासाठी म्हणून ही होळी पेटली. संकटनाशिनी होळी आजही म्हणून ती आपण पेटवतो. आता त्या होळीभोवती जे बीभत्स प्रकार चालतात ते न करता आनंदाप्रीत्यर्थ चांगले नाच आणि गाणी यांना महत्त्व द्यायला हवं.'

'आणि बाबा, परवा त्या सुभाषनं तर काही ठिकाणची लाकडं चोरून आणली होळीसाठी. एका घरचं तर खिडकीचं दारदेखील मोडून आणलंन्.'

'अरे हेही असंच. कशाची तरी आठवण म्हणून काहीतरी करायचं.'

'ही कशाची आठवण ?'

'कृष्णाला मारण्यासाठी कंसानं पूतना राक्षसीला पाठवलं होतं हे ठाऊक आहे ना ? त्या पूतना राक्षसीनं कृष्णाला विषारी दूध पाजून मारायचा प्रयत्न केला. पण कृष्णानं दूध पिता पिता तिचे प्राणच शोषून घेतले आणि तिला ठार मारलं. तो दिवस होता होळीचा असं भागवतपुराण आणि विष्णुपुराणात म्हटलं आहे. पूतना मेली तेव्हा तिला होळीच्याच दिवशी जाळलं. तिला जाळण्या-साठी कृष्णाच्या गोपांनी भराभर गावातली लाकडं आणून लाक-डांचा ढीग रचला. तुम्ही मुलं कृष्णाच्या गोपांसारखेच. तेव्हा तुम्हीही लाकडं गोळा करता. पण गोपाळांनी स्वखुशीनं घरातली लाकडं दिली होती हे विसरून तुम्ही सक्ती, जबरदस्ती करता.'

प्रज्ञा-संदीप ऐकत होती.

'आणि बरं का रे, ओरिसा प्रांतातली मुलं फार शहाणी

आहेत. तिकडच्या गवळ्यांची मुलं होळीच्या दिवशी स्वतः नवीन पोशाख घालतात. आपल्यातल्या एखाद्या मुलाला कृष्णाचा वेष देतात. होळीभोवती सगळे थोडा वेळ छान नाचतात. मग तो कृष्ण मुख्य आणि त्यांच्या प्रामुख्याखाली मेळे काढतात. घरोघरी जाऊन टिपऱ्यांचा नाच करतात आणि त्याकाळी जशी कृष्णलीला झाली असेल ना पूतनेला जाळल्यानंतर, तोच उत्सव तसाच करण्याचा प्रयत्न करतात.

उत्तर भारतात फाल्गुन शुक्ल पंचमीपासून सर्व मंडळी लाल आणि पिवळी वस्त्र नेसून गुलाल उधळीत पौर्णिमेपर्यंतचे दिवस मोठ्या मजेत घालवतात. त्याला ते म्हणतात होरी.'

'आत्ता मला कळला 'होरी खेलो नंदलाल' या गाण्यातल्या होरीचा अर्थ. होरी म्हणजे रंगपंचमी?' प्रज्ञाने विचारले.

'होरी म्हणजे होळी, रंगपंचमी सगळं. या दिवसात चांगलं, वाईट कसलंही लाकूड जमवतात आणि त्या लाकडी ढिगाची पौर्णिमेला राखरांगोळी करतात. गावकरी हसण्याखिदळण्यात, गप्पागोष्टीत वेळ घालवतात आणि अग्नीनं लाकडं पूर्ण जाळली की घरी जातात. दुसऱ्या दिवशी ती राख पाण्यात टाकून देतात.'

'अहो बाबा, आमच्या वर्गातला तो कमलेश्वर म्हणतो की ती मंडळी होळीची राख अंगाला फासतात.'

'बरोबर आहे. काही भाविक मंडळी होळीचं पवित्र भस्म म्हणून ती राख अंगाला लावतात देखील.'

'पण बाबा, मग शंखासुर आणि शिराळशेट कशासाठी करतात ?'

'शंखासुर म्हणजे विदुषकच रे दुसरा. नाचगाणं, हसणं, खिदळणं यासाठी विदुषक लागतोच. पण हाही एक राक्षस होता.

शंखासुराची टोपी कशी असते शंखाच्या आकाराची. या शंखासुराला होळीच्या उत्सवात हसवण्यासाठी मुलांनी सामील करून घेतलं असं आमचे आजोबा सांगतात. हा फार प्रेमळ राक्षस होता म्हणे. म्हणून तर तो नेहमी होळीचे खेळ करणाऱ्या मुलांबरोबर असतो. आता शिराळशेट कसा असतो ते आठवून पहा म्हणजे त्याचं काम काय ते कळेल.'

'मी सांगतो बाबा. आम्ही केला होता. मोठ्ठा ढेरपोटचा, पोटाला एक भोक मोठ्ठं—बेंबीजवळ आणि छोटंसं डोकं अगडबंब शरीराला न शोभणारं. त्याच्या बेंबीच्या भोकातून सगळी घाण, कागदकपटे गवतकचरा टाकायचा आणि द्यायचा पेटवून. होळीची रात्रभर हा नाकातोंडातून धूर सोडीत असतो. काय गंमत येते !'

'हं तर संदीप हा शिराळशेट म्हणजे चैनी, कसली ददात नसलेला आळशी प्राणी. बऱ्यावाईट कुठल्याही मार्गानं हा सगळं मिळवून पोटात साठवून ठेवतो. पण बुद्धी नाही म्हणून डोकं लहान. शिवाय इतका अजस्त्र देह की हालता येत नाही. तेव्हा अनिष्ट मार्गानं मिळवून साठवलेल्या वस्तू पुन्हा त्याच्याकडून आपण मिळवायच्या. पूर्वी या एका खऱ्याखुऱ्या शिराळशेटला गुदगुल्या करून हसवून त्याच्याकडच्या वस्तू घेतल्या म्हणतात. अशी दंतकथा आहे. तेव्हा वाईट गोष्टींचा नाश करणाऱ्या होळीबरोबरच या शिराळशेटलाही लोकं धडा शिकवतात आणि त्याच्या नाकातोंडातूनही सगळं लुबाडलेलं बाहेर काढतात.'

'आई, तू तर हा कामोत्सव असतो असं म्हणाली होतीस एकदा.'

'हो, अग प्रज्ञा मी दक्षिणेत गेले होते ना यात्रेला तिथं बघितलं. तिकडचे लोक हा उत्सव केवळ कामदेवाप्रीत्यर्थ असतो

असं मानतात. शंकर तपाचरणात गढून गेले असताना देवांनी मदनाकडून त्यांचं लक्ष पार्वतीकडे वेधून घ्यायचा प्रयत्न केला, पण शंकर रागावले. त्यांनी तिसरा डोळा उघडून मदनालाच जाळून टाकलं. तो दिवस फाल्गुन पौर्णिमेचा म्हणजे होळीचा. म्हणून ते लोक हा कामोत्सव मानतात.'



'बरं का रे आमची चाचाजींची साधना मुखर्जी बंगालमधल्या होळी पौर्णिमेची आणखीनच मजा सांगत होती.'

'काय असते ती मजा?'

'बंगालमध्ये फाल्गुन शुक्ल चतुर्दशीला दोलायात्रा नावाच्या उत्सवाला सुरुवात होते. घरचा मोठा पुरुष असेल ना म्हणजे

कुटुंबप्रमुख तो या दिवशी उपास करतो. कृष्णाची पूजा करतो. संध्याकाळी अग्नीची पूजा करतो. पूजा झाली की मूर्तीवर फल्गू म्हणजे गुलाल उधळतो. जमलेल्या मंडळींनाही वाटतो. नंतर घराबाहेर एक मोठी गवताची मूर्ती जाळतात. तिलाच म्हणतात होळी. कृष्णानं मारलेली ही राक्षसी पूतना. मग कृष्णमूर्तीला झोपाळ्यावर बसवून अरुणोदयापासून सूर्यास्तापर्यंत झोके देतात. हा झोका म्हणजे दोला म्हणून हा दोलोत्सव आणि हा दोला बघायला खेड्यापाड्यातली मंडळी दूरदूरहून एकमेकांकडे जातात ती दोलायात्रा.'

'बाबा, आपल्या भारतातच असे खूप उत्सव नाही का ?'

'असं नाही हं ! वसंताच्या स्वागतासाठी होणारे उत्सव सगळीकडे असतात. नववर्षासाठी होणारा ईस्टर, नाताळ नसतात का? तसंच हा होळीचा उत्सव चीनमध्येसुद्धा होतो.'

'चीनमध्ये ?'

'चीनमध्ये ही अग्निदेवतेची पूजा मानतात. शाओनेन म्हणजे अग्निदेवता. जी चूल आपल्यासाठी अन्न शिजवते तिच्याबद्दल कृतज्ञता बाळगण्यासाठी हा उत्सव करतात.'

'आपल्यासारखीच होळी पेटवतात ?'

'नाही. वर्षप्रतिपदेपूर्वी एक आठवडा सगळी कुटुंबातील मंडळी एकत्र जमतात. ओटीवरच्या धुराड्यात अग्निदेवतेचं चित्र लावतात. रस्सामिन फूसा–फूसा म्हणजे देव–रस्सामिन फूसा म्हणजे अग्निदेवता. मग या चित्राची पूजा करतात. कारण धुराड्यातल्या धुराच्या रूपानं अग्नी फूसाकडे किंवा देवाकडे सर्वांचं पापपुण्य सांगण्यासाठी जातो अशी या मंडळींची भावना आहे. ही आपल्या होळीसारखीच पूजा म्हणायची अग्नीची.'

'पण मग धुळवडीत लोळायचं कशाला ?'

'अरे, कोण सांगतं ?'

'सगळी तर म्हणतात.'

'हे बघ धुळवड म्हणजे धूलिवंदन या शब्दाचं अपभ्रष्ट रूप. तसंच त्याचं स्वरूपही बिघडलेलं. चिखल काय अंगावर माखतात. लोळतात काय ! खरं म्हणजे धूलिवंदन फार पवित्र असतं. आपल्याला धान्य देणाऱ्या भूमीला सांगायचं,

'आता वसंत येईल. नवं वर्ष उगवेल. वर्षभराच्या दुष्कृत्यांचं, वाईट विचारांचं आम्ही दहन केलं, होळी केली. आता हे पृथ्वीमाते तुझे रज:करण, तुझे धूलिकण मस्तकाला लावून आम्ही तुला वंदन करतो. आता तू धनधान्यानं समृद्ध हो ! नवजीवन निर्माण कर. नवचैतन्याचा संचार होऊ दे. नववर्षाच्या स्वागताला आम्ही तयार झालो आहोत. वसंताचा रंग साऱ्या चराचरावर खुलू दे.'

'काय सुंदर प्रार्थना आहे नाही का पृथ्वीमातेची.'

'हो ना ! ही प्रार्थना करायची आणि होळीमागून येणाऱ्या नव्या वर्षाच्या ऋतुराजाच्या आगमनाला सिद्ध व्हायचं. त्याचं स्वागत करायचं आणि स्वागताचं गीत म्हणायचं, आईनं केलेलं.'

'आई ? तू केलं आहेस गीत ?'

'कसलं ग ते. आपलं एकदा सहज मुलांना शिकवलं होतं पूर्वी तेच धरून बसतात बाबा तुमचे.'

'म्हंजे, केलं आहेस हे नक्की.'

'आम्हाला हवं हं आई ते गाणं !'

आणि आईला मुलांच्या हट्टामुळे गाणं म्हणावं लागलं—

होळीमागून वसंत येईल शुष्क जीवना फुलवाया<br>
सुकले पिकले जळून जाईल नवपल्लव येईल उदया—

आम्रतरूला बहार येईल
कोकिळ पंचमसुरात गाईल
शिणल्या दमल्या जगास अवघ्या
दु:ख हरपुनि हसवाया वसंत येईल फुलवाया
नवतेजाने नटेल धरती
मधुर्रसिंचन करील भंवती
त्या तेजाने न्हाऊनमाखून
चमचमेल अवघी दुनिया वसंत येईल फुलवाया
'वसंताचे स्वागत असो.'
'नवजीवनाचे स्वागत असो.'
'नवचैतन्याचे स्वागत असो.'
'नववर्षाचे स्वागत असो.'

म. ग्रं.
क्रा. 20080
वि. भाषा 28/8/06
IRBK-0116790
IRBK-0116790

# अरगडे कुलकर्णी प्रकाशन, पुणे-३०

## मुलांचे आवडते संच

| | | पुस्तके |
|---|---|---|
| १) | मनोरंजक व बोधप्रद गोष्टी | ३८ |
| २) | कुमारमाला | ५ |
| ३) | मनोरंजनमाला | ९ |
| ४) | संपूर्ण रामायण | ६ |
| ५) | महान मानव संच | १० |
| ६) | असे घडले छत्रपती | ४ |
| ७) | किशोर गंमतजंमतमाला | १० |
| ८) | कुमार अंगतपंगतमाला | ५ |
| ९) | कुमार गोपालकाला | ५ |
| १०) | विनोद विकासमाला (संच १ ला) | ५ |
| ११) | विनोद विकासमाला (संच २ रा) | ५ |
| १२) | किशोर आनंदमाला | १० |
| १३) | नाट्य रंजनमाला (एकांकिका) | १२ |
| १४) | सुबोध साहित्यमाला | ५ |
| १५) | कथारूप शिवराजदर्शन | ८ |
| १६) | नाट्यरूप शिवशाही | ११ |
| १७) | संस्कारकथामाला | १० |
| १८) | श्री शिवछत्रपती (चित्रचरित्र) | १ |
| १९) | आला संतांचा मेळा | १० |
| २०) | कुमार विनोदनमाला | १० |
| २१) | विज्ञानछंदमाला | ६ |
| २२) | छत्रपतींचे पंतप्रधान | ८ |

याशिवाय अनेक मनोरंजक गोष्टींच्या पुस्तकांसाठी

संपूर्ण सूचीपत्र मागवा.